आत्मवृत्त

# पूर्वपीठिका

वि. दा. सावरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ दि: ............

प्रकाशन क्रमांक १

REFBK-0009489

व्हीनस प्रकाशन, शनवार, पुणे २

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक :
**ग. पां. परचुरे**
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर,
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

आवृत्ति पहिली
मार्च १९५७

सर्वाधिकार :
**वि. दा. सावरकर**
यांचे स्वाधीन

मुखपृष्ठ सजावट :
**गोपालकृष्ण भोबे**

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबअी ४

## अनुक्रमणिका

| | | पान |
|---|---|---|
| १ | लिहूं का ? | १ |
| २ | सन १८५७ नंतरचें राजकारण | ९ |
| ३ | राजकीय परिस्थितींतील पहाणी | १३ |
| ४ | राजकीय परिस्थितीची प्रांतवार पहाणी : १ | २५ |
| ५ | राजकीय परिस्थितीची प्रांतवार पहाणी : २ | ३३ |
| ६ | अिंग्रजांच्या छावणींत | ४२ |
| ७ | पंजाबमधील क्रांतिकारक अुठावणी | ४७ |
| ८ | क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके | ५२ |
| ९ | वासुदेव बळवंताच्या सशस्त्र अुठावाची सत्ताधिकाऱ्यांवर झालेली प्रतिक्रिया | ६४ |
| १० | अखिलभारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना | ७१ |
| ११ | हिंदी राष्ट्रसभेच्या पायाभरणींतच मुस्लिम पायधरणीचा कालक्रम | ८५ |
| १२ | टिळकपर्व | ९७ |
| १३ | पण वासुदेव बळवंताच्या नंतर सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाचें काय झालें ? | १०३ |

# प्रकाशकाचे दोन शब्द

सन १९२४ व्या वर्षी वीर सावरकरांची अंदमानांतून सुटका झाल्यानंतर ब्रिटिश शासनानें त्यांच्यावर स्थलबंदीची नि राजकीय विषयबंदीची अट लादून त्यांना रत्नागिरीस डांबून ठेवलें. त्या काळापासूनच त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध करावें अशी अनेक लहानमोठे हितचिंतक त्यांना अत्याग्रहाची विनंति करीत आले आहेत. तसें आत्मचरित्र लिहिणें हें आपलें एक राजकीय कर्तव्यच आहे अशी जाणीव स्वतः वीर सावरकरांनाहि तेव्हांपासूनच वाटत आली आहे. तथापि ते रत्नागिरीस स्थलबद्ध होते तोंवर त्यांना राजकारणी लिखाण नुसतें लिहून ठेवण्यास सुद्धां प्रतिबंध होता. आणि वीर सावरकरांचें आत्मचरित्र म्हणजे तर होतें मूर्तिमंत राजकारण! अर्थात् त्या स्थलबद्धतेच्या अडचणींत असेतों त्यांना आरंभापासून सुसंगत क्रमानें आत्मचरित्र लिहितां येणें सुद्धां दुर्घट होतें. मग त्याचे प्रसिद्धीकरणाची गोष्टच दूर! तरीहि शक्यतों राजकारणात्मक संबंध टाळून त्यांनीं त्यांच्या आत्मवृत्तांतले आधले मधले कांहीं भाग रत्नागिरींतच लिहून काढले. आणि त्यापैकीं 'माझी जन्मठेप' हा ग्रंथ प्रसिद्धहि केला. पण त्या लोकप्रिय ग्रंथाचा महाराष्ट्रभर इतका गाजावाजा झाला कीं थोड्याच काळांत तो ग्रंथ ब्रिटिश शासनाच्या डोळ्यांवर येऊन वीर सावरकरांच्या अनेक ग्रंथांप्रमाणें राजहृत (जप्त) करण्यांत आला. त्यामुळें स्थलबद्ध असेतों आत्मवृत्त लिहिण्याचा उद्योग वीर सावरकरांना अगदीं सोडून द्यावा लागला.

पुढें १३-१४ वर्षांनंतर सन १९३७ मध्यें त्यांची रत्नागिरींतून बिनअट सुटका झाली. परंतु तशी सुटका होतांच वीर सावरकरांनीं अखिल भारतव्यापी अशा सक्रिय राजकारणांतच लगोलग उडी घेतली. अर्थातच त्यांचे मतें आत्मवृत्त लिहिण्याचें काम 'दुय्यम कर्तव्य' ठरून पुन्हां मागें पडलें.

मध्यंतरीं रत्नागिरीस आधींच लिहून ठेवलेले 'भगूर' आणि 'नाशिक' हे दोन खंड तेवढे पुण्याचे श्री. पाध्ये यांनीं त्यांच्या 'व्हीनस प्रकाशन' मध्यें प्रसिद्ध केले आहेत.

आतां मात्र हें आत्मवृत्त लिहिण्याचें कार्य हातीं घेऊन तो ग्रंथ क्रमवार नि सुसंगतपणें प्रसिद्ध करावा असा वीर सावरकरांनीं मनांतल्या मनांत तरी संकल्प सोडलेला आहे. तो सबंध ग्रंथ त्यांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें केव्हां प्रसिद्ध करतां येअील त्याची कांहींच अटकळ सध्यां बांधतां येत नसल्यामुळें त्याचे भाग लिहून होतील तसे तसे लगेच प्रसिद्धून टाकणें हेंच अिष्ट. असें वाटून वीर सावरकरांनीं अलिकडेच लिहून काढलेला त्यांच्या आत्मवृत्ताच्या अगदीं प्रारंभींचा '**माझ्या राजकीय जीवनाची पूर्वपीठिका**' हा प्रास्ताविक भाग प्रसिद्ध करण्याची अनुज्ञा आम्हांस दिलेली आहे.

अनेक प्रकाशकांची मागणी असूनही हा ग्रंथ आम्हांलाच प्रकाशनार्थ मिळाला हा आमचा बहुमान होय असें आम्ही समजतों.

या प्रास्ताविक भागांत साधारणतः सन १८५७ नंतरचा आणि सन १८९९ पर्यंतचा जो कालखंड गेला त्यांतील भारतीय राजकारणाची क्रांतिकारक दृष्टिकोनांतून मीमांसा केलेली आहे. ती अितकी मौलिक, मार्मिक नि अितरत्र सहसा न आढळणारी आहे कीं ती वाचकांना अभ्यसनीय वाटल्यावांचून राहणार नाहीं अशी आम्हांस निश्चिति वाटते.

आत्मवृत्ताचा अुरलेला भाग पुरा करण्यासाठीं नि भारताला आवश्यक तें मार्गदर्शन करण्यासाठीं लागणारें आरोग्य नि विपुल आयुष्य परमेश्वर तात्यारावांना देवो.

गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

**ग. पां. परचुरे**

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्वकृत.
अनुक्रम 29८५४ वि. ...
क्रमांक ... नों. दि. 29.5.56

## प्रकरण पहिलें

# लिहूं का ?

लिहूं का? हे जे सगळे अिष्टमित्र आणि देशबंधू सांगताहेत आणि माझें मनहि मधूनमधून जें लिहिण्याचा लकडा माझ्यामागें लावीत असतें, त्या माझ्या आठवणी, ती माझी जीवनस्मृति लिहून टाकूं का अेकदांची?

मनुष्यास किंवा समाजास स्मृति ही अुपयुक्त असतेच असते. पण वास्तविक पाहतां स्मृतीप्रमाणें विस्मृति हीहि देवाची अेक देणगीच आहे. मनुष्यास किंवा समाजास कांहीं आठवणी स्मरत राहण्यापेक्षां विसरणेंच हितावह असतें. कित्येकांना या जन्माच्या आठवणी स्मरून पुरेसें न वाटल्यामुळें ते पूर्वजन्माच्या आठवणीहि स्मराव्या म्हणून योगसिद्धि साधण्यांत गर्क झालेले असतात. परंतु खरें पाहतां नुसत्या ह्या जन्मांतील झाडून साऱ्या आठवणी जरी आपल्याला सारख्या आठवत राहिल्या, तरी देखील तो बोजा झेंपणें संज्ञ मनास (conscious mind) दुःसह झाल्याविना राहणार नाहीं. मग असंज्ञ मनाच्या (subconscious mind) सात वा सत्तर पूर्वजन्मांच्या स्मृति जर सतत दाटी करीत राहिल्या तर प्राणांचा कोण कोंडमारा होअील! त्या सत्तर जन्मांतील सत्तर सख्ख्या आयांचे लाड, सावत्र आयांचे चोर-चिमटे, खेळांतील वा संसारांतील भंगलेल्या भातुकली वा हरवलेल्या बाहुल्या, पंतोजींच्या छड्या, डसलेले विंचू, फसलेल्या अाशा, ते रोग, ते भोग, ते अपमान, ते मनोभंग, ती चिडचीड, त्या आठवणी पुनः पुन्हा आठवणें, विगत दुःखांचा कोळसा सारखा अुगाळीत बसणें!! अुपलब्ध साहित्यांत आपल्या पूर्वजन्मांच्या थोड्याबहुत जीवनस्मृति बुद्ध भगवानानें सांगितल्या तशा टिपून ठेवल्या आहेत. तेवढ्या त्या त्रोटक जातकांचाच केवढा विस्तार झाला आहे! मग जर बुद्ध भगवानांकरवीं आपल्या यच्चयावत् पूर्वजन्मांच्या आठवणी तशाच सांगण्याची नि लिहून ठेवविण्याची कृपा करण्यांत आली असती, तर त्या

ग्रंथास या अुम्या पृथ्वीचेंच अेक ग्रंथालय केलें असतें तरीहि तें सामावण्यास समर्थ होतें ना! कारण कोणाच्याहि पूर्वजन्मांची संख्या अगण्य असल्यामुळें त्यांच्या आठवणींचे खंडहि असंख्यच असणार!!

ही गोष्ट झाली अेका बुद्ध भगवानाची. पण जर का जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्यास, आमच्या कांहीं थिऑसॉफिस्ट मित्रांना आठवल्याशा वाटतात, तशा जन्मजन्मांतरींच्या झाडून सगळ्या स्मृति आठवूं लागल्या आणि दुर्दैवानें तो प्रत्येकजण त्या लिहून प्रसिद्ध करण्याच्या मोहासही बळी पडत गेला, तर मनुष्य जातींच्यां नुसत्या या पिढीच्या सरासरी १५० कोटी लोकांचीं तीं प्रत्येकीं असंख्य जातकें!—त्यांच्या वाचनाची तर गोष्टच दूर, पण त्यांच्या नुसत्या संख्येच्या कल्पनेनें सुद्धां कोणासहि घेरी आल्यावांचून राहणार नाहीं. पौराणिक परंपरेनें बोलायचें तर, रक्तबीज राक्षसाप्रमाणें कालाच्या शरीरांतून जो जो क्षणाचा रक्तबिंदु गळतो, त्यांतून त्यांतून आठवणीचा अेक नवानवा राक्षस अुत्पन्न होतो. पौराणिक परिभाषेंत बोलायचें तर, स्मृतीच्या याच अत्याचारापासून ह्या लोकांचें परित्राण करण्यासाठीं तो क्षणाचा रक्तबिंदु पडतांपडतांच गिळून नाहींसा करणाऱ्या देवी विस्मृतीचा अवतार झाला म्हणून बरें! खरोखर स्मृतीप्रमाणें विस्मृति हीहि देवाची देणगीच आहे.

प्राचीन अितिहास म्हणजेच समाजाच्या ज्या जन्मार्जित आठवणी, त्यांची गोष्ट अशीच आहे. प्राचीन अितिहास सांपडत नाहीं, म्हणून आपणास केव्हां केव्हां फार तळमळ लागते. अितिहास कसा वाचावा ह्याचा विवेक जोंवर कळला नाहीं तोंवर, अेका अर्थीं आपणास त्यांतील कांहीं भागांचें साफ-विस्मरण पडलें आहे हेंहि बरेंच नाहीं का? कारण आज रावणाची लंका कोणची हें जर अैतिहासिक निश्चिततेनें सांगतां आलें, तर त्या देशांतील लोकांच्या मनांत आम्हां आर्यांविषयीं थोडाफार तरी द्वेष अुत्पन्न होअून नव्या भांडणास जुन्या भांडणाच्या सहाणेवर घांसून धार लावली जाणारच नाहीं, असें कोण सांगूं शकेल? ही अगदीं कल्पनाच नाहीं. त्याच रामायण कथेच्या स्मृतीमुळें आम्हीं आर्य अजूनपर्यंत माकडांचे लाड करतों; त्यांस प्रसंगीं माणसांनाहि सुखैनेव त्रास देअूं देतों; आतांच अेके ठिकाणीं घडलें, तसें माकडाला सोडविण्यासाठीं दंगा करून माणसांना देखील ठार मारतों; आणि अशा प्रकारें अेका अर्थीं सुग्रीवहनुमंतादिकीं रामचंद्राशीं केलेल्या पौराणिक संधीस अजूनपर्यंत पाळूं

पाहतों. अुत्तर ध्रुवावरून आर्य हिंदुस्थानांत आले ही अुपपत्ति अैकतांच स्वतःस अनार्य कल्पिणार्‍यांनीं आजच्या तथाकथित आर्य मानल्या जाणार्‍या जातींना 'परचात् हिंदु' लेखलें आणि आपणास 'आदि द्रविड' 'आदि हिंदु' म्हणविण्यास आरंभ केलाच कीं नाहीं! मग जर त्या प्राचीन काळाची माहिती पौराणिक सांवळागोंधळाचें सोंग अुतरून आपल्या अगदीं खर्‍या अैतिहासिक स्वरूपांत प्रकट झाली आणि कोण मूळचा अनार्य, कोण आर्य, कोण असुर, कोण दनुज, कोण हूण, कोण शक, कोण द्रविड ह्याची निर्भेळ वंशावळ घरोघर अकस्मात् प्रकट झाली, तर आज केवढा गोंधळ माजेल! कित्येक ब्राह्मण जातीहि शुद्धीकृत 'शक' वा मघ ठरतील, क्षत्रिय हूण ठरतील! सासरचे लोक आर्य तर माहेरचे नागवंशी वा पैशाच्च!

'जें झालें तें झालें! तें विसरून जाअू या!!!' हें वाक्य मनापासून अुच्चारतांच आजवर किती तुटलेले स्नेह पुन्हा जुळले आहेत, किती अनुतप्त प्रणय पुन्हा अनुरक्त झालेले आहेत! खरोखरच स्मृतीप्रमाणेंच विस्मृति हीहि देवाची अेक देणगीच आहे.

देवानें दिलेल्या या परस्परविरुद्ध दोन्ही देणग्यांचा मनुष्यानें तारतम्यानें अुपयोग केला तर त्या दोन्हीहि त्याच्या जीवनास अुपयुक्त झाल्यावांचून राहत नाहींत. पण जर आपण सगळेचजण सर्वच काळ मागच्या गोष्टी आठवीत राहिलों, किंवा विसरत राहिलों, तर आपलें जीवन अधिक दुःसह किंबहुना असह्य होअून जाअील.

या तारतम्यानें पाहिलें असतां माझ्या आठवणी सार्वजनिकरीत्या ग्रथन करून ठेवणें सार्वजनिक हिताचें आहे का? हा प्रश्न व्यक्तीपुरता नाहीं. कारण व्यक्तीला ज्या आठवणी सुखावह किंवा हितावह वाटतात, त्या ती व्यक्ति स्वतःपुरती आठवीत राहण्यास, जोंवर त्यांचा दुसर्‍यांना कांहीं अुपसर्ग पोंचत नाहीं तोंवर तरी स्वतंत्र आहेच; तिनें आपल्यापुरत्या त्या आठविल्या काय नि न आठविल्या काय, त्याचा जनिक साहित्याशीं संबंध नाहीं. व्यक्तीपुरत्या ज्या आठवल्या जातात, त्या आठवणी सोडल्या तर कुटुंब, कुल वा वंश यांचा संबंध पोंचतो अशा आठवणींचा प्रश्न अुद्‌भवतो. चीन देशांत अशी रीत असल्याचें सांगतात कीं, प्रत्येक कुटुंबांत श्राद्धदिनासारख्या अेका संस्कारप्रसंगीं त्या कुळांतील अेका मृत व्यक्तीचा, आपल्या श्राद्धपद्धतीसारखा नुसता नामोच्चार करून न

थोरवतां तिच्या चरित्राची त्रोटक कथा वाचण्यांत येते आणि सर्व कुटुंब ती अैकतें. हें लिखाण म्हणजे कौटुंबिक अितिहास होत. परंतु त्यांतील बहुतेक भाग कुटुंबापुरताच महत्त्वाचा असल्यामुळें त्यांच्या छपाअीचा आणि वाचनाचा भार जनिक साहित्याच्या वा वाचकवर्गाच्या डोकांडीं बसविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण अगदीं सर्वसाधारण जीवनक्रमांतील सहस्रावधि माणसांचीं चरित्रें बहुधा अेकठशीच असतात. जन्म, रोग, लग्न, मुलें, मृत्यु, त्याविषयींच्या क्षुधा, शांति, भावभावना, सगळ्या ठराविकच. अशा अेकाच्या चरित्राची पोथी, म्हणजे विशेष नांवें तेवढीं बदललीं, तर तशा दुसऱ्या कोणाच्याहि चरित्राची बहुतांशींची यथावत् प्रतच. अशीं चरित्रें कौटुंबिक हितार्थ कुटुंबापुरतीं राहोत, त्यांतील कांहींचा क्वचित् प्रसंगीं अनुवंशविज्ञानाच्या अभ्यासकांना कांहीं अुपयोग झाला तर होतो. अेवढाच त्यांचा जनिक अुपयोग.

वैयक्तिक व कौटुंबिक क्षेत्रापुरताच ज्यांचा असा व्याप असतो, त्यांची गोष्ट सोडली असतां ज्यांच्या जीवनाशीं अेखाद्या राष्ट्राचे, किंवा मनुष्यजातीच्याच जीवनाचे धागेदोरे निगडित झालेले असतात अशा सार्वजनिक व्यक्तींच्या चरित्राचा आणि आठवणींचा प्रश्न येतो. अशांचें जीवन म्हणजे लाखों व्यक्तींच्या जीवनाचें संकलित सारच असतें. केव्हां केव्हां तसें अेक जीवन म्हणजेच त्या अुम्या पिढीचा अितिहास होतो. अशोक किंवा आल्फ्रेड दी ग्रेटचें चरित्र वगळलें तर त्या पिढीच्या अितिहासाचें तें पानचें पानच फाडून टाकावें लागेल. सर्वसाधारणतः असें म्हणतां येअील कीं ज्यांच्या जीवनाचा लोकजीवनावर कोणचा तरी परिणामकारक प्रभाव पडलेला आहे, अशांच्या स्मृति आणि अशांच्या आठवणी मात्र जनिक प्रसिद्धीस पात्र आणि जनिक हितार्थच चिरस्मरणीय ठरतात. यास्तव राष्ट्रांच्या आणि मानुषकांच्या समाअिक साहित्यांत यथाप्रमाण स्थान प्राप्त होण्याचा त्यांना अधिकार आहे. अशा व्यक्तीं-पैकीं कांहींनीं जीवनस्मृती किंवा आत्मचरित्रें सार्वजनिक हितार्थ ग्रथित करून प्रसिद्ध केलीं तर लोकजिज्ञासेच्या आणि वाङ्मयाच्या सहनशीलतेचा अनुचित लाभ घेतल्याच्या दोषाचे ते भागी होणारे नसून अुलट आपल्या आकांक्षा आणि ध्येय, प्रयत्न आणि पराक्रम, न्यूनता आणि सांगता, यांच्या माहितीची ठेव पुढील पिढीच्या हितार्थ त्यांच्या हातीं सोंपवून देण्यांत ते त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचें शेवटचें श्रेयस्कर कर्तव्यच करीत असतात.

माझ्या आठवणी, जीवनस्मृति, या वरील तीन वर्गांपैकीं ह्या शेवटच्या वर्गांत पडत असतील तरच त्यांना वैयक्तिक मरणाबरोबर विस्मृतीच्या राखेंत नाहींशा न करतां जनिक स्मृतीच्या संग्रहालयांत राखून ठेवण्याचा यत्न करणें अुचित होणार आहे. मग त्या तशा ह्या वर्गांत पडताहेत का ?

मनुष्यमात्राच्या मनास आपली कर्मकथा विशेषतः स्वतःच्या प्रौढीला अनुकूल असेल तेवढी तरी, भेटेल त्याला सांगत सुटण्याचा मोह सहसा आवरत नसतो. तो मोह शक्य तितक्या विवेकानें दाबून ठेवून, ममत्वशून्य दृष्टीनें मी माझ्या आत्मचरित्राचें तटस्थपणें जों जों समालोचन करतों, तों तों मला असें वाटतें कीं माझें जीवन त्याच्या अगदीं जाणत्या आरंभापासून भारतीय राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाशीं संबद्ध झालेलें आहे. अितकेंच नव्हे, तर पुढेंपुढें त्या राष्ट्रीय जीवनाचा, तें माझें व्यक्तिजीवन अेक प्रमुख आणि परिणामकारक घटक होत आलें आहे. माझ्या गुरुस्थानीं असलेल्या वयस्क पिढींतील अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांचा माझ्याशीं संबंध आलेला असल्यानें, माझ्या समकालीन पिढींतील लक्षावधि तरुणांच्या आयुष्याची दिशा पालटून जावी, अितका त्यांच्यावर माझ्या मतांचा, प्रयत्नांचा आणि सहवासाचा अप्रत्यक्ष वा प्रत्यक्षपणें परिणाम झालेला असल्यानें आणि माझ्या आयुष्यांतील अनेक मोठमोठ्या राष्ट्रीय अुलाढालींत प्रमुख भाग घेण्याचा प्रसंग मजवर वारंवार येत गेल्यानें, माझ्या चरित्राचा बनाव आणि घडाव कसाकसा होत गेला याचा माझ्या तोंडचा वृत्तांत ह्या त्या काळाच्या राष्ट्रीय अितिहासाच्या रचनेस अुपयुक्त झाल्यावांचून हारणार नाहीं. माझ्या आठवणी केवळ माझ्या अेकट्याचेंच चरित्र सांगणाऱ्या नसून अुभ्या दोनतीन पिढ्यांचें जीवन त्यांत प्रतिबिंबित होणारें आहे. आणखी असें कीं मीं सांगितली नाहीं तर बहुधा ज्यांच्या गुप्त पण अुत्कट राष्ट्रसेवेची आणि महनीय त्यागाची माहिती लोकांस कळणारी नाहीं, अशा अनेक लोकसेवक, त्यागी शूर नि साधुपुरुषांच्या स्मृती प्रकटपणें सन्मानून त्यांच्याविषयींच्या कृतज्ञतेचें ऋण अंशतः तरी फेडण्यासहि या माझ्या आठवणी कारणीभूत होणाऱ्या आहेत. अितकेंच नव्हे, तर ज्या सशस्त्र क्रांतीच्या अत्यंत जाज्वल्य आणि भव्य अशा राष्ट्रीय भवितव्यतेच्या आंदोलनांतून माझा विशेषत्वेंकरून संबंध आलेला आहे त्या अुत्थानाच्या अितिहासाचाहि बराच अंश लोकांना अज्ञात आहे. बंगालच्या बऱ्याच देशभक्तांनीं त्यांचा त्यांच्यापुरता भाग जरी सांगून टाकला आहे, तरी

बाकीचा कितीतरी भाग तज्ज्ञ असे कांहींजण सांगावयास अुरले नाहींत, कांहीं सांगूं शकले नाहींत. विपक्षीय शक्तींनें तर त्या सशस्त्र क्रांतिकारक अुत्थानाची आठवण देखील मुळासकट नाहींशी व्हावी म्हणून तोंडदाबीच विडाच अुचललेला! अशा वेळीं त्या अितिहासावर माझ्या आठवणींनीं पाडवेल तितका प्रकाश पाडणें हें अेक राष्ट्रीय कर्तव्य देखील अितकें अत्यजनीय आहे कीं केवळ तदर्थहि ह्या माझ्या आठवणी माझ्यासमवेत नष्ट होअूं देणें अनुचित होअील.

त्यांतहि माझें चरित्र मूलतःच अशा कांहीं आकस्मिक, कांहीं अद्भुत, कांहीं अुत्क्षोभक विद्युत तंतूंनीं विणलेलें आहे आणि प्रकंपक सुखदुःखाच्या रंगां-वेरंगांनीं त्याची अशी सजावट झाली आहे कीं त्याच्या नुसत्या अुद्दीपक मनोवेधकपणासाठीं सुद्धां साहित्यांत त्याची भर टाकण्यास प्रत्यवाय नाहीं.

अशा रीतीनें ज्या अर्थीं माझ्या आठवणी या अेकदोन पिढ्यांना तरी अुद्बोधक आणि मनोवेधक वाटल्यावांचून राहणार नाहींत त्या अर्थीं मी त्या लिहून काढण्याचें ठरवीत आहें. ह्या अेकदोन पिढ्यांनंतर जर जनिक साहित्यांत त्यांची अडगळ होअूं लागलीच, तर ती काढून टाकण्याचा प्रश्न काळ आपण होअूनच सोडवील. कारण व्यक्तीच्या आयुष्याला जशी काळाची मर्यादा असते, तशीच ती त्या व्यक्तीच्या मागें अुरणाऱ्या तिच्या जीवनस्मृतीच्या आयुष्यालाहि असतेच. व्यक्ति काय, व्यक्तिस्मृति काय, निर्जीव आणि निरुपयोगी जुन्याला नाहींसें करून पृथ्वीचा अवकाश नवीनाला नांदावयास काळ हा मोकळा करून देतच असतो!

सार्वजनिक अुपयुक्ततेस्तव आठवणी प्रसिद्ध करावयाच्या, तर त्या मनुष्याच्या जीवनांत जशा घडल्या आणि ज्या ज्या घडल्या त्या समग्र प्रसिद्ध करणें हेंच प्रामाणिक लेखकाचें कर्तव्य होय. केवळ लोकांत प्रौढी वाढेल तितकाच भाग प्रसिद्ध करणें हा मिथ्याचार; तें लोकप्रियतेचें दास्य, लोकहित-तत्परतेचें खरें गमक नव्हे. कारण मनुष्याचें अेकंदर शरीर हें त्याच्या सहज किंवा प्राप्त अशा सर्व रोगाभोगांच्या संक्लिष्ट संघर्षाचा ज्याप्रमाणें अुत्क्रांत परिणाम असतो त्याचप्रमाणें त्याचें प्रत्येक कृत्य हें त्याच्या तथाकथित गुणाव-गुणांच्या संक्लिष्ट संघर्षाचें, त्याच्या झाडून साऱ्या भावभावनांचें संमिश्र फलित असतें. कोणास वाटणाऱ्या त्याच्या गुणांच्या अुत्कर्षासच अितरांना वाटणाऱ्या त्याच्या अवगुणांचें सान्निध्य किंवा सहकार्यहि कारणीभूत झालेलें

असतें आणि त्याचे अवगुण त्याच्या गुणांच्या बीजांचीच क्वचित् अपरिहार्य अशीं अनुषंगिक रूपांतरें असतात. आपण ज्यास भूस म्हणून पाखडून टाकूं पहातों, त्याच्या संरक्षणामुळेंच आपण ज्यास दाणे म्हणून टिपूं पहातों त्यांची वाढ झालेली असते. टाकाऊ मळामातीचें खतहि गुलाबाच्या फुलांतील लोभनीय सौंदर्याचें आणि सुवासाचें एक अपरिहार्य घटक असतें. जर आपणास गुलाबाच्या फुलाच्या विकासाचें समग्र रहस्य समजून घ्यायचें असेल, तर त्यांत मूळापासून कळीपर्यंत खतमाती, पानपाचोळा, कुसळकांटे त्याचें अंगप्रत्यंग असलेलीं हीं सर्व आनुषंगिक अुत्पादितेंहि विचारांत घेतलीं पाहिजेत. त्यांची माहिती आणि महत्त्वहि जाणलें पाहिजे. त्याप्रमाणें मनुष्याच्या घडावाचीहि गोष्ट आहे. त्या घडावाची घडण कशी होत गेली हें जर खरोखर समजून घ्यायचें असेल, तर त्याच्या लोकांस थोर वाटणाऱ्या किंवा अुचित भासणाऱ्या जीवनस्मृतीच प्रसिद्ध करून भागावयाचें नाहीं, तर तो जसा होता तशाचा तसाच नखशिखांत आपल्या-पुढें अुभा केला पाहिजे. छायाचित्रकारांत अुत्तम तोच कीं जो, मनुष्य असेल तशीच त्याची छाया घेतो, न अधिक सरस न अधिक नीरस. म्हणूनच क्रॉम्वेलनें आपल्या चित्रकारास निक्षून सांगितलें कीं 'मी आहें तसा काढ, अेक सुरकुती देखील सोडूं नकोस !' कारण सूक्ष्मतः पाहिलें असतां क्रॉम्वेलच्या घडणींत नि करणींत त्याच्या तजेल्याप्रमाणेंच त्याच्या सुरकुत्यांचेंहि अंग होतें.

आत्मवृत्त सांगणारास त्याचें समग्र चरित्र, आपणास वा लोकांस आवडतो तो तोच भाग नव्हे तर साऱ्या सांगण्यासारख्या बऱ्यावाअीट आठवणी यथावत् सांगणें हेंच जरी वरील कारणासाठीं शास्त्रतः आणि तत्त्वतः अुचित असलें, तरी आजवर ज्या ज्या थोर पुरुषांनीं आपलीं चरित्रें सांगितलीं, त्यांना हा नियम यथावत् पाळणें केव्हां शक्य झालें नाहीं, केव्हां अिष्टहि वाटलें नाहीं. कारण सत्य हें परिस्थितीनें असेंच सापेक्षत्व पावतें, मर्यादित होतें. आमची आवड आमच्या लोकजीवनाशीं संबद्ध असलेल्या आणि म्हणूनच सांगण्यासारख्या बऱ्यावाअीट आठवणी निःसंकोचपणें आणि निर्भयपणें जशाच्या तशा सांगून टाकण्याची असतांहि, ज्या समाजस्थितींत आणि विशेषतः राजकीय परिस्थितींत आम्हांस हें आत्मचरित्र लिहावें लागत आहे, त्यामुळें आम्हांसहि ती आमची आवड अंशतः तरी बाजूस ठेवावी लागणार आहे. त्याचें अेक कारण अुघडच आहे कीं आमच्याशीं ज्या व्यक्तींचा संबंध आला आहे, त्यांच्या अनुमतीवांचून

त्यांच्या त्या त्या संबंधांची परिस्फुटता करणें हा त्यांच्याशीं केव्हां केव्हां अगदीं विश्वासघात केल्यासारखें होणारें आहे. दुष्ट दुर्जन सज्जनांच्या प्रामाणिक सत्याचाहि दुरुपयोग करण्यास जोंवर कचरत नाहींत, तोंवर सत्याला व्यवहाराची बेडी तोडून स्वतंत्रपणें नांदतां येणें असेंच दुर्घट होणार. अशा पेंचांत आम्ही ह्या आमच्या आठवणी लिहिण्याच्या आधीं अितकीच प्रतिज्ञा करूं शकतों कीं आम्ही ज्या सांगू त्या आठवणी तरी जशा आठवतात तशाच सांगूं; केवळ लोकच्छंदानुवर्तित्वास्तव त्यांत नसती रंगरंगोटी करणार नाहीं. स्पष्ट आठवत असलेल्या आठवणींतून कधींकधीं अस्पष्टस्मृत किंवा अगदीं अस्मृत आठवणीहि सर्वांनाच जशा गृहीत धराव्या लागतात त्या आम्हीहि गृहीत धरूं, आणि ज्या आज सांगतां येत नाहींत, त्या सांगण्यासारख्या महत्वाच्या किंवा मनोवेधक आठवणींवरील गुप्ततेचा पडदाहि शक्य झालें तर पुढें मागें दुसऱ्या अेखाद्या प्रसंगीं दूर सारूं.

## प्रकरण दुसरें

# सन १८५७ नंतरचें राजकारण

माझ्या क्रांतिनिष्ठ राजकीय जीवनाचा अुगम, विकास नि कार्यक्रम हा माझ्या जन्माच्या पूर्वींच्या काळांतील राजकीय अुलाढालींचा नि परिस्थितीचा अेक परिणाम होता, परिपाक होता; प्रतिक्रिया किंवा अनुक्रिया होती. विशेषतः ब्रिटिशांची सत्ता हिंदुस्थानांत प्रस्थापित झाल्यानंतर तिला अुलथून टाकून हिंदुस्थानचें राजकीय स्वातंत्र्य पुन्हां संपादिण्यास्तव राज्यक्रांतीचे जे जे लहान-मोठे अुठाव झाले त्यांच्या परंपरेस अवश्य त्या त्या प्रमाणांत समजून घेतल्या-वांचून, त्यांचें समालोचन केल्यावांचून माझ्या क्रांतिनिष्ठ राजकीय जीवनाच्या घडणीचा नि त्यांतील घटनांचा कार्यकारणभाव नीटपणें विशदिला जाणार नाहीं आणि त्याचें मूल्यमापनहि यथाप्रमाण करतां येणार नाहीं.

रणजितसिंगाचें राज्य जिंकून पंजाबप्रांत जेव्हां ब्रिटिश सत्तेखालीं आला तेव्हां साऱ्या हिंदुस्थानवर ब्रिटिशांचें खरेंखुरें अेकसूत्री राज्य चालू झालें. त्या ब्रिटिशांच्या दास्यांतून आपली मातृभूमि मुक्त करण्यासाठीं हिंदी सशस्त्र क्रांतिकारकांची जी पहिली प्रचंड अुठावणी झाली ती सन १८५७ मध्यें होय. त्या अुठावणीची अुग्रता नि विस्तार वाढतां वाढतां तिला अिंग्लंडच्या नि हिंदुस्थानच्या अितिहासांना ज्याचा कधींहि विसर पडणार नाहीं अशा तुंबळ युद्धाचें स्वरूप आलें. वास्तविक पहातां वर अुल्लेखिलेल्या माझ्या चरित्राच्या भूतकालीन पूर्वपीठिकेचें, पृष्ठभूमिकेचें समालोचन ह्या १८५७ च्या तुंबळ क्रांतियुद्धापासूनच करावयास हवें होतें.

परंतु त्या १८५७ च्या क्रांतियुद्धाचा समग्र अितिहास नि सांगोपांग समालो-चन मीं माझ्या 'War of Indian Independence' (सत्तावनचें स्वातंत्र्य-समर) या ग्रंथांत आधींच केलेलें असल्यामुळें तें आतां या ग्रंथांत पुन्हा करण्याचें कारण अुरलें नाहीं. यास्तव १८५७ च्या त्या पहिल्या प्रचंड क्रांतियुद्धाचा

अुपशम झाल्यानंतरच्या म्हणजे साधारणतः सन १८६० पासून तों माझ्या राजकीय जीवनाचा जाणीव प्रारंभ होअीपर्यंत म्हणजे सन १८९५ च्या अंतापर्यंतचा जो कालखंड अुरतो त्या काळांत झालेल्या हिंदुस्थानांतील राजकीय आंदोलनांचें नि राज्यक्रांतिकारक सशस्त्र अुठावांचें, माझ्या ह्या 'आत्मवृत्ता'ची पृष्ठभूमि नि पूर्वपीठिका विशदविण्यास अवश्य तितकें समालोचन मी प्रथम करूं अिच्छितों.

## हिंदी सैन्याची कायापालट आणि जानपदाचें निःशस्त्रीकरण

सत्तावनच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांत भारतीय क्रांतिकारकांचा मोड होअून ब्रिटिशांचा विजय झाल्यानंतर हिंदुस्थानच्या पायांत ब्रिटिशसाम्राज्यसत्तेच्या बेड्या पहिल्याहूनहि अधिक बळकटपणें जखडून टाकण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. प्रथम सैन्याची कायापालट केली. ज्या जातींचे सैनिक किंवा लोक, ब्रिटिश हिंदुस्थानांत आले तेव्हांपासूनच किंवा सत्तावनच्या त्या स्वातंत्र्ययुद्धांत ब्रिटिशांशीं शत्रुत्व करावयास किंवा प्राणांतापर्यंत लढावयास कचरले नाहींत त्या त्या जातींतील लोकांना ब्रिटिश सैन्यांत शक्य तों भरती करावयाचें नाहीं असें ठरविलें. त्याप्रमाणें मराठ्यांना सैन्यांत सरसकट प्रवेश मिळेनासा झाला. त्यांतहि चित्पावनांना तर खड्यासारखे वेंचून मज्जाव करण्यांत येअूं लागला. आणि तें कां? तर मराठी लोक अिंग्रजांशीं शत्रुत्व करीत किंवा सत्तावनच्या क्रांतियुद्धांतले धुरीणांतले धुरीण होते तेच : असें खरें कारण सांगून नव्हे: तर मराठी लोक म्हणे 'सैनिकी जातीचे' नव्हेत म्हणून! म्हणून ते बिनलढाअू 'Non Military' वर्गांत 'Unlisted Classes'च्या टिपणींत हळूहळू घातले गेले! सत्तावनांत ज्या पलटणी बंड करून अुठल्या त्यांत अुत्तरेकडील पुरभय्या ब्राह्मणांचा भरणा असे नि अिंग्रजांशीं ते कट्टरपणें लढले. म्हणून त्यांनाहि अिंग्रजी सैन्यांत फारसे घेअीनासे झाले. पंजाबचे शीख नि नेपाळचे गुरखे हे अिंग्लिशांशीं त्या सत्तावनच्या युद्धांत अत्यंत राजनिष्ठपणें वागले आणि क्रांतिकारकांचा पराभव करण्याचे कामीं त्या शीख नि गुरखा पलटणींनीं मोठें शौर्य गाजविलें ह्यास्तव शासनीय सैन्यांत त्यांना मोठमोठे मानसन्मान देण्यांत येअून त्यापुढें त्यांची विशेष भरती होअूं लागली. त्याचप्रमाणें पठाणी, पंजाबी नि बलुची मुसलमानांचाहि भरणा सैन्यांत सारखा वाढता ठेवला. कारण अेकतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २९८५४ वि: .....
क्रमांक ....... नों: दि: .....
आत्मवृत्त : ११?

सत्तावनच्या क्रांतींत त्यांनीं अिंग्रजांना पाठिंबा दिला होता आणि दुसरें असें कीं सैन्यांतील वा बाहेरील हिंदुगट जर क्वचित् बिघडला तर ज्यांच्या रक्तांत हिंदुद्वेष हा जन्मतःच भिनलेला आहे असें हें पठाण, पंजाबी, बलुची मुस्लिमांचें सैन्य त्या हिंदूंचा कांटा काढून टाकण्यास निःशंकपणें अुपयोगीं पडावें. हिंदुस्थानांतील सैन्याची आपणास अनुकूल अशी ही नवी घडी घातल्यानंतर अिंग्रजांनीं सार्‍या देशांतील यच्चयावत् नागरिकांना निःशस्त्र करून टाकलें. याप्रमाणें अिंग्लिशांविरुद्ध सत्तावन सारखी सशस्त्र क्रांतीची शक्यता, हिंदी लोकांचे हातीं शस्त्रसाधनच न ठेवल्यामुळें बहुतांशीं नाहींशी केली.

पण अिंग्रज अितक्यावरच थांबले नाहींत. ब्रिटिश हिंदुस्थान निःशस्त्र केलें. पण मोठमोठ्या संस्थानांतील लोक निःशस्त्र झालेले नव्हते. त्यांच्यापाशीं कशीं का असेनात पण संघटित सैन्यें होतीं. अिंग्रजांचा रशियासारखा अेखादा प्रबळ शत्रु हिंदुस्थानावर स्वारी करून आला नि हिंदुस्थानांतील थोड्या भागांत जरी त्याचा प्रवेश झाला तर तो लोकांना शस्त्रें पुरवूं शकता. म्हणून सशस्त्र क्रांतीचीं नुसतीं साधनें हातांतून छिनावून स्वस्थ न बसतां तशा सशस्त्र क्रांतीची अिच्छाच जर हिंदी लोकांच्या हृदयांतून छिनावून घेतां आली तर मात्र अशी क्रांति होण्याचें भय जवळजवळ निर्मूलन करतां येअील, असा विचार अिंग्लिशांतील कारस्थानी लोकांमध्यें पूर्वीपासूनच चालू असे. ह्या प्रकरणीं अितिहासामध्यें जगांतील कित्येक भागांत परिणामकारक ठरलेला अुपाय म्हणजे जितांचें मनहि जिंकून टाकणें हा होय. जितांची विशेषतः तरुण पिढी जेत्यांच्या धर्मामध्यें नि संस्कृतीमध्यें मुळापासूनच वाढवून; त्यांना जेत्यांविषयीं आपुलकी वाटावी असें शिक्षण देअून; आपलें राज्य गेलें तेंच बरें झालें, ह्या परक्यांचे राज्यांतच आपलें हित असल्यामुळें त्या विरुद्ध बंड करणें म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणें होय, अशी त्या जितांतील पुढारलेल्या पिढीची मनःप्रवृत्ति घडविली पाहिजे. त्यांचें मनच मारून टाकून किंवा भारून टाकून शस्त्रादिक साधनें कोणीं आणून दिलीं तरीसुद्धां क्रांति करावयाची अिच्छाच त्या जितांना होअूं नये; हळू हळू आपण जित आहोंत ह्याची जाणीवहि त्यांना झोंबेनाशी व्हावी आणि 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' असा आपल्या जेत्यांचाच अुदोअुदो त्यांनीं भक्तिभावानें करूं लागावें अशा कूट हेतूनें अिंग्रजी राज्य थोडें स्थिरस्थावर होतांच मेकाले प्रभृति ब्रिटिश कारस्थान्यांनीं अिंग्रजी शिक्षण

आणि मिशनऱ्यांनीं आपलीं मिशनें सत्तावनचे पूर्वींपासून चालूं केलीं होतीं, पैकीं, सत्तावनच्या क्रांतियुद्धामुळें धर्मांतराच्या मिशनांच्या अुपद्र्व्यापास मोठाच पायबंद बसला. परंतु अिंग्रजी शिक्षणाचा व्याप मात्र प्रचंड प्रमाणावर साऱ्या हिंदुस्थानभर वाढत गेला.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्ता चिरस्थायी नि बिनधोक करण्यासाठीं आणि सत्तावनसारख्या सशस्त्र क्रांतीचे अुठाव अशक्य होअून जावे म्हणून अिंग्रजांनीं जे वरील अनेक अुपाय योजले त्यांचे परिणाम निरनिराळ्या प्रांतांवर तेथील अैतिहासिक, सामाजिक नि स्वाभाविक भेदांमुळें निरनिराळे होत गेले. यासाठीं आम्हास अभिप्रेत असलेल्या दृष्टिकोनांतून येथें प्रथमतः साधारणपणें सन १८६० ते १८८४ पर्यंतच्या राजकीय परिस्थितीची आणि तिच्या संदर्भानें ओघांत येणाऱ्या कांहीं अवांतर अुपायांची प्रांतवार पहाणी करूं.

प्रकरण तिसरें

# राजकीय परिस्थितीची पहाणी

(सन १८६० ते सन १८८४)

## बंगाल, मद्रास, आंध्र, कर्नाटक, गुजराथ, बिहार नि अुत्तर-प्रदेश

## बंगाल

अुणींपुरीं पांचशें वर्षे मुसलमानांच्या राजवटींत धार्मिक नि सामाजिक अत्याचारांच्या असह्य छळानें पिचून गेलेली बंगाली हिंदु जनता अिंग्रजी आक्रमणास प्रथमपासूनच कोणताहि सबळ विरोध करूं शकली नाहीं. तेथील मुसल्मानी जनता नि राजसत्ताहि अिंग्रजांशीं तुलना करूं जातां अितकी दुर्बळ, निर्बुद्ध नि भ्याड झालेली होती कीं अेकहि म्हणण्यासारखी लढाअी लढावी न लागतां अिंग्रजांनीं तो प्रांत हस्तगत करून टाकला. शतकोशतकांच्या पारतंत्र्यांत खितपत पडत आलेल्या बंगाली हिंदु जनतेला स्वातंत्र्याची वा स्वराज्याची आठवणसुद्धां अुरलेली नसल्यामुळें मुसलमानांच्या दास्यांतून ती जेव्हां अलगत अिंग्रजांच्या दास्यांत पडली तेव्हां, त्या दोन परदास्यांचीच काय ती तुलना त्यांना करतां आली. त्या तुलनेंत मुसलमानांच्या दास्यांत जी अंदाधुंद बेबंदशाही नि असह्य धर्मछळ चालू होता त्याचा अुपद्रव तरी जींत तुलनेनें अगदीं अुणावला गेला ती नवी अिंग्रजी राजवट बंगाली हिंदूंना हवीशी वाटूं लागली. अिंग्रजांपुढें मुसलमानी धर्मोन्मादानें नांगी टाकली. दुर्बलांपुढेंच काय ती अेट दाखविणारी मुसलमानांची अरेरावी अिंग्रजांसारखा सवाअी अरेराव पहातांच त्याचे पाय चाटूं लागली. अेवीतेवी बंगालमध्यें हिंदु आणि मुसलमान हे दोघेहि अिंग्रजांच्या ताटाखालचीं मांजरें बनून गेले. स्वातंत्र्याची

महत्त्वाकांक्षा तर सोडाच पण साधारण राजकीय प्रवृत्तिसुद्धां बंगालमध्यें अेकंदरींत अिंग्रजीसत्तेच्या पहिल्या दशकांतच नाहींशी झाली होती.

ह्या कारणास्तव सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाचा प्रचंड वणवा अन्ध्या हिंदुस्थानांत भडकला असतांहि बंगाली जनतेंत म्हणण्यासारखी अशी अेकहि क्रांतिकारक अुठावणी झाली नाहीं. जिला 'बंगाल आर्मी' म्हणून लौकिक नांव असे त्या सरकारी सैन्याच्या विभागांत क्रांतिकारक कट झाले नि हिंदुस्थानांतील अितर सैन्याप्रमाणें तो विभागहि अिंग्रजांविरुद्ध अुठाव करण्यासाठीं क्रांतिकारकांशीं संगनमत करीत होता हें खरें. परंतु 'बंगाल आर्मी' ह्या लौकिक नांवाचा खरा अर्थ न कळल्यामुळें अनेक जणांचा असा अपसमज होतो कीं बंगालमध्येंहि सत्तावनांत बंगाली लोकांनीं भाग घेतलेला होता. पण हा समज चुकीचा आहे. 'बंगाल आर्मी' म्हणजे बंगाली लोक ज्यांत सैनिक म्हणून भरती केलेले आहेत असा सैन्य-विभाग नव्हे. सैन्यांत सैनिक म्हणून बंगाली लोक असे त्यावेळीं कधीं शिरत नसत, त्यांची 'बंगाली लोकांची पलटण' अशी अुभारलेली नसे. "बंगाल आर्मी" असें जिला लौकिकांत म्हणत तिच्या त्या नांवाचा खरा अर्थ, बंगालमध्यें अिंग्रजांनीं ठेवलेला सैन्यविभाग, अितकाच काय तो होता. त्या विभागांत कांहीं अंशीं अुत्तरेकडच्या पुरभय्या ब्राह्मणांतील सैनिक, कांहीं अुत्तरीय मुसलमान नि कांहीं अितर बिनबंगाली जातीचे सैनिक अशी भरती केलेली होती. तिच्याशीं बंगाली लोकांचा कांहीं संबंध नव्हता.

बंगालमध्यें अिंग्रजी शिक्षण चालू झालें तरी तेथील मुस्लीम समाजानें तिकडे त्याकाळीं ढुंकूनहि पाहिलें नाहीं. ते त्यांच्या मशिदींतून मुल्ला मौलवी जें सांगत त्यांतच रंगलेले राहिले. मुस्लीम धर्माचा जमेल तसा प्रचार, हिंदुद्वेष आणि अिंग्रजाची हांजी हांजी करणें ह्यापलीकडे राजकारण म्हणून कांहीं अेक त्या बंगाली मुसलमानांना अुरलेलें नव्हतें. परंतु बंगाली हिंदु समाजानें मात्र अिंग्रजी शिक्षणांत झपाट्यानें प्रगति केली. त्यामुळें अिंग्रजांना आपली नवी राजवट स्थिरस्थावर करण्यासाठीं जी अिंग्रजी शिक्षित अशा हिंदी हस्तकांची दुय्यम अधिकारी वर्गासाठीं नि लेखनिकांच्या (Clerks) तांड्यासाठीं अुणीव भासत होती ती भरून निघाली. अुलट पक्षीं अिंग्रजी शिक्षितांना लहानमोठ्या चाकऱ्या भराभर मिळत गेल्यानें शाळा-महाशाळांतून (School & College मधून) अिंग्रजी शिक्षण घेणारांची नुसती रीघ लागली.

अनेक बंगाली हिंदु तरुणांनीं थेट विलायतेंत जाऊन ब्रिटिश विश्वविद्यालयांतील पदव्या पटकावल्या. मोठमोठ्या सरकारी चाकऱ्या, वेतनें, मान, अधिकार हेहि त्यांना मिळत चालले. अिंग्रजी शिक्षितांचा असा हा अेक नवा वर्गच समाजांत अुत्पन्न झाला. डॉक्टर, बॅरिस्टर, संपादक, न्यायाधीश प्रभृति लोक त्यांतूनच निघत असल्यामुळें तोच वर्ग बुद्धिवन्त, मानवन्त, धनवन्त असा होत चालला. समाजाचें नवें नेतृत्वहि त्याच वर्गाकडे सहजपणें गेलें. अिंग्रजांना हेंच हवें होतें. कारण अिंग्रजी शिक्षण ज्या कूट हेतूनें अिंग्लिशांनीं चालू केलें होतें म्हणून आम्हीं पूर्वीच्या छेदकांत वर्णिलें आहे त्या हेतूप्रमाणेंच ह्या बंगालमधील भरभराटत चाललेल्या अिंग्रजी शिक्षित नवीन वर्गाचीं मनेंहि अिंग्लिशांनीं जिंकलीं होतीं. अिंग्रजी राजवटीपासून ह्या वर्गाची भरभराट होत चालल्यामुळें त्यांना त्या अिंग्रजी राज्याविषयीं आपुलकी वाटू लागली. तें राज्य तसें टिकण्यांतच आपलें, म्हणजेच आपल्या देशाचें, हित आहे अशी त्यांची मनःपूर्वक भावना होती. ते केवळ राजनिष्ठच नव्हे तर ब्रिटिशनिष्ठ बनले होते. समाजाचें प्रमुखत्व, नेतृत्व नि मार्गदर्शकत्व त्यांच्याकडे आल्यानें समाजावरहि ब्रिटिशांच्या राजवटीविषयीं आपुलकी नि निष्ठा ह्यांचा पगडा बसला. आपण कोणा परक्या जेत्यांचे राजकीय दास आहोंत ही खन्तच वाटेनाशी झाली. अर्थात् अपवाद सोडतां सामूहिकरीत्या बोलावयाचें म्हणजे राजकीय असंतोष किंवा राजकीय चळवळ अशी बंगालमध्यें त्या काळीं अस्तित्वांत नव्हती. मग क्रांतीची, नि त्यांतहि सशस्त्र क्रांतीची गोष्टच काढावयास नको. त्याविषयीं त्या प्रांताकडून त्या काळीं अिंग्लिशांना विशेष चिंता अुरलेली नव्हती.

त्या साधारणतः १८६० ते १८८४ च्या काळांत बंगालमध्यें ह्या अिंग्रजी शिक्षित वर्गाच्या नेतृत्वाखालीं जर कोणचें धामधुमीचें आंदोलन झालें असेल तर तें धार्मिक नि सामाजिक सुधारणेचें. राजा राममोहन राय, टागोर, केशवचंद्र सेन ह्या आणि अितर विख्यात पुढाऱ्यांच्या दोन पिढ्यांच्या प्रयत्नांनीं बंगालमध्यें 'ब्राह्मसमाजाचा' प्रचार, प्रतिष्ठा नि प्रभाव पुष्कळच वाढत आलेला होता. आंग्लशिक्षित हिंदु तरुणांतील बहुसंख्याक युवकांच्या मनावर ब्राह्मसमाजांतील धर्ममतांचा नि आचारांचा पगडा बसलेला होता. बंगालमधील हिंदुसमाजाच्या आंदोलनामुळें धार्मिक, शैक्षणिक नि सामाजिक

जागृति मोठ्या प्रमाणावर झाली आणि अनेक प्रगामी सामाजिक सुधारणा हिंदु-समाजाच्या गळीं उतरविल्या गेल्या हें खरें आहे. परंतु त्या ब्राह्मसमाजाच्या प्रवर्त्तक नि प्रमुख नेत्यांपासून तों सर्वसाधारणतः तरुणांतील तरुण सभासदापर्यंत सर्वांच्या मनोभूमिकेंत ब्रिटिशनिष्ठेचीं पाळेंमुळें इतकीं खोल रुतलीं गेलीं होतीं कीं पुढें पुढें त्यांची राहाणी, आचार, इतकेंच नव्हे तर त्यांचे धर्मविचारहि पाश्चिमात्यांची उष्टि नि उसनी आणलेली शिदोरीच भासावी.

परंतु मिशनऱ्यांनीं केली नाहीं अशी सनातन हिंदुसमाजाची पायमल्ली जेव्हां ब्राह्मसमाजीयांकडून होऊं लागली—आणि तीहि हिंदुत्वावरील सांचलेलें कश्मल झाडून टाकून हिंदुजगतास अधिक तेजस्वी नि ओजस्वी करण्याच्या ममत्वपूर्ण महत्त्वाकांक्षेनें नव्हे, तर आम्ही हिंदुच नाहीं, आमचा ब्राह्मसमाज म्हणजे एका नव्या धर्माचा आविष्कार आहे नि आमचा समाज हा हिंदुसमाजाचा भाग नसून तो एक स्वतंत्र समूह आहे अशा हिंदुजगतांतून फुटून निघण्याच्या उद्दाम धमक्या देत!—तेव्हां सनातन हिंदुसमाजहि खडबडून जागा झाला नि ब्राह्मसमाजाचा कट्टर विरोध करूं लागला.

मिशनऱ्यांचा ब्राह्मसमाजास प्रथमपासूनच पाठिंबा होता. हिंदुसमाजाला खिळखिळें करून सोडण्याचें आपलें काम परस्परम् पावणेंबारा या न्यायानें ब्राह्मसमाजी हिंदूच करीत आहेत हें पाहून मिशनऱ्यांना गुदगुल्या होत. ब्राह्मसमाजी म्हटला कीं तो ब्रिटिशनिष्ठ असणारच अशा निश्चितीमुळें इंग्रज सरकारहि त्या समाजाच्या मोठमोठ्या पुढाऱ्यांना मानमान्यता देई, लोकांचे प्रतिनिधि म्हणून त्यांनाच गौरवी.

अशा स्थितींत ब्राह्म समाजाला परिणामकारक विरोध करणारें असें एकच अस्त्र सनातन्यांच्या हातीं उरलेलें होतें. तें म्हणजे जातिबहिष्कार! आज जरी पूर्वीच्या अनेक आयुधांप्रमाणें हें अस्त्रहि बोथट झालें असलें आणि आतां तें टाकाऊहि झालें आहे हेंच इष्ट असलें तरी त्या काळीं त्याच्या धारेला अनेक मी मी म्हणणारे बेगडी सुधारक चळचळा कांपत असत हें आपल्या इकडील त्या मानानें अगदीं सौम्य असलेल्या पंचहौद मिशनातील रानडे-टिळक प्रकरणावरूनहि ध्यानीं येण्यासारखें आहे. ही बहिष्काराची धामधूम चालू होतांच हिंदूंच्या घराघरांतून अशांतता माजली. जिव्हाळयाच्या नात्यागोत्यांची ताटातूट होऊं लागली. हिंदुसमाजाच्या घडणींत गुंफल्या गेलेल्या

प्रस्थितिशीलता नि प्रगतिशीलता ह्या दोन्ही प्रवृत्तींचा तोल सुटून समन्वयाचें पायीं संघर्षाची हातघाअी चालू झाली. ती किती विकोपाला गेली होती ह्याचें अेकच अुदाहरण आणि तेंहि पुढें राजकारणांतील जहाल देशभक्त म्हणून प्रसिद्धीस आलेल्या श्रीयुत बिपिनचंद्र पाल यांचें देअूं.

बिपिनचंद्र पाल यांच्या आत्मवृत्तांत त्यांनीं वर्णिल्याप्रमाणें बंगालमध्यें बहुतेक आंग्लशिक्षित वर्ग या वर दिलेल्या सामाजिक नि धार्मिक संघर्षांतच गुंतून नि गुंगून पडल्यामुळें त्यांच्यांत प्रभावी राजकीय जागृति अशी झालीच नव्हती. पालबाबूंच्या तरुण वयांतील गोष्टहि तशीच होती. त्यांच्या तारुण्यांतील सारा अुत्साह, शक्ति नि समय ब्राह्म समाजाच्या प्रचारांत, चळवळींत नि त्याच्या पोटपंथांतील भांडणतंट्यांत व्यय होत गेला. ते न्यूनाधिक तीस वर्षांचे होअीतोंपर्यंत त्यांनीं राजकारणांत असा कोणताहि भाग घेतला नव्हता. प्रत्येक नव्या धर्मांत वा पंथांत कांहीं कालानें अपरिहार्यपणें पडतात तसे ब्राह्म समाजांतहि फाटाफूट होअून पोटपंथ पडूं लागले. त्यांपैकीं अेका पंथांत शिरून अगदीं तरुणवयांतच पालबाबू हे जेव्हां 'ब्राह्मो' झाले तेव्हां वर वर्णिलेली जातिबहिष्काराची धामधूम चालूच होती. तरुण पाल जितके कट्टर ब्राह्मसमाजी तितकेच त्यांचे अुतारवयाचे वडील कट्टर सनातनी. त्यांनीं हा आपला अेकुलता अेक मुलगा 'ब्राह्मो' झाला हें अैकतांच त्याच्याशीं सर्व व्यवहार बंद केला, त्याला कुटुंबांतून नि घरांतून बाहेर काढलें, अितकेंच नव्हे तर आपल्या मत्तेवर त्याचा किंवा त्याच्या मुलामाणसांचा कोणचाहि अुत्तराधिकार अुरलेला नाहीं असें आपल्या मृत्युपत्रांत निक्षून लिहून ठेवलें. बिपिनबाबूंना किंवा ज्या अेका विधवा महिलेशीं त्यांनीं ब्राह्मसमाजीय विवाह केला तिला किंवा त्या अुभयतांच्या संततीला त्यांच्या वडिलांनीं त्यानंतर अेक पैहि धाडली नाहीं. त्यामुळें बिपिनबाबूंना दारिद्र्याशीं सतत झुंज द्यावी लागली. कांहीं वर्षांनीं त्यांचे वडील आजारानें अगदीं मृत्युशय्येवर पडले तेव्हां काय ती संपत्तीच्या वाट्यापुरती थोडीशी सवलत त्यांनीं बिपिनबाबूंना दिली,—पण तो अेकुलता अेक मुलगा घरीं आलेला असतांहि त्या त्यांच्या कृतनिश्चयी वृद्ध वडिलांनीं त्या धर्मबहिष्कृत मुलाच्या हातचें अन्नपाणी मात्र ते मरणीं मरून गेले तरी घेतलें नाहीं!

सनातन्यांमध्यें नि समाजीयांमध्यें असा तीव्र संघर्ष चालतां चालतां अेका

राजूस समुद्रगमन, विधवा-विवाह, आंतरजातीय विवाह प्रभृति कांहीं अुपयुक्त सामाजिक सुधारणा सरवच हिंदुसमाजांत प्रथम विरोधारह वाटेनाशा होअून पुढें रूळत गेल्यामुळें, आणि दुसऱ्या राजूस आपआपसांतील अुपपंथांच्या फाटाफाटीमुळें नि सनातन्यांतील पुढाऱ्यांच्या प्रबुद्ध विरोधामुळें राह्मसमाजहि हतबल, निरुपयोगी नि निःसत्त्व होत चालला. शेवटीं हिंदुसमाजांतून फुटून निघूं पहाणाऱ्या अशा अनेक पंथांची जी गत पूर्वापार होत आली तशीच त्याची गत होअून तो पंथहि हिंदुसमाजांत विरून गेला. तें कसें घडत गेलें तें विवरण येथें अप्रस्तुत आहे.

बंगालमधील मुखर वर्ग (Vocal Section) असा राह्मसमाजाच्या वर्चस्वाखालीं गेल्यामुळें साधारणतः सन १८८४ पर्यंत बव्हंशीं नि मनोभावें ब्रिटिशनिष्ठच होता. ह्या मताचे समर्थनार्थ अेकच पुरावा खालीं देतों. कारण तो अगदीं अधिकृत आहे. म्हणून पर्याप्त आहे. ब्राह्मसमाजाचे त्या काळचे प्रमुख पीठाचार्य, ज्यांची ख्याति बंगालभर गाजत होती, ज्यांचा शब्द म्हणजे बंगालचा प्रातिनिधिक शब्द म्हणून बहुधा समजला जाअी त्या केशवचंद्र सेन यांचें मत नि तेंहि ब्राह्मसमाजाचे त्याकाळचे कट्टर प्रचारक जे बिपिनचंद्र पाल त्यांच्या शब्दांत अुद्धृत करूं. पालबाबू आपल्या आत्मवृत्ताच्या ३१५ व्या पृष्ठांत लिहितात :—

"Keshava Chandrasen and his Brahmo Samaj practically left the political field alone. If anything Keshava's politics accepted the British subjection of India as due to the intervention of God's special providence for the salvation of India."

ह्याचा आशय असा : केशवचंद्र सेन नि त्यांचा ब्राह्मसमाज ह्यांनीं राजकीय क्षेत्रांत पाअूलच टाकलें नाहीं. त्यांचा राजकीय सिद्धांत असा जर कोणता असेल तर तो हाच अेक होता कीं हिंदुस्थानावर स्थापन झालेली ब्रिटिश राजसत्ता ही हिंदुस्थानच्या हितासाठीं कृपाळू होअून देवानें दिलेलें विशेष वरदानच आहे !

अुगीच नाहीं कांहीं मिशनऱ्यांनीं नि ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांनीं ब्राह्मसमाजाचा नि त्यांच्या पुढाऱ्यांचा अेवढा अुदोअुदो केला ! आम्हीं मागें सांगितलेल्या ज्या कूट हेतूनें अिंग्रजांनीं अिंग्रजी शिक्षण हिंदुस्थानांत चालू

केलें तो हेतु बंगालमधल्या आंग्लशिक्षितांच्या पहिल्या दोनतीन पिढ्यांचे प्रकरणीं तरी बहुतांशीं सफल झाला खरा.

ब्राह्म समाजाला जसजशी अुतरती कळा लागूं लागली तसतशी बंगालमधील आंग्लशिक्षित हिंदुसमाजाला राजकीय जाणीव होअूं लागली. ही प्राथमिक राजकीय जागृति करण्याचें श्रेय जर कोणाला प्रमुखत्वानें देणें असेल तर तें सुरेंद्रनाथ बानर्जी यांना दिलें पाहिजे. बंगालचे आद्य राजकीय गुरु देशभक्त सुरेंद्रनाथ बानर्जी हेच होत. परंतु त्यांच्या पूर्वचरित्रावरूनहि हेंच सिद्ध होतें कीं त्यांच्या वयाच्या अुण्यापुर्‍या तीस वर्षांपर्यंत बंगालमधील सर्वसाधारण आंग्लशिक्षित समाजाप्रमाणें सुरेंद्रबाबूंनाहि राजकारणाची अशी जाणीव नव्हती, ओढ तर नव्हतीच नव्हती. कसें तें पहा.

सुरेंद्रनाथ नि रोमेशचंद्र दत्त हे दोघे विद्यार्थी त्यांच्या वयाच्या विशीचे आंत सन १८६८ च्या वर्षीं सिव्हिल सर्व्हिसची म्हणजेच त्यावेळची मोठ्यांतली मोठी परीक्षा देण्यासाठीं अिंग्लंडला गेले. तोंपर्यंत त्यांनीं राजकारणाचें तोंडहि पाहिलें नव्हतें. अिंग्लंडमध्येंहि आपला अभ्यास बरा कीं आपण बरे हीच होती त्यांची वृत्ति. ती परीक्षा अुत्तीर्ण होअून ते I.C.S. झाले. अर्थातच सरकारी पद्धतीप्रमाणें कोणत्यातरी अुच्चाधिकारावर त्यांची नेमणूक आज ना अुद्यां होणार ह्या निश्चितीनें ते जों वाट पहात होते तों सुरेंद्रनाथांना अधिकार्‍यांकडून कळविण्यांत आलें कीं 'तुमचें खरें वय चोरून आणि परीक्षेस आवश्यक तसें अुणें वय लावून तुम्ही फसवणूक केलीत असा आरोप तुमच्यावर आहे. त्याविषयीं काय म्हणणें तें कळवा.' या आरोपांतून सुटण्यासाठीं त्यांना पुष्कळ मनस्ताप नि कष्ट सोसावे लागले. पण शेवटीं ते त्यांत निर्दोषी ठरून सुटले. नंतर त्यांची नेमणूक बंगालमध्यें थेट अेका मॅजिस्ट्रेटच्या अधिकार पदावर झाली. परंतु आम्हां गोर्‍यांच्या साम्राज्यांत अेक 'नेटिव्ह' मनुष्य आपल्या खुर्चीशीं खुर्ची भिडवून अशा मोठमोठ्या अधिकार पदावर बसावा ही गोष्ट त्या काळच्या सत्तागर्विष्ठ अिंग्रजी अधिकार्‍यांना सारखी सलूं लागली. त्यांच्या गटास लवकरच सुरेंद्रनाथाना पेचांत पकडण्यास सुरेंद्रनाथांकडून कामकाजांत घडलेल्या अेका चुकीचें निमित्त मिळालें. त्या कांट्याचा नायटा करून सुरेंद्रनाथांना सरकारनें अधिकारपदावरून अेकदम पदच्युत केलें —आणि अिंडियन सिव्हिल सर्व्हिसमधल्या चाकरीस मुळांतच अपात्र ठरविलें.

ह्या असह्य अन्यायाचा नि अपमानाचा आघात होतांच सुरेंद्रनाथांच्या स्वाभिमानानें पेट घेतला. आपला स्वदेश परकीय आंग्ल सत्तेनें पददलित केला असतां त्या राष्ट्रीय अपमानानें जी स्वाभिमानाची ज्योति सुरेंद्रनाथांच्या हृदयांत पेटली नाहीं, ती ज्योति आंग्लसत्तेनें केलेल्या ह्या वैयक्तिक अपमानानें पेटली. ह्या सर्व तुरळक मानहानीचें मूळ आपल्या राष्ट्रीय दास्यांत आहे, तें राजकीय दास्य आहे तोंवर आपण सर्व 'नेटिव्ह'च राहणार हें सत्य त्या अपमानानें पेटलेल्या ज्योतीचे प्रकाशांत त्यांना ढळढळीतपणें दिसलें आणि सरकारी सेवेचा नाद सोडून देऊन वयाच्या उणापुऱ्या तिशीपर्यंत राजकारणास म्हणण्यासारखा स्पर्शहि न करणाऱ्या सुरेंद्रनाथ बानर्जींनीं स्वदेशाच्या सेवेस वाहून घेतलें आणि राजकारणांत प्रवेश केला.

पण तें राजकारण म्हणजे कोणतें? राज्यातें नव्हे, र ज्यक्रांतीचें तर नव्हेच नव्हे. राज्य असलें पाहिजे अिंग्रजांचेंच! त्यांत कांहीं सुधारणा हव्यात अितकेंच. असें अगदीं हडसून खडसून प्रतिज्ञेवर सांगणारें ब्रिटिशनिष्ठ राजकारण. स्वतः सुरेंद्रनाथ महाशयांनीं त्यांच्या राजकारणाची ही रूपरेखा त्यांच्या आत्म-चरित्रांत वारंवार सांगितली आहे.

ह्या त्या वेळच्या बंगाली राजकारणाचें स्वरूप आम्हीं आमच्या आजच्या भाषेंत सांगण्यापेक्षां त्या काळच्या बंगाली पुढाऱ्यांच्याच भाषेंत सांगणें अधिक यथातथ्य होअील. यास्तव तत्कालीन राजकीय 'जहाल' मुखपत्र म्हणून ख्याति पावलेल्या आणि ज्याच्या या जहालपणाविषयीं अिंग्रजी अधिकाऱ्यांचा अितका रोष झाला कीं त्याच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्याचा किंवा तें पत्र बंद करण्याचा सरकार विचार करूं लागलें अशा अेका बंगाली वृत्तपत्रामधील, सरकारच्या आक्षेपाला अुत्तर म्हणून लिहिलेल्या लेखांतील खालील अेक अुतारा बिपिनचंद्र पाल यांच्या आत्मचरित्रांत पृष्ठ २८१-८२ ह्या पृष्ठांवर दिला आहे तोच भाषांतरून देअूं. तें बंगाली पत्र लिहितें :

"अिंग्रज लोक कोणत्या प्रकारच्या राजनिष्ठेची अपेक्षा आमच्याकडून करतात तें आम्हांस ठाअुक नाहीं. आम्हांस अितकेंच ठाअुक आहे कीं अिंग्रजी शासन आम्हांस अत्यंत हितकारक होत आलेलें आहे. कोणत्याहि राज्यांत नि केव्हांहि ह्या देशाला असा न्याय, असें शिक्षण, अशी शांतता लाभलेली नव्हती. फार काय, प्राचीन हिंदुकालांत सुद्धां आजच्या ब्रिटिश राज्यांतल्या-

प्रमाणें न्याय, शिक्षण नि शांति साऱ्या देशभर नांदत नव्हती. जरी अनेक गोष्टींत आम्हीं मागासलेले असलों तरी आम्ही कोणी रानवट वा निर्बुद्ध लोक आहोंत असें नाहीं. अिंग्लिशांपासून जे अनेक बहुमोल लाभ आम्हांस झालेले आहेत ते आम्ही जाणून आहोंत. कोणतेंहि विजेतें राष्ट्र कोणत्याहि विजित राष्ट्राशीं क्वचित्च अितक्या अुदारपणानें वागलेलें असेल कीं जितक्या अुदारपणानें ब्रिटिश राज्यकर्ते आमच्या देशांतील प्रजेशीं वागत आले आहेत. हें सर्व जरी खरें असलें तरी तेवढ्यासाठीं अिंग्रजांचे हातून पक्षपात असा होत नाहीं किंवा त्यांनीं वचन दिलें म्हणजे तें पाळलें जातेंच जातें असें आम्हीं मानलेंच पाहिजे कीं काय ?"

अिंग्रजी राज्य हें अीश्वरी वरदान आहे, स्वतःच्या रामराज्यापेक्षां किंवा चंद्रगुप्त, अशोक, विक्रमादित्य, श्री हर्ष, पुलकेशी ह्या आमच्या हिंदु-सम्राटाच्या राजवटीपेक्षांहि ही परकीय अिंग्रजी राजवट हितकारक आहे. अशा या ब्रिटिश सत्तेशीं राजनिष्ठ रहाणें आणि ब्रिटिश सम्राटाचें तें कृपाछत्र हिंदुस्थानवर असेंच अभंग राहो म्हणून प्रार्थिणें हें कृतज्ञपणाच्या दृष्टीनेंहि आपलें नैतिक कर्तव्य होय अशी बंगालमधील सन १८८४ पर्यंतच्या धार्मिक नि राजकीय पुढाऱ्यांची नि त्यांच्या लक्षावधि आंग्लशिक्षित वा अशिक्षित अनुयायांची राजकीय निष्ठा होती ही गोष्ट ज्यांना त्या कालच्या बंगालचे प्रातिनिधिक प्रमुख नि साक्षी म्हणून म्हणतां येअील अशा केशवचंद्र सेन, सुरेंद्रनाथ बानर्जी नि विपिनचंद्र पाल यांच्या वर दिलेल्या अुद्गारांवरून निर्विवादपणें सिद्ध होत आहे. तथापि कित्येकांना क्वचित् असें वाटण्याचा; संभव आहे कीं वरील प्रकारची निष्ठा जी व्यक्तविली जाअी ती अिंग्रजी दंडविधानाच्या (Criminal Code च्या) कैचींत कोणी सांपडूं नये अशा भीतीनें किंवा राजनीतीचा अेक डाव म्हणूनच काय ती वरवर प्रदर्शविली जात असेल, नसेल कशावरून? तर त्या शंकेचें सुद्धां निवारण करूं शकेल अशी त्या काळांत पुढारी म्हणून वावरलेल्या श्री बिपिनचंद्र पालांची पुढील साक्ष पहा. आपल्या आत्मवृत्तांत या शंकेविरुद्ध ते लिहितात :

"It was not merely a diplomatic move to save their skin. Educated Indian opinion in those days sincerely wanted the continuance of the Brtish rule. The generation to which they belonged had not completely forgotten the

last days of the Mogul Empire marked by universal anarchy and disorder. The British had replaced that reign of terror by a new reign of law. Their professions of loyalty to the British Government were therefore absolutely sincere notwithstanding their criticism of the acts and policies of the Indian Government." (Pal's Autobiography pp. 291 to 293).

विपिनबाबूंचीं वरील विधानें अगदीं यथार्थ आहेत. त्यांचीं स्वतःचींहि त्या काळचीं प्रामाणिक मतें तशींच होतीं.

पण त्या सन १८६० ते ८४ पर्यंतच्याच पिढ्यांची गोष्ट कशाला? माझ्या स्वतःच्या पिढींत ब्रिटिश सम्राज्ञी क्वीन व्हिक्टोरिया वा ब्रिटिश सम्राट हे 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या शास्त्राधारानें कित्येकांकडून अीश्वरांश समजले जात होते. ज्या अिंग्रज लोकांनीं आमच्यावर अनंत 'अुपकार' केले त्यांचें राज्य अुलथून पाडण्याची अिच्छा धरणें हा नैतिक अपराध होय, हें पाप होय,— अिंग्रजी राज्याचें कृपाछत्र आमच्यावर असेंच अभंग राहो, त्यांतच आमचें परमकल्याण आहे,—अशी निष्ठा बाळगणारे कित्येक आंग्लशिक्षित नवे पदवीधर नि जुने शास्त्री पंडित, पुढारी नि अनुयायी, वृद्ध नि तरुण हिंदुस्थानभर अस्तित्वांत होते. तशा कित्येकांचीं मतांतरें मला स्वतःला करावीं करावीं लागलीं त्याचीं अनेक अुदाहरणें या माझ्या आत्मचरित्राच्या पुढील वृत्तांतांत आढळतीलच.

## मद्रास, आंध्र, कर्नाटक नि गुजराथ प्रांत

बंगालमधील सन १८६० ते १८८४ ह्या कालखंडांतील राजकीय परिस्थितीची नि आंग्लशिक्षित वर्गाच्या मनोरचनेची जी रूपरेखा वर अंकिली आहे तीच पंजाब महाराष्ट्र वगळतां, मद्रास, आंध्र, कर्नाटक नि गुजराथ ह्या प्रांतांतील त्या कालखंडामधल्या राजकीय परिस्थितीची नि आंग्लशिक्षित मनोरचनेची सर्वसाधारण रूपरेखा आहे. सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाचे वेळीं बंगाल-प्रमाणेंच मद्रास, आंध्र, कर्नाटक, गुजराथ ह्या प्रांतांमध्येंहि म्हणण्यासारखी राष्ट्रीयध्येयानुस्फूर्त अशी क्रांतिकारक अुठावणी झाली नाहीं. ह्या सर्व प्रांतांतील लोकांची हिंदुस्थान सरकारच्या सैन्यांत मोजण्यासारखी भरती अशी

कधींच नव्हती. सत्तावननंतर अिंग्रजी शिक्षणाचा प्रचार मद्रास प्रांतांत झपाट्यानें आणि वरील अितर प्रांतांत हळूहळू पण वाढतच चालला होता. त्या योगें जो आंग्लशिक्षितांचा नवीन वर्ग तिथें अुत्पन्न झाला तोहि बंगालप्रमाणेंच पुरता ब्रिटिशनिष्ठ बनलेला होता. बंगालमध्यें ब्राह्मसमाजासारखी अेक प्रबळ अशी धार्मिक नि सामाजिक संस्था निघून तिनें डिवचल्यामुळें अुम्या बंगाली हिंदु समाजांत जी मोठी खळबळ अुडाली, विचारांना तेज चढलें, आचारांत कांहीं प्रकरणीं अुपयुक्त सुधारणा झाल्या तसें अेखादें प्रबळ धार्मिक वा सामाजिक आंदोलनहि त्या कालखंडांत मद्रास, आंध्र, कर्नाटक, गुजराथ ह्या प्रांतांत झालें नाहीं. सन १८८४ च्या आगेमागें तिकडील आंग्लशिक्षितांत कांहीं राजकीय जागृति होअूं लागली. मद्रासला 'महाजन सभा' सन १८८१ त स्थापन झाली. पण तिचीहि धांव होती बंगालप्रमाणेंच, अधिकांत अधिक म्हणजे ब्रिटिश राज्यांतील सुराज्यापर्यंत.

## बिहार नि अुत्तर प्रदेश

सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर दिल्लीपासून खालीं बुंदेलखंडापर्यंत बिहार नि अुत्तर प्रदेशांतील सारी जनता राजकीय दृष्ट्या केवळ निश्चेतन झालेली होती. त्याचें कारण मात्र निराळें होतें. सत्तावनच्या त्या प्रचंड क्रांतियुद्धाचें हाच प्रदेश रणक्षेत्र झालेला होता. आपल्या स्वदेशाच्या नि स्वधर्माच्या स्वातंत्र्यासाठीं त्या युद्धांत अिंग्रजाशीं लढतांना ह्याच जनतेनें आपलें रक्त, आपली शक्ति नि आपले प्राण अितक्या निकरानें नि निःसीम प्रमाणांत वेंचले होते आणि त्या क्रांतियुद्धांत त्यांचा पराभव झाल्यानंतर अिंग्रजांनीं त्यांचा अितका कडा छळ केला होता कीं वेभानपणें लढतां लढतां रणांगणांत मूर्च्छा येअून पडलेल्या अेखाद्या वीराप्रमाणें तो सारा विस्तीर्ण प्रदेशचा प्रदेश मूर्च्छित होऊन पडलेला होता. पण पुढें हळूहळू त्यांचीं मुलें अिंग्रजांनीं काढलेल्या शाला-महाशालांतून (Schools & Colleges) अिंग्रजी शिक्षण घेअूं लागलीं. त्यांना अिंग्रजी सरकारच्या सेवाविभागांतील, न्यायविभागांतील, आरक्षक विभागांतील चाकऱ्या, अधिकारपदें, पदव्या मिळूं लागल्या. या ठराविक क्रमानें अितर प्रांतांतील आंग्लशिक्षितांचे वर्गाप्रमाणें ह्या अुत्तर प्रदेशांतील हा वर्गाहि समूहशः बोलायचें म्हणजे विचारानें नि आचारानें ब्रिटिशनिष्ठ बनत

गेला. त्यांच्या सत्तावनच्या क्रांतिकालीन वडिलांच्या पिढीच्या भव्य भावनांशीं अगदीं विसंगत, बहुधा विरोधी. जो तो आपआपल्या व्यक्तिकारणांत गुंग. पुढें जेव्हां थोडी राजकीय जागृति झाली तेव्हां तीहि अगदीं मंद. ब्रिटिशनिष्ठ सुराज्याच्या चळवळींत कां होईना पण बंगालमध्यें जें अवसान नि जीव होता तितकासुद्धां ह्या प्रांतांतील आंग्लशिक्षित वर्गाच्या दुबळ्या राजकीय हालचालींत सन १८८४ पर्यंत आला नाहीं.

## प्रकरण चवथें

# राजकीय परिस्थितीची प्रांतवार पहाणी

(सन १८६० ते सन १८८४)

### पंजाब आणि संस्थानें

## पंजाब

बंगाल, मद्रास अित्यादि प्रांतांत अिंग्रजी सत्ता पक्केपणीं रुळल्यानंतर चांगलीं पन्नासपाअुणशें वर्षें अुलटून जाअीतों पंजाब प्रांत अिंग्रजांचे वर्चस्वाखालीं आलेला नव्हता. सत्तावनच्या क्रांतियुद्धाचे वेळीं पंजाबचें स्वातंत्र्य जाअून अवघीं नअूदहा वर्षें लोटलीं असतील नसतील. त्यामुळें अिंग्रजांनासुद्धां असें भय पडलें होतें कीं पंजाबांतील ज्या शीखांचें राज्य आपण अवघ्या नअूदहा वर्षांपूर्वीं छिनावून घेतलें ते शीख आपल्याविरुद्ध अुठावणी करून सत्तावनच्या क्रांतिकारकांना आतां मिळाल्यावांचून रहाणार नाहींत. क्रांतिकारकांनींहि शिखांना पत्रोपत्रीनें सांगून पाहिलें कीं "तुम्हांला अिंग्रजांचें जूं फेकून देण्याची ही अशी सुवर्णसंधि पुन्हां मिळणार नाहीं. सारें अिंग्रजी सैन्य आमच्याशीं लढण्यासाठीं दिल्ली, लखनौ, कानपूरकडे गुंतलें आहे. पंजाब मोकळा पडला आहे. तेव्हां तुमच्या शीख पलटणी जर आतां अुरलेल्या मूठभर ब्रिटिशांवर तुटून पडतील तर पंजाबांतून अिंग्रजीसत्ता अुखडून टाकण्यास अेक आठवडाहि लागणार नाहीं. साऱ्या हिंदुस्थानांतूनच त्यांना हांकलून देतां येईल." पण त्या काळीं शीखांना नेता असा कोणीच अुरला नव्हता. अेखाद्या माणसास जसा अकस्मात् बुद्धिभ्रंशाचा झटका येतो तशी त्या आमच्या शीख समाजाची बुद्धीच अुलटी झाली. अिंग्रजांवर स्वतःचा सूड अुगवून आपलें राज्य तर स्थापलें नाहींच पण ज्या लाखों क्रांतिकारकांनीं

दिल्ली ते नर्मदेपर्यंत अिंग्रजी राज्य अुखडून टाकलें होतें त्या आपल्या स्वदेशबंधूंच्या पायांत परकीय शत्रूच्या बेड्या पुन्हां पक्केपणीं ठोकण्यास रणांगणांत अिंग्रजांसाठीं बव्हंश शीख समाजानें स्वतःचे जीव गमावून साहाय्यच दिलें. शेवटीं क्रांतिकारक पक्षाचा मोड झाल्यानें अिंग्रजांना जय मिळाला, राज्य मिळालें. पण शीखांना काय मिळालें? अिंग्रजी सैन्यांत भरती आणि ब्रिटिश राज्याचे 'राजनिष्ठ प्रजानन'—म्हणजेच अेकनिष्ठ दास—ही पदवी!

त्या क्रांतियुद्धाचे पराभवानंतर अितर प्रांताप्रमाणें पंजाबांतहि अिंग्रजी सत्ता निरंकुशपणें नांदू लागली. अिंग्रजी कारभाराच्या पद्धती चालू झाल्या आणि त्या चालवितां याव्या म्हणून अिंग्रजी शिक्षण दिलेला लेखनिकांचा (Clerks) नि दुय्यम अधिकाऱ्यांचा तांडा पुरविणाऱ्या अिंग्रजी शाळा नि महाशाळा अुघडण्यांत आल्या. बंगाल-मद्रासमध्यें अिंग्रजी शिक्षण घेतलेल्या अुण्यापुऱ्या दोन पिढ्या निघाल्यानंतर पंजाबमध्यें मुलें अे बी सी डी शिकूं लागलीं होतीं. तोंवर सारा राज्यकारभार अुर्दू-पर्शियनमध्यें चालत आला असल्यामुळें प्राथमिक शाळांतून मुसलमानी शिक्षकांचें प्रस्थ होतें. बंगालमध्यें अिंग्रजी शिक्षणाचे निमित्तें हिंदु मुलांवर जसे मिशनरी शिक्षक ख्रिश्चन धर्माचे नि संस्कृतीचे संस्कार घडविण्याची पराकाष्ठा करीत तसेंच किंवा त्याहूनहि अनिर्वाच्य नि आक्षेपार्ह प्रकारांनीं हे मुस्लीम मुल्ला मौलवी शाळांतून नि घरगुती शिकवण्यांतून हिंदु मुलांवर मुस्लीम धर्माची छाप पाडून त्यांचें मुस्लीमीकरण करण्यास झटत असत. बंगालमध्यें अिंग्रजी सत्तेनंतरच्या पहिल्या-दुसऱ्या पिढीच्या शिक्षित हिंदु तरुणांचा कल जसा ख्रिश्चन धर्माकडे झुकत असे तसाच पंजाबमधील हिंदुतरुणांचा कल मुस्लीम धर्माकडे झुकत असे. पंजाबांत अिंग्रजी शिक्षण पसरत चाललेलें पाहून त्या आंग्लशिक्षित हिंदुवर्गा-वर बंगालप्रमाणेंच आपल्या ब्राह्म समाजाची छाप पडेल अशा आशेनें ब्राह्म समाजानें पंजाबमध्येंहि अेक शाखा अुघडली होती. पण ब्राह्म समाजाचा प्रचार म्हणजे बहुतेक हिंदु समाजावरच निंदेची झोड! मुस्लीमांचीं किंवा ख्रिश्चनांचीं धार्मिक वा सामाजिक व्यंगें अुघडकीस आणण्याची त्यांची छातीच होत नसे. त्यामुळें ब्राह्म समाजाच्या अशा पक्षपाती नि भेकड हिंदुनिंदेनें मुस्लीम ख्रिश्चनांचेच हात बळकट होत असत. हिंदूंचें धैर्य अधिकच खचत

जाअी. जिथें हिंदुसमाजाची अस्मिताच अशी खंगत चालली होती तिथें कसची राजकीय जागृति नि कसचें काय !

अशा घनदाट मानसिक नि आत्मिक अंधःकारांत चांचपडत चाललेल्या पंजाबांतील हिंदुसमाजास अकस्मात् 'भिअूं नकोस, मा भीः' असें आश्वासन देणाऱ्या अेखाद्या आकाशवाणीसारखा अैकूं आला स्वामी दयानंद सरस्वतींचा संदेश! खरोखर, मुस्लीमांच्या नि ख्रिस्त्यांच्या कात्रींत सांपडलेल्या पंजाबांतील हिंदु समाजास जर कोण्या महापुरुषानें निदान धार्मिक नि सामाजिक संकटांतून मुक्त केलें असेल तर तें स्वामी दयानंदांनींच होय. त्यांतहि सुदैव असें कीं दयानंदांच्या आर्यसमाजाचा प्रथम नि प्रबळ पुरस्कार अवघ्या हिंदुस्थानांत जर कोणीं केला असेल तर तो केला पंजाबांतील आंग्लशिक्षित हिंदुवर्गानें. ज्या रोग्याला जें रामबाण औषध हवें होतें तेंच औषध त्याच रोग्यास वेळेवर मिळालें. पंजाबांतील संशयात्म हिंदुसमाजाला ब्राह्म समाज मारक ठरता. त्याला जडलेल्या व्याधीवर पुराणोक्त कुपथ्य होतें. त्या परिस्थितींत त्याचें तारण करण्यास समर्थ होता अेक आर्यसमाज.

कारण ब्राह्म समाजाच्या भवनाची बांधणी परकीय संस्कृतीच्या पायावर होती. परंतु आर्यसमाजाचें मंदिर मुळांतच अुभारलेलें होतें स्वकीय संस्कृतीच्या पायावर. त्यामुळें अेका बाजूला मुस्लीम प्रचाराच्या आक्रमणाला नि दुसऱ्या बाजूला अिंग्रजी शिक्षणाच्या स्वत्वघातक कुसंस्कारांना हाणून पाडण्यास जे सापेक्षतः समर्थ होतील असे प्रबळ सिद्धान्त नि प्रगामी सुधारणा ह्यांच्यावर आधारलेला स्वामी दयानंदांचा आर्यसमाज हाच त्या परिस्थितींत पंजाबांतील हिंदूंचा युगधर्म ठरण्यास पात्र होता. परिणामहि तसाच झाला. ज्यांच्या-ज्यांच्यावर आर्यसमाजाचा प्रभाव पडे ते ते हिंदू केवळ स्वधर्माचेच नव्हेत तर स्वराष्ट्राचेहि कट्टर अुपासक बनत. समूहतः बोलायचें म्हटलें तर पंजाबांतील आंग्लशिक्षित हिंदु वर्ग आर्यसमाजाच्या प्रभावाखालीं आला. त्यांत नवचैतन्य सळसळूं लागलें. त्यांतील अनेक प्रमुख लोकांनीं स्वधर्मप्रचारार्थ संन्यासी होअून समाजसेवेस वाहून घेतलें. मोठमोठ्या शिक्षणसंस्था काढल्या. आर्य समाजाच्या अशा सावेश प्रचारांत तो बुद्धिप्रधान वर्ग गुंतून नि गुंगून गेला.

परंतु साऱ्या हिंदुसमाजधुरीणांचें लक्ष या धार्मिक आंदोलनांतच पूर्णपणें गुरफटून गेल्यामुळें पंजाबांत प्रचलित राजकारणाच्या जागृतीकडे या प्रमुख

वराकडून तितक्याच पूर्णपणें दुर्लक्ष केलें गेलें. आर्य समाजहि धार्मिक नि सांस्कृतिक संस्था होती हें खरें. परंतु स्वामी दयानंदांच्या 'सत्यार्थ-प्रकाशांत' राजकारण हेंहि धर्मकर्तव्यच आहे. अितकेंच नव्हे तर स्वराज्य-कारण हेंच 'आर्यांचें' खरें राजकारण होय, असें स्पष्टपणें त्या ग्रंथाच्या अेका स्वतंत्र समुल्लासांत आज्ञापिलें आहे. म्हणूनच आर्यसमाजावर अिंग्रजी राज्यकर्त्यांचा डोळा आधींपासून होता. परंतु त्या कारणामुळेंच अिंग्रज सरकारच्या रोषापासून आपल्या संस्थेस कोणताहि अुपसर्ग पोंचूं नये, तसें निमित्तसुद्धां अिंग्रजी शासकांस मिळूं नये यास्तव आर्यसमाजाच्या धुरीणांनीं प्रथमपासून नि प्रकटपणें असें बंधन आपलें आपणांवरच लादून घेतलें होतें कीं आर्यसमाज ही केवळ धार्मिक नि सांस्कृतिक संस्था असल्यानें राजकारणाशीं तिचा कांहींअेक संबंध नाहीं! आर्यसमाजाच्या धुरीणांपासून सभासदांपर्यंत कोणीहि प्रचलित राजकारणांत अिंग्रजीराज्याच्या डोळ्यावर येअील असा—म्हणजे जवळ जवळ कसलाहि—भाग घेतां कामा नये अशी शिस्त तो समाज आपला आपणच पाळीत असे.

अेतावता सन १८६० ते १८८४ पर्यंत राजकीय दृष्टिकोनांतून पहातां पंजाबांतील परिस्थिति साधारणतः अशी सांगतां येअील कीं तेथील शीख समाज ब्रिटिशनिष्ठेचें नि ब्रिटिश सैन्याच्या भरतीचें राखीव क्षेत्र बनलेला; मुसलमान समाज संधि सापडेल तिथें हिंदूंना नांगी मारणारा पण बलवत्तर ब्रिटिश सरकारपुढें मात्र नांगी टाकणारा; प्रबुद्ध हिंदु समाज धार्मिक, शैक्षणिक नि सामाजिक आंदोलनांत व्यग्र झालेला पण प्रचलित राजकारणापासून मात्र प्रतिज्ञापूर्वक अलिप्त रहाणारा असा होता. परिणामतः सन १८८४ पर्यंत बंगालमध्यें सुरेंद्रनाथ बाबूंच्या प्रेरणेनें राजकारणाची प्रगति निदान 'सुराज्या'च्या सुधारणा मागण्याच्या टप्प्यापर्यंत तरी जशी हिरीरीनें गेलेली होती तितकी सुद्धां राजकीय जागृति पंजाबमध्यें तोंपर्यंत झालेली नव्हती. राजकीय चळवळ अशी तर जन्मलेलीच नव्हती.

त्यास अपवाद काय तो अेकच! आणि तोहि 'दस सोनारकी और अेक लोहारकी' या न्यायानें या साऱ्या राजकीय औदासीन्याचा वचपा घणाच्या अेका घावासरशीं काढणारा गुरु रामसिंग कूकांच्या सन १८७० ते ७४ च्या मध्यंतरां-तील सशस्त्र क्रांतिकारक अुठावणीचा! विषयाला अधिक जुळेल म्हणून त्याची

रूपरेखा पुढें देअूं. अिथें अितकेंच सांगणें पुरे कीं मध्यरात्रीच्या अंधःकारांत अेखादीच वीज कडाडून गेली तरी पुढें पुन्हां अंधःकार जसाच्या तसाच अुरतो तशी ही सशस्त्र क्रांतीची आग क्षणांत लागली नि क्षणांत विझली, पण पंजाब राजकीय अंधःकारांत तसाच घोरत राहिला.

पंजाबमधील त्या काळच्या राजकीय नि सामाजिक परिस्थितीची वरील रूपरेखा यथावत् आहे कीं नाहीं तें पडताळतां यावें म्हणून ज्यांना पंजाबचे अर्वाचीन राजकारणाचे आद्यगुरु म्हणून यथार्थपणें सन्मानिलें जातें त्या लाला लजपतरायांच्या आत्मवृत्तांतील कांहीं अुतारे खालीं देत आहें.

लजपतरायजी लिहितात कीं त्यांचे पिताजी ज्या शाळेंत लहानपणीं शिक्षण घेत होते "त्या शाळेंतील मुख्याध्यापक मौलवी हा कट्टर मुसलमान होता. सर्व (हिंदु) मुलांवर त्याचा प्रभाव पडे. अितका कीं त्या हिंदु मुलांपैकीं बहुतेक पुढें बाटून मुसलमान झाले. ज्यांनीं अुघडपणें आपला धर्म सोडला नाहीं त्यांचाहि स्वधर्मावरील विश्वास अुडाल्यानें ते मनांतून तरी मुसलमान झालेले होते. माझे (लजपतरायांचे) वडील ह्या दुसऱ्या वर्गांत मोडत. ते प्रत्यहीं नियमानें निमाज पढत, 'रोजा' हा मुस्लीम अुपास पाळीत. ते हिंदुधर्म नि आर्यसमाज यांचे कट्टर शत्रु होते, नि वृत्तपत्रांतून त्या विरुद्ध कडक लेख लिहीत असत. त्यांची पत्नी (लजपतरायांची आअी) ही अेक स्वधर्मपरायण शीख कुटुंबांतील होती. त्या माझ्या आअीला माझे वडील कांहीं बिघडलें कीं 'असेंच वाग, तसेंच वाग, नाहींतर मी अुघड अुघड मुसलमान होतों!' म्हणून धाक दाखवीत. लहानपणीं मलासुद्धां माझ्या वडलांनीं थोडेंफार कुराण शिकविलें. त्यांचें पाहून मीहि निमाज पढें, मुस्लीमांचे रोज्यांचे अुपासहि पाळीं. पुढें शाळेंत मलाहि अरबी फारशी भाषांचें नि मुसलमानी धर्माचें शिक्षण मिळत गेलें. तसेंतसें हिंदु नि शीख हे दोन्ही धर्म अंधविश्वासानें नि मूर्ख गप्पाष्टकांनीं ओतप्रोत भरलेले आहेत असें मला वाटूं लागलें......

"पुढें सन १८८२ च्या वर्षापासून पंडित गुरुदत्त यांचा माझा स्नेह जमूं लागला. ह्या स्नेहामुळेंच माझ्या धर्मविषयक विचारांना मोठी चालना मिळून त्यांना राजकीय स्वरूप प्राप्त झालें. जों जों ही भावना बळावत चालली तों तों ती मला अिस्लाम धर्माच्या संस्कारापासून दूरदूर नेअूं लागली."

पुढें लजपतरायांचा पंडित गुरुदत्तांप्रमाणेंच, लाला हंसराज, लाला सांअीदास

प्रभृति आर्यसमाजांतील मोठमोठ्या त्यागी, विद्वान, संस्कृतज्ञ नि स्वधर्मनिष्ठ पुढाऱ्यांशीं परिचय झाल्यामुळें त्यांच्या मनावर बालपणापासून सांचलेलें परधर्मीय पाखंडाचें कश्मल घांसून घांसून नाहींसें होत चाललें. आर्यसमाजी वाङ्मयाच्या अभ्यासानें त्यांना प्राचीन भारतीय अितिहास आणि वैदिक धर्मांतील मूलतत्त्वें यांचें सत्यज्ञान झालें. मुस्लीम नि ख्रिश्चन अुपदेशकांचीं थोतांडें किती गर्ह्य असतात यांची अुमज पडली. त्यांचा राष्ट्रीय स्वाभिमान जागृत झाला. अेखाद्या जिवावरच्या संकटांतून सुटून पुनर्जन्म व्हावा तसा लजपतरायांना आनद वाटूं लागला. त्या आनंदाचे भरांत लजपतरायजी लिहितात "मी पुन्हां हिंदु झालों!!! वाचकहो, ज्याचें बालपण मुसलमानी वातावरणांत गेलें, तारुण्याच्या आरंभीं जो ब्राह्म समाजांत शिरला, तोच मी पुढें पंडित गुरुदत्त नि लाला हंसराज यांच्या सहवासानें प्राचीन आर्यसंस्कृतीचा नि धर्माचा भक्त बनलों! मी पुन्हां हिंदु झालों!"

"पुढें राष्ट्राच्या अेकीकरणार्थ सर्व भारतांत नागरी लिपि नि हिंदी भाषा यांचा प्रचार होणें अवश्य आहे असें जेव्हां मला (लजपतरायांना) समजून आलें तेव्हां अंबाला येथें जाअून मी अूर्दूच्या विरुद्ध व्याख्यान दिलें. (पंजाबांत त्यावेळीं दुय्यम सरकारी कारभार, व्यवहार, वृत्तपत्रादि मुद्रण अूर्दूंत चाले. संस्कृतचें ज्ञान नि नागरी लिपि ही हिंदुशिक्षित वर्गांतूनहि लुप्त झाली होती. (जुना पंडित वर्ग तर जवळ जवळ नामशेष झाला होता.) हिंदी भाषेचा नि नागरीचा प्रचार झाला पाहिजे असें मीं आग्रहानें व्याख्यानांतून प्रतिपादिलें. पण त्यावेळीं मला स्वतःला हिंदी नागरीचीं मुळाक्षरें सुद्धां येत नव्हतीं! त्यावर टीका झाली. म्हणून परत येतांच मी तीं मूळाक्षरें शिकूं लागलों. नि हिंदीवर सर्व लक्ष केंद्रित व्हावें म्हणून अरबी फारशी वाचन आमूलात् बंद केलें. पंडित गुरुदत्तांच्या अुत्तेजनानें संस्कृत शिकण्यास प्रारंभिलें. पण तें तितकेंसें जमलें नाहीं."

पंडित गुरुदत्तांप्रमाणेंच लाला सांअीदास हेहि वैदिक धर्माचे नि संस्कृतीचे कट्टर प्रचारक होते. लजपतराय लिहितात, "लार्ड रिपनच्या सार्वजनिक सत्कारप्रसंगीं बनारसच्या पंडितांनीं लार्ड रिपनची गाडी स्वतः ओढली हें अैकून लाला सांअीदासांना फार दुःख झालें. पंडितांच्या या कृत्यानें हिंदुधर्माला काळिमा लागला असें ते म्हणाले."

लालाजी पुढें लिहितात, "अेकंदर परिस्थिति अशी असली तरी त्यावेळचे माझे राजकीय विचार फारसे प्रगत नव्हते. आर्य समाजाचा प्रचारक म्हणून मीं जीं व्याख्यानें त्यावेळेस दिलीं त्यांत मी ब्रिटिश सरकारची स्तुति करीत असें. मुसलमानांच्या अत्याचारांपासून अिंग्रजांनींच आमची सुटका केली असें मला वाटे. सर्वसाधारण जनतेचें मतहि तसेंच होतें. सन १८८३ ते १८८५ च्या मध्यंतरीं या माझ्या राजकीय विचारांत म्हणण्यासारखा पालट झाला नाहीं; नि पालट होण्यासारखी संधीहि आली नाहीं."

बंगालमधील अिंग्लिश राजवटीच्या काळांतील राजकीय चळवळीचे जनक जसे सुरेंद्रनाथ बानर्जी तसेच पंजाबांतील अर्वाचीन राजकीय आंदोलनाचे आद्यगुरु लाला लजपतराय. त्यांनीं त्यांच्या आत्मवृत्तांत वर जें प्रामाणिकपणें नि प्रांजलपणें सांगितलें आहे त्यावरून सन १८८४ पर्यंत म्हणजे १८७४ त पंडित रामसिंग कूकांच्या शिष्यांनीं अिंग्रजांविरुद्ध केलेली सशस्त्र अुठावणी झाल्यागेल्यानंतरहि, स्वतः लजपतरायजींना अिंग्रजांचें राज्य आहे तेंच बरें आहे असें जर वाटे तर पंजाबांतील सर्वसाधारण जनतेचें आणि त्यांतहि आंग्ल शिक्षितांचें मतहि तसेंच होतें, ह्यांत आश्चर्य तें काय!

## संस्थानें

सत्तावनच्या क्रांतियुद्धाचा उपशम करण्यासाठीं ज्या कांहीं प्रकरणांत अिंग्रजांना हार खावी लागली त्यांमध्यें पहिली मुख्य गोष्ट ही होती कीं अिंग्रज सरकार हस्तें वा परहस्तें हिंदी लोकांच्या धर्मांत ढवळाढवळ करणार नाहीं असें अिंग्रजी सरकारनें मान्य केलें. पूर्वीं जसे मिशनर्‍यांच्या प्रचाराला अिंग्रजी अधिकारी उघडपणें प्रोत्साहन नि सुविधा देत किंवा स्वतःच मिशनचें काम करीत तसे प्रकार पुढें बहुतांशीं होअीनासे झाले. दुसरी गोष्ट ही कीं डलहौसीनें दत्तकादिक निमित्तानें संस्थानें बुडविण्याचा जो धूमधडाका चालविला होता तो बंद करून संस्थानांचा दत्तकांचा अधिकार अिंग्रजी शासनानें स्पष्टपणें मान्य केला आणि संस्थानांच्या अस्तित्वांस सहसा धक्का लावला जाणार नाहीं अशी हमी दिली. त्याप्रमाणें कांहीं विशेष आक्षेपार्ह प्रकरणें सोडलीं तर अिंग्रजी शासनानें संस्थानांचें अस्तित्वच नामशेष करण्याचें धाडस पुन्हां केलें नाहीं.

सत्तावनच्या युद्धांत जे सहस्त्रावधि लोक अिंग्रजांशीं लढत लढत रणांगणांत पडले, त्यांच्या प्राणदानानेंच अुरलेल्या संस्थानांचे प्राण वांचले. त्यांना जीवनाचा नवा अधिपट (सनद) मिळाला. तथापि जीवावरच्या टळलेल्या त्या संकटांची त्या संस्थानांनीं अितकी हाय खाल्ली होती, ब्रिटिशसत्ता पहिल्याहूनहि अितकी प्रबळ नि बद्धमूल झाली होती आणि तिनें संस्थानांच्या हालचालींना अितके पायबंद घातलेले होते कीं त्या राजामहाराजांना सार्वदेशिक राजकीय विषयांत ब्र सुद्धां काढण्याची छाती होअूं नये. अितकेंच नव्हे तर आपआपल्या संस्थानांतील जनतेंत राजकीय प्रवृत्तीचा बादरायण संबंधहि जिला जोडला जाण्याचा संभव आहे अशी संस्था किंवा असा शब्दहि काढला जाअूं नये ह्याविषयीं बहुतेक राजेमहाराजेच स्वतः कडक देखरेख ठेवीत. ब्रिटिश साम्राज्याच्या गौरवाचीं नि आपल्या त्याच्याशीं असलेल्या निस्सीम राजनिष्ठेचीं भव्य निदर्शनें करण्याची अेकही संधि ते संस्थानिक आणि अर्थातच तेथील जनता वायां जाअूं देत नसत. अगदी तुरळक अपवाद सोडले असतां संस्थानांतून ब्रिटिशविरोधी अशा राजकीय चळवळीला तर काय पण साध्या स्वराष्ट्र-भक्तीलाहि त्या काळीं मोड फुटलेला नव्हता हें सांगणेंच नको.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

प्रकरण पांचवें

# राजकीय परिस्थितीची प्रांतवार पहाणी

(सन १८६० ते सन १८८४)

## अुरतां अुरतां महाराष्ट्र

हिंदुस्थानांतील प्रमुख प्रांतांपैकीं बहुतेकांमधील तत्कालीन राजकीय परिस्थितीची या ग्रंथास आवश्यक तितकी पहाणी केल्यानंतर आतां शेवटीं महाराष्ट्रांतील तत्कालीन राजकीय परिस्थिति थोडक्यांत अंकित करूं. ती पहाणी अेवढ्याचसाठीं शेवटीं ठेवली कीं अितर बहुतेक प्रांतांत न आढळणारीं जीं कांहीं राजकीय वैशिष्ट्यें तींत आढळून येतात त्यांचा या कथानकाच्या पुढच्या भागाशीं सरळ संबंध येतो.

बंगाल, मद्रास अित्यादि अनेक प्रांतांमध्यें अिंग्रजी राजसत्ता स्थापन होण्यापूर्वीं कित्येक शतकें मुस्लीमांची मोंगलाअी थैमान घालीत होती त्यामुळें, त्यांतल्या त्यांत ती धर्मच्छलक नि अंदाधुंद मोंगलाअी जाअून ही सापेक्षतः व्यवस्थित नि निर्बंधशील आंग्लाअी आली हें बरें झालें असें तिकडील सर्वसामान्य जनतेस प्रथम प्रथम कसें वाटलें आणि अिंग्रजांविरुद्ध असन्तोष अेसा कसा अुफाळला नाहीं हें पूर्वीं साधार सांगितलेंच आहे. पण महाराष्ट्रांतील सामान्य जनतेची मनःस्थिति आंग्लाअी आली तेव्हांपासूनच समूहतः बोलावयाचें म्हणजे अगदीं अुलटी होती.

नुसता महाराष्ट्रच नव्हे तर बहुतेक हिंदुस्थान जिंकण्यासाठीं अिंग्रजांना जर कोणत्या बलाढ्य शक्तीशीं झुंजावें लागलें असेल तर प्रथम नि प्रकृष्टपणें मराठी साम्राज्याशीं होय. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं अिंग्रजांशीं तुंबळ युद्धें केलीं दोघा हिंदुशक्तींनींच. प्रथम नि प्रदीर्घ काळ हिंदुस्थानभर लढले मराठे आणि अगदीं शेवटीं केवळ पंजाबपुरते लढले आमचे शूर धर्मबंधु शीख !

त्यांत अधिक संघटित नि क्षमतर असलेल्या ब्रिटिशांचा विजय झाला. मराठ्यांचा नि शीखांचा पराभव झाला.

त्या दोघांपैकीं शीखांना अवघ्या दहावीस वर्षांचे आंत त्या पराभवाचा अितका विसर पडला कीं त्यांचें पंजाबचें राज्य छिनावून घेणाऱ्या त्या ब्रिटिशांच्या सेवेलाच त्यांनीं आपली निष्ठा मनःपूर्वक वाहून टाकली.

परंतु समूहतः पहातां त्या आपल्या पराभवाचें नि ब्रिटिश सत्तेचें शल्य मराठ्यांच्या मनांत मात्र सारखें सलत राहिलें. महाराष्ट्रांतील सर्वसामान्य जनतेलाहि 'हा घरांत शिरला प्रबळ शत्रु पारखा' ह्याची खंत वाटे. जवळ जवळ आपल्या हातांत आलेलें अखिल भारताचें प्रभुत्व, जवळ जवळ प्रस्थापित आणलेली हिंदुपदपादशाही या अिंग्रजांनीं पाहतां पाहतां हातांतून हिसडून नेली ह्याची महाराष्ट्राला मनोमन चीड येअी. त्यांच्या वैभवाची नि पराभवाची तोंवर ताजी असणारी आठवण कांहीं केल्या बुजेना. अिकडे रामेश्वर ते तिकडे अटकेपर्यंत रणांगणें गाजवीत फिरणारे त्यांचे दळभार त्यांच्या स्वप्नांत त्यांना अजून दिसत असत. आणि सिंधु नदीचें पाणी पीत असलेल्या त्यांच्या सहस्रावधि विजयी घोड्यांच्या टापांचे पडसाद अजून त्यांची झोपमोड करीत असत. ब्रिटिशांशीं आलेलें त्यांचें वैर ते विसरले नव्हते. तें वैर अुगविण्यासाठीं अठरारों सत्तावनच्या क्रांतियुद्धांत नानासाहेब, बाळासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मी प्रभृति पराक्रमी नेत्यांनीं रणांगणांत त्या परकीय ब्रिटिशांच्या रक्ताचा सडा पाडीत जवळ जवळ तीन वर्षें तुंबळ झुंज दिली. त्यांतहि पराभव झाला. नंतर त्यांना निशस्त्र केलें गेलें. सैन्यांत मज्जाव झाला. सैनिक परंपरा नि सैनिक गुण ऱ्हास पावत चालले. दारिद्र्य, दुष्काळ, दुर्दशेच्या चक्रांत ते पिसले जात होते. परराज्याची खंत वाटत होती पण स्वराज्य परत मिळविण्याचा कांहीं मार्ग दिसेना. तथापि मराठी स्वराज्याच्या नि साम्राज्याच्या काळांत ज्यांनीं मोठेमोठे पराक्रम केले नि मानसन्मान अुपभोगिले त्या राजेमहाराजे, संस्थानिक सरदार, जहागिरदार वतनदार, शास्त्री पंडित, गडकरी मानकरी, शिलेदार बारगीर, अित्यादिकांचे पुत्र किंवा फार तर पौत्र गांवोगांव जे विखुरलेले होते त्यांतील बहुतेकजण तें स्वराज्य ज्या ब्रिटिशांनीं छिनावून नेलें त्यांच्या विरुद्ध मनामनांतून जळफळत होते. परंतु ते अकर्मण्य, अवश, असंघटित नि अवाक् होते ब्रिटिशांच्या करड्या शासनामुळें!

सारांश महाराष्ट्राचें राज्य पूर्णपणें जिंकलें गेलें होतें. पण महाराष्ट्राचें मन पूर्णपणें जिंकलें गेलें नव्हतें.

तें पराजितांचें मनहि जिंकण्यासाठीं अिंग्लिशांनीं हिंदुस्थानभर अिंग्रजी शिक्षणाची नि मिशनरी प्रचाराची जी रामबाण मात्रा अुपयोजिली होती तिचा प्रयोग महाराष्ट्रांतहि चालविला. परंतु मद्रास, बंगाल अित्यादि प्रांतांतून तो अिंग्लिशांच्या अपेक्षेप्रमाणें जितका यशस्वी झाला तितका तो महाराष्ट्रांत यशस्वी झाला नाहीं. अितकेंच नव्हे तर ह्या महाराष्ट्रीय लोकांच्या प्रकृती-नुसार त्या मात्रेनें ब्रिटिशनिष्ठा वाढते कीं ब्रिटिशद्रोह अशी चिंता परिणामा-वरून दहावीस वर्षांतच अिंग्रजी राज्यकर्त्यांना नि कारस्थान्यांना पडली.

महाराष्ट्रांत अिंग्रजी शिक्षितांचा हा जो नवा वर्ग अिंग्रजांनीं निर्मिला त्याचे स्थूलमानानें तीन पक्ष पाडतां येतील.

**पहिला पक्ष** म्हणजे, वर बंगालमधल्या ज्या पक्षाचें आम्हीं '**ब्रिटिशनिष्ठ पक्ष**' म्हणून वर्णन केलें आहे त्या प्रकारचा महाराष्ट्रीय अिंग्रजीशिक्षितां-तील ब्रिटिशनिष्ठ पक्ष होय. आपलें स्वराज्य गेलें हें बरें झालें; ब्रिटिश राज्य म्हणजे हिंदुस्थानचे कल्याणासाठीं अीश्वरानें आम्हांस दिलेलें वरदान होय; त्यांची सत्ता नि कृपाछत्र आमच्यावर निदान तीनचार शतकें तरी रहावें ह्यांतच आमचें कल्याण आहे; आमचे झाडून सारे पूर्वज अडाणी, धर्मभोळे, नि मूर्ख होते; नाना फडणवीस आज असता तर तो वेड्यांतच काढला जाता; सत्तावनचें बंड ही स्वदेशावर कोसळलेली आपत्ति होती; त्या अधम बंडवाल्यांनीं राक्षसी अत्याचारांनीं भरलेला हा जो कृतघ्न राजद्रोह केला त्यामुळें आमच्या राजनिष्ठ तोंडांना नित्याची काळोखी फासली, तरीहि त्या सार्‍या महापापांची क्षमा करून अिंग्रजांनीं जें 'राणीचें घोषणापत्र' प्रसिद्धिलें तो आमचा 'मार्गनाचार्टाच' होय; अिंग्रज न्यायी आहेत, आमचा अुद्धार केला कीं आपण होअून ते राज्य परत देतील. पण त्यांनीं कृपावंत होअून तसें करण्याची घाअी मात्र करूं नये!—अित्यादि सूत्रें ह्या 'Providential dispensation'-वाल्या पक्षाच्या पाट्यांवर पुजलेलीं होतीं. त्यांचा अुपदेश अुजळ माथ्यानें ते अेकसारखा करीत असत.

अुदाहरणार्थ, ह्या पक्षांतील अेक धुरंधर रावसाहेब मंडलीक सत्तावनच्या क्रांतियुद्धासंबंधीं म्हणतात, "हा जो गतिभ्रमापासून स्फोट झाला आहे, तें

अेक आमच्या राष्ट्रावर अरिष्टच आलेलें आहे. कंपनीच्या राज्यांत सुधारणा करण्याची, व ज्याला पाहिजे असेल त्याला न्याय मिळेल असें करण्याची अिच्छा आहे—पण आतां ह्या 'शिपायांच्या बंडामुळें' आमची किती पिछेहाट होअील तें कळत नाहीं." दुसरे त्या काळचे विद्वान विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं तर ह्या सत्तावनच्या 'शिपायांच्या बंडाविषयीं' लिहितांना 'भंड, गुंड, पुंड प्रभृति जो अनुप्रासयुक्त शिवराळपणा केला आहे तो विचारूंच नये. रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख अगदीं गणित करून लिहितात कीं "अिंग्रज लोकांतील अगदीं साधारण मनुष्य असला तरी हिंदुलोकांपेक्षां तो सहस्र गुणांनीं श्रेष्ठ आहे."... (मुसलमानांपेक्षां तो किती गुणांनीं श्रेष्ठ आहे तें सांगण्याची मात्र रावबहादुरांना छाती झाली नाहीं!)..." आणि सांप्रत अिंग्रजलोक हिंदुलोकांपेक्षां शंभरपट शहाणे झाले आहेत आणि तें शहाणपण हिंदुलोकांस प्राप्त व्हावें अेतदर्थ अीश्वरानें हा मुलुख त्यांचे ताब्यांत दिला आहे." (शतपत्री). ह्या पक्षांत कांहीं मोठमोठे विद्वान, कांहीं प्रामाणिक देशभक्त नि बाकी पोटभरू नि संधिसाधू डॉक्टर, बॅरिस्टर, आय. सी. अेस. सरकारी चाकरीसाठीं अिंग्रजांची हांजी हांजी करणारें पेंढार भरलेलें असे. तथापि बंगाल, मद्रास प्रभृति प्रांतांत बहुतेक अिंग्रजीशिक्षित जसे याच 'ब्रिटिशनिष्ठ' पक्षाचे होते, अपवाद असा तुरळक, तशी स्थिति महाराष्ट्रांत झाली नाहीं. तर ती स्थिति होती त्याच्या अुलट. अिंग्रजी शिक्षितांतहि ब्रिटिशनिष्ठ पक्षाची संख्या मोठी नव्हती. पण ब्रिटिश सरकार जाणून बुजून त्यांनाच, त्यांनीं काढलेल्या संस्थांनाच, त्यांनीं केलेल्या आवेदनांनाच सार्‍या जनतेचे खरे प्रतिनिधि, लोकमतप्रदर्शक म्हणून मान्यता देअी. सार्वजनिक प्रश्नीं त्यांच्या शिष्टमंडळाचें म्हणणें अैकून घेअी. देणें घेणें शून्यच, पण अैकून घेअी. सरकार दरबारीं त्यांना या बसा म्हणे.

त्यांच्या पक्षांत चपखल बसत नसले तरी त्यांचे नेतृत्वाची माळ ज्यांच्या गळ्यांत पडलेली होती आणि ज्यांनीं ती पढूं दिली त्या अेका थोर पुरुषास मात्र स्वतंत्रपणें अुल्लेखिलें पाहिजे. त्यांचें नांव रावबहादुर महादेव गोविंद रानडे. ही गोष्ट खरी कीं त्यांच्या तोंडीं Providential Dispensation हा शब्द वरील अर्थीं रुळलेला होता. अिंग्रजांचें राज्य आमच्यावर आलें हें अीश्वराचें वरदान होय, आपल्या हिताचीच ती गोष्ट झाली, असलीं वाक्यें त्यांच्या तोंडांतून निघत

खरींच. ते ब्रिटिशांचे सेवेंत अुच्चपदीं चढलेले अधिकारी होते नि ती चाकरी त्यांना सोडणें अिष्ट वाटत नव्हतें म्हणून म्हणा किंवा राजद्रोहाच्या किंवा राजकर्त्यांच्या तडाख्यांत आपण नि आपला पक्ष सांपडूं नये म्हणून म्हणा पण हीं वाक्यें जीं त्यांच्या तोंडून निघत तीं केवळ तोंडूनच निघत कीं हृदयांतून हें निश्चितपणें आजहि सांगतां येत नाहीं. तें कांहीं असलें तरी रावबहादुर रानड्यांनीं अैतिहासिक, अर्थशास्त्रीय, सामाजिक, धार्मिक नि विशेषतः राजकीय अशा राष्ट्रीय जीवनाच्या अंगोपांगांत नवजीवन संचारविण्यासाठीं आणि नाना लहानमोठ्या संस्था स्थापून, चालवून, विस्कळित समाजाला संघटित क्रियाशीलतेचें वळण लावण्यासाठीं अितकी अुदंड लोकसेवा केली आहे कीं महाराष्ट्रालाच नव्हे तर हिंदुस्थानालाहि त्यांचे ते अुपकार केव्हांहि विसरतां येणार नाहींत. त्यांतहि हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं ह्या 'ब्रिटिशनिष्ठ' समजल्या जाणाऱ्या, 'रावबहादुर' 'न्यायमूर्ति' म्हणून अिंग्रजांनीं दिलेल्या पदव्यांना नि अधिकारांना स्वीकारणाऱ्या रानड्यांचा 'सशस्त्र क्रांतिनिष्ठ' फडक्यांशीं कांहीं तरी संबंध होता असा बळकट संशय अिंग्रजांनाच आला होता! यावरूनहि त्यांच्या Providential Dispensation-वादी ब्रिटिशनिष्ठेच्या अंतरंगावर मर्मभेदक प्रकाश पडल्यावांचून रहात नाहीं!

**महाराष्ट्रांतील अिंग्रजी शिक्षितांचा दुसरा पक्ष** म्हणजे वरील 'ब्रिटिश-निष्ठ' पक्षापेक्षां संख्येनें अधिक, योग्यतेनें तुल्यबळ, असा निर्भेळ **स्वदेश-निष्ठांचा**. आपलें स्वराज्य गेलें ही गोष्ट त्यांच्या जिव्हाग्रीं झोंबे. अिंग्रजी राज्य आलें ही देवाची करणी नसून ती आहे सैतानाची! तें वरदान नसून तो आहे अेक भीषण शाप! अशक्य तें शक्य होअून आज जरी स्वराज्य आलें, ती परकीय सत्तेची बेडी आपल्या मातृभूमीचे पायांतून ताडकन तुटली तर तें मात्र देवाचें वरदान म्हणतां येअील. ही ह्या पक्षाची मनोमन असलेली कडवी देशनिष्ठा अिंग्रजी शिक्षणानें अिंग्रजांच्या कूट अपेक्षेप्रमाणें लोपली नाहीं तर अुलट अिंग्रजी अितिहास नि वाङ्मय वाचून अधिकच अुफाळली. हिंदूंची स्वधर्मनिष्ठा डळमळविण्यासाठीं मिशनरी बायबलचीं पुस्तकें फुकट वाटीत. शाळांतून हिंदु मुलांना ती बळानें शिकवीत. पण ह्या पक्षांतील लोकांनीं तींच बायबलें त्यांच्या तोंडावर फेकून मिशनऱ्यांना सळो कीं पळो केलें. हिंदूंच्या पुराणांना कोणी मिशनरी 'भाकडकथा' म्हणाला न म्हणाला कीं ह्या मंडळींनीं

त्याच्या बायबलांतील 'सृष्टीच्या अुत्पत्तीच्या' पहिल्या अध्यायापासून तों थेट 'येशूच्या अुत्पत्तीच्या' अक्षतयोनि संभवापर्यंतच्या बायबलांतील कथांची तोडीस तोड देत, 'तर मग ह्यापण भाकडकथाच नव्हेत काय?' असा अुलट प्रश्न विचारून, त्या मिशनऱ्याचें तोंड बंद केलेंच म्हणून समजावें. अिंग्रजी न शिकलेल्या पंडितांना तें तितकें जमत नसे कारण मूळ अिंग्रजी बायबल त्यांनीं वाचलेलें नसे. पण ह्या अिंग्रजीशिक्षित मंडळींनीं नुसतें अिंग्रजी बायबलच नव्हे पण स्वतः ख्रिश्चन लोकांतीलच फ्रेंच क्रांतिकारकांसारख्यांनीं किंवा बुद्धिवादी तत्वज्ञान्यांनीं बायबलच्या अस्खलनीयतेचे काढलेले वाभाडेहि वाचलेले असत! स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृति ह्यांचा अभिमान ह्या पक्षाचे हृदयांत सदैव रसरसलेला असे. अिंग्रजी शिक्षणानें तो विझून जाण्याचे ठायीं अुलट तेजाळला जाअी. त्यांना कालपरत्वें अवश्य त्या सुधारणाहि हव्या होत्या. अिंग्रजी शिक्षणानें झालेले अनेक लाभहि ते नाकारीत नसत. आपल्या पूर्वजांविषयीं नि प्राचीन अितिहासाविषयीं कोणी वाह्यात् निंदा केली तर अरेस कारे म्हणून त्यास ठणकविण्यास ते जरी सोडीत नसत तथापि आपलें राज्य ज्या आपल्यांतील न्यूनतेमुळें गेलें त्या न्यूनतेकडेहि ते दुर्लक्ष करीत नसत. तथापि कांहीं झालें तरी अिंग्रजांच्या राजकीय दास्याचें जूं आम्ही आमच्या मानेवर आनंदानें आजन्म वागवावें आणि त्यांतच आपलें कल्याण आहे अशी निष्ठा बाळगून अुलट त्यांचे आभार मानावे असे हे अिंग्रज कोणी देवदूत लागून गेले आहेत कीं काय किंवा आम्ही मेलेल्या आअीचें दूध प्यालों आहोंत कीं काय! अशा सडेतोड टीकेची झोड अुठवून या 'स्वदेशनिष्ठ' पक्षानें पहिल्या 'ब्रिटिशनिष्ठ' पक्षाच्या अिंग्रजाळलेल्या उपदेशाची नि आचरणाची भंबेरी अुडवून द्यावी. त्यांनीं अिंग्रजी राज्यापासून होणाऱ्या राष्ट्राच्या सर्वांगीण दुर्दशेच्या, दारिद्र्याच्या, दुष्काळाच्या दुखापती उघड्या करून जनतेस दाखवाव्या नि तिच्यामध्यें अिंग्रजांविषयीं शक्य तो तिटकारा अुत्पन्न करावा. परंतु आपला देश सर्वतोपरी असंघटित नि अशस्त्र झालेला असतां अिंग्रजांचें राज्य शस्त्रक्रांतीनें अुखडून टाकण्याचा यत्न करणें किंवा तशी नुसती आकांक्षा बाळगणें हें सुद्धां या पक्षालाहि पापकारक किंवा असमर्थनीय नसलें तरी मूर्खपणाचें नि आत्मघाताचें वाटे. असलेल्या परिस्थितींत अिंग्रजीसरकाराविरुद्ध लोकांत शक्य तितका असंतोष पसरवावा, त्यापायीं बंदिवासादि संकटें आलीं तरी डरूं

नये, ठिकठिकाणीं सरकारला संघटित विरोध करण्याचें धैर्य नि क्षमता जनतेंत अुत्पादावी—पण तो विरोध घटनात्मक नि नैर्बंधिक (Constitutional & Legal) कक्षेबाहेर मात्र जाअू देअू नये : हिंदुस्थानभर असें प्रचंड आंदोलन चालू ठेवलें असतां आज ना अुद्यां मुळचें घटनात्मक (Constitutional) प्रकृतीचें असणारें जें तिकडचें जातिवंत ब्रिटिश लोकमत तें जागृत होअील, कांहीं अंशीं त्यांच्या स्वतःच्याच हितासाठीं नि कांहीं अंशीं त्यांच्या जातभाअींकडून हिंदुस्थानभर होत असलेल्या अन्यायाची खंत वाटून ब्रिटिश सरकार हिंदुस्थानच्या मागण्या पुरवूं लागेल, राणीच्या घोषणेंतील प्रतिज्ञेप्रमाणें हिंदुस्थानी प्रजाजनांना ब्रिटिश नागरिकांप्रमाणेंच समानतेनें वागवूं लागेल : अितकें साधलें कीं मग पुढचें पुढें. असा होता ह्या दुसऱ्या देशनिष्ठ पक्षाचा कार्यक्रम, धोरण नि अंधुक आशावाद. मनांत कांहींहि घोळत असलें तरी हा 'स्वदेशनिष्ठ' पक्षसुद्धां 'स्वराज्य'—म्हणजे अिंग्रजांचें राज्य नष्ट करून स्थापलें जाणारें आपलें स्वतःचें राज्य या अर्थाचें स्वराज्य—हा शब्द आपल्या जनिक आंदोलनांत अुच्चारीत नसे. कारण तसें करणें अिंग्रजी दंडविधानाच्या, 'Criminal Law'च्या, कक्षेंत त्या काळीं तरी सहजच ढकललें जातें. नैर्बंधिक मर्यादेंत आपली सारी राजकीय चळवळ नसावी म्हणून ह्या पक्षाचे पुढारी पुनःपुन्हां हडसून खडसून सांगत कीं, "बादशहाचे आम्ही अिंग्रजांअितकेच राजनिष्ठ प्रजाजन आहोंत. वाद काय तो बादशहांनीं नेमलेल्या मंत्र्यांशीं, अधिकाऱ्यांशीं नि सेवकांशीं आहे. राजाशीं नाहीं."

**महाराष्ट्रांतील अिंग्रजी शिक्षितांतहि त्याकाळीं निघालेला तिसरा पक्ष** म्हणजे ह्या 'आमच्या राजाचें' त्या ब्रिटिशनिष्ठ पक्षानें किंवा ह्या स्वदेशनिष्ठ पक्षानेंसुद्धां नांव काढताच 'राजा? ब्रिटिशांचा राजा तो आमचा राजा? घरांत शिरला चोर तयासी मानितसा राजा?" असें उसळून हटकणारा, '**क्रांतिनिष्ठ, सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्ष**' होय! ह्या पक्षाचें अुघड ठावठिकाण कुठेंच सांपडणारें नसे. पण जिथें त्याचें अस्तित्व नाहीं असें ठावठिकाणहि नसे. ज्या सशस्त्र क्रांतिकारक प्रवृत्तीला मारून टाकण्यासाठीं म्हणून अिंग्रज सत्तेनें अिंग्रजी शाळा, प्रशाळा, महाशाळा (Schools, High Schools, Colleges) काढल्या, त्यांमध्यें ह्या पक्षाचे छुपे क्रांतिकारक असत. प्रत्यक्ष अिंग्रजी शासनाची चाकरी करणाऱ्यांतहि त्याचे अनुयायी गुप्तपणें निवसत. अिंग्रजांनींच केलेल्या

निर्बंधांचे (कायद्याचे) कक्षेंत राहून, त्या परक्यांनीं त्यांच्या रक्षणाकरितांच केलेल्या विधिविधानांची मर्यादा न ओलांडतां आम्ही राजकीय चळवळी करूं आणि ब्रिटिशांना नरम आणूं अशी आशा धरणें म्हणजे आजीबाईंच्या गोष्टींतल्या राक्षसाचें मरण ज्या वस्तूंत असे ती वस्तु तेवढी सुरक्षित सोडून त्या राक्षसाला मारण्याची आशा धरण्यासारखें मूर्खपणाचें आहे असें त्यांना वाटे. ब्रिटिश-निष्ठता उत्पन्न करण्याकरतां जें इंग्रजी शिक्षण ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत चालू केलें आणि वर केलेल्या निरनिराळ्या प्रांतांच्या पहाणीवरून ज्या इंग्रजी शिक्षणाचा प्रयोग तसा ब्रिटिशनिष्ठ वर्ग उत्पन्न करण्यांत बंगाल, मद्रास प्रभृति प्रांतांत यशस्वी झाला त्याच इंग्रजी शिक्षणामुळें महाराष्ट्रांतील ह्या ‘क्रांतिनिष्ट’ पक्षावर मात्र उलट परिणाम झाला. त्यांच्यांत इंग्रजी विद्येनें ब्रिटिशनिष्ठा न रुजतां ब्रिटिशद्वेष रुजला, हिंदुस्थानची दुर्दशा करणाऱ्या ब्रिटिशांच्या कारवाया त्यांना ब्रिटिशांच्याच ग्रंथांतून अधिक विस्तारशः कळल्या, युरोप-अमेरिकेंतील देशस्वातंत्र्याच्या युद्धकथा वाचतां आल्या. त्यांची दृष्टि विशाल, त्यांचें ध्येय व्यापक, त्यांचें ज्ञान अद्यावत् झालें. इंग्रजी शिक्षणानें होणारे लाभ तेवढे पदरांत पाडून घेऊन तें शिक्षण हिंदुस्थानांत चालू करण्यांत इंग्रजांचा जो कूट हेतु होता तो तेवढा त्यांनीं हाणून पाडला. इंग्रजांचा डाव इंग्रजांवरच उलटविला.

तथापि हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं ह्या पक्षाची ही सशस्त्र क्रांतिनिष्ठा केवळ इंग्रजी शिक्षणाचें अपत्य नव्हतें. इंग्रजी शिक्षण तिला उपोद्बलक झालें इतकेंच काय तें. तिचें स्फूर्तिदैवत होतें श्रीकृष्ण, श्री शिवाजीमहाराज नि त्यांची भवानी तलवार. मुस्लीम पाच्छाहीला पालथी घालून हिंदुपदपातशाहीला उभारणाऱ्या मराठ्यांचा इतिहास होता तिचा पंचम वेद. त्या काळीं अगदीं ताज्या असणाऱ्या सत्तावनच्या क्रांतियुद्धांतील नानासाहेब, तात्या टोपे, झांशीची राणी प्रभृतींच्या वीरकथा तेव्हां उघडपणें संकीर्तिल्या जाणें जरी इंग्रजांच्या कडक कटाक्षामुळें अशक्य होतें तथापि त्या त्यांच्या कानाकानांतून नि मनामनांतून कुजबुजल्या जात, त्यांचीं अंतःकरणें पेटवीत जात. तें क्रांतियुद्ध महाराष्ट्रांतहि वाढविलें जाण्याची गुप्तसिद्धता सन सत्तावनमध्येंच चालली होती. विलंब काय तो सेनापति तात्या टोप्यांच्या संघटित सैन्यानें महाराष्ट्रांत घुसण्याचा होता. ह्या कारणामुळें तर सेनापति टोपे जेव्हां महत्प्रयासानें ससैन्य नर्मदा

अुतरले तेव्हां अिंग्रजांची अेकच तारांबळ अुडाली. पण निजामच्या देशद्रोही विश्वासघातानें सेनापति तात्या टोप्यांना पुढें येणें अशक्य होअून पुन्हां नर्मदा ओलांडून परत फिरावें लागलें. त्यामुळें महाराष्ट्रांतील त्यांचे अनेक साथीदार अुघडे पडले, त्र्यंबकेश्वरचे गडकरी (किल्लेदार) जे जोगळेकर त्यांना नि तशा मोठमोठ्या प्रस्थांना फांशीं देण्यांत आलें. तथापि त्या अरिष्टांतूनहि बचावलेले अनेक महाराष्ट्रीय जे त्या क्रांतियुद्धांत ब्रह्मावर्ताकडे झुंजले किंवा दक्षिणेंत त्या कार्यीं झटले ते आतां नाना वेषानें नि नाना मिषानें महाराष्ट्रांत भूमिगत होअून कालक्रमणा करीत होते. तेहि ठिकठिकाणीं गुप्तरूपानें या नव्या अिंग्रजी शिक्षित देशभक्तांतील झुंजार तरुणांना मातृभूमीच्या स्वातंत्र्यार्थ अिंग्रजांशीं लढण्याचा फिरून प्रयत्न करून पहा.असें चेतवीत होतेच.

सशस्त्र क्रांतीनें अिंग्रजाला हुसकून दिल्यावांचून तो केवळ न्यायबुद्धीनें राज्य सोडून जाअील ही गोष्ट त्रिकालींहि घडणार नाहीं हा असे त्यांचा आद्य सिद्धांत. "पण तशी सशस्त्र क्रांति शक्य नाहीं, तो तुमचा मूर्खपणा आहे, अुगीच आपल्यावर मरण ओढवून कां घेतां!" असा कोणा ब्रिटिशनिष्ठ वा स्वदेशनिष्ठ पक्षांतील शहाण्यानें त्यांना अगदीं कळकळीनें अुपदेश केला तरी ते त्यांचे आभार मानीत पण म्हणत, "मरण ? आमच्या मातृभूमीच्या सिंहासनावर ह्या तिच्या शत्रूनें चढून बसावें नि आम्हीं तें जिवंत राहून पहावें हेंच आम्हांस मरणाहून असह्य वाटतें. शक्य असो नसो, यश येवो वा अपयश, आम्ही आमच्यापुरता तरी त्या देशशत्रूचा सूड अुगविणार! अशा सूडापायीं जें मरण येअील त्याचेंच आम्हांस ह्या पौरुषशून्य जीवनाहून अधिक आकर्षण वाटत आहे. कारण यशस्वी राज्यक्रांतीचा वणवा जेव्हां केव्हां भडकतो तेव्हां तो अशाच प्रतिशोध घेणाऱ्या हैतात्म्याच्या जळत्या चितेंतील आगीनेंच भडकतो. आम्ही आमचें कर्तव्य करणार—मग अितर कोणी मागें येवो वा न येवो!"

प्रकरण सहावें

# अिंग्रजांच्या छावणींत

(सन १८६० ते सन १८८४)

सत्तावनच्या क्रांतियुद्धानंतर हिंदुस्थानी जनतेंतील राजकीय मनःस्थितीची नि चळवळीची येथवर आपण प्रांतवार अुडती पहाणी केली. आतां त्याच काळांत हिंदुस्थानावर स्वामित्व गाजविणाऱ्या अिंग्रजी सत्ताधिकाऱ्यांच्या नि कारस्थान्यांच्या छावणींत कोणते विचारप्रवाह वहात होते याचाहि थोडासा कानोसा घेअूं.

त्या अिंग्रजी राज्यकर्त्यांमध्यें दोन गट पडले होते. पहिला नि बहुसंख्य पक्ष निर्भेळ सोटेशाहीचा पुरस्कर्ता असे. सत्तावनच्या क्रांतियुद्धांत अिंग्रजांनीं संपादिलेल्या बलवत्तर विजयाची ह्या पहिल्या गटावर अशी कांहीं धुंदी चढलेली होती कीं त्यांना हिंदीजनता म्हणजे कःपदार्थ वाटत असे. ते गर्जतः "आम्हीं हिंदुस्थानचें राज्य जिंकलें आहे आमच्या खड्गाच्या बलावर : आणि तें रक्षिणारहि आहोंत आमच्या खड्गाच्या बलावर! आम्ही राज्यकर्ते आहोंत आणि हिंदुस्थान आहे आमचा पददलित दास. हिंदी लोकांच्या मनांत आम्हां विजेत्या अिंग्रजांविषयीं प्रेम वसो वा द्वेष; त्या दुबळ्यांच्या दळांत आमच्या विरुद्ध चोरून मारून कांहीं चळवळ चालो वा वळवळ;—कोण बाळगतो त्याची क्षिति. आम्ही म्हणूं तें धोरण नि बांधूं तें तोरण. त्या विरुद्ध ह्या जितांनीं हूं का चूं करितां कामा नये. नाहींतर किडामुंगीसारखे चिरडून टाकूं या आमच्या पोलादी टांचेखालीं. ब्रिटिशांचें हिंदुस्थानावरील राज्य टिकवायचें असेल तर आमचा राज्यकारभार असा करडा हवा. खड्गाच्या पोलादाचें पाणी दिलेला!"

"खड्गानें राज्यें जिंकतां येतात हें जरी बहुधा खरें असलें तथापि खड्गाचे धारेवर तीं संतत पेलतां येत नाहींत;" अिंग्रजी राज्यकर्त्यांतील तो दुसरा गट, अल्पसंख्य पण अनुभवी आणि राज्यकारभारांत वर्षानवर्षे मुरलेला कूट-

नीतिज्ञांचा गट, त्या पहिल्या सोटेशाही गटाची समजूत पाडण्यासाठीं अुत्तरत असे : "पराजितांनीं ब्रिटिशद्वेषी चळवळ करतांच त्यांना चिरडून टाकणारी दंडशक्ति तर ब्रिटिश मनगटांत हवीच हवी. परंतु विजेत्यांनीं आपल्यावर राज्य करावें असें पराजितांनाच जीमुळें वाटेल अशी मुरळ त्यांना पाडून त्यांच्या राज्याप्रमाणेंच शक्य तों त्यांचें मनहि जिंकण्याची कारवायी करणें हा हिंदुस्थान-सारख्या अफाट देशावर ब्रिटिशांची सत्ता चिरकाल टिकविण्याचा अधिक सोपा नि अधिक स्वस्त उपाय आहे. लार्ड डलहौसीनें तुम्ही म्हणतां तशी जी निर्भेळ सोटेशाही चालविली तिच्यामुळेंच, त्या पूर्वी मराठ्यांशीं वा शीखांशीं लढतांना जितकें ब्रिटिश रक्त शंभर वर्षांत सांडलें नाहीं तितक्या ब्रिटिश रक्ताचा सडा अवघ्या दोन वर्षांचे आंत पाडणारें सत्तावनच्या क्रांतियुद्धाचें संकट ब्रिटनवर गुदरलें ! तें अितक्या लवकर विसरूं नका !"

या दुसऱ्या गटांतील अिंग्रजी कारस्थान्यांच्या धोरणास धरून सत्तावनचें क्रांतियुद्ध संपल्यानंतर हिंदी लोकांचें 'मन जिंकण्या'साठीं अिंग्रजी राज्यकर्त्यांनीं अिंग्रजी शिक्षणादिक काय काय अुपाय योजले त्याची चर्चा मागच्या प्रकरणांतून केलेलीच आहे. त्या अुपायांचे कांहीं परिणाम त्यांच्या मनाप्रमाणें घडून ब्रिटिशांचे राज्याशीं मनःपूर्वक सहकार्य करणारा ब्रिटिशनिष्ठ हिंदीपक्ष सर्व प्रांतांतून विखुरलेला होता नि सामान्य जनतेंतहि क्रांतिशील चेतना मृतप्राय होअून जिकडे तिकडे शांतता पसरलेली दिसत होती हें पाहून या अिंग्रजी कारस्थान्यांना किंचित् हायसें वाटत होतें. त्यांच्या धोरणाला आलेलें हें यश पाहून ब्रिटनमधील जनतेंत आणि राज्यसत्ताधिकाऱ्यांत या पक्षाचें महत्त्व वाढलें होतें. तथापि या पक्षाला हिंदुस्थानविषयीं निश्चितता अशी मुळींच वाटत नसे. वरवरच्या शांततेवर त्यांचा विश्वास नव्हता. कुठें खुट्ट झालें कीं चिंतेनें हा पक्ष कान टवकारून पाही. आणि म्हणे, "सत्तावनच्या अवघ्या एक वर्ष आधीं वरवरच्या थरांतून अशीच शांतता नांदत नव्हती का ? आपण सगळेजण सरठीक, All Well, म्हणून पहाऱ्यापहाऱ्यावरून प्रतिवृत्तें धाडीत नव्हतों का ?" या पक्षांत सत्तावनच्या आगींत होरपळलेले मोठमोठे सैनिक नि नागर (Military & Civil) अिंग्रजी अधिकारी असत. हळूहळू ह्या पक्षाचें प्रमुखत्व ज्या श्रीयुत अे. ओ. ह्यूम ह्या मोठ्या अिंग्रजी अधिकाऱ्याकडे पुढें जाणारें होतें त्यांचीच अेक कथा अुदाहरणार्थ देअूं.

## ह्यूमसाहेबांची कुळकथा

जेव्हां सन सत्तावनच्या मे १० दिनांकाला मिरत येथें क्रांतिकारक सैन्यानें ब्रिटिशांची सत्ता झुगारून दिली, तेथील ब्रिटिशांची कापाकापी केली, एका आठवड्याचे आंत दिल्लीवर चाल करून, तेथील हिंदी सैन्याचे साहाय्यानें तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार मारून आणि दिल्ली जिंकून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची उघड उघड घोषणा केली तेव्हां पूर्वसंकेतानुसार नगरामागून नगरांतून क्रांतिकारक उठावण्या होत चालल्या. त्यावेळीं श्रीयुत ह्यूम-साहेब हे इटावा येथें म्याजिस्ट्रेट नि कलेक्टर होते. त्यांनीं वरील भयंकर बातम्या ऐकतांच त्यांना जे अगदीं विश्वासू नि राजनिष्ठ म्हणून वाटत होते त्या हिंदी सैनिकांना निवडून एक संरक्षक पथक उभारलें आणि असिस्टंट म्याजिस्ट्रेट मि. ड्यानिअेल याच्या हाताखालीं त्या पथकाला देऊन इटावा नगराचे सारे मार्ग रोखून धरले. तथापि त्यांतूनहि वाट चोरून क्रांतिकारकांचे कांहीं सैनिक इटाव्याच्या एका देवळांत येऊन दबा धरून बसले आहेत अशी बातमी ह्यूमसाहेबांना कळली. नेहमींच्या अनुभवावरून ह्यूम-साहेबांना वाटलें कीं नगरांतील आपले राजनिष्ट हिंदी प्रजाजन आपण पुढें होतांच आपणामागें साहाय्यास येतील. अशा विश्वासानें थोड्या हिंदी सैनिकांना घेऊन मि. ह्यूम नि ड्यानिअेल त्या देवळावर चालून गेले. पण पहातात तों काय? आपल्या मागून येण्याचें सोडून ते राजनिष्ठ नागरिकाचे थवे आपल्या आधीच देवळाभोंवतीं जमलेले आहेत, आणि—आणि—त्या देवळांत दडलेल्या क्रांतिकारक सैनिकांचे जयजयकार करताहेत, त्यांना अन्नपाणी पुरविण्याची त्या नागरिकांत अहमहमिका चालली आहे! चिंता नाहीं, नागरिक विश्वासघातक ठरले तरी हें आपलें तें निवडक राजनिष्टांचें हिंदी सैनिक पथक तरी आपल्या पाठीशीं आहेच कीं नाहीं! त्या पथकाला देवळावर तुटून पडण्याची कडक आज्ञा देऊन स्वतः ड्यानिअेल त्या देवळावर पुढें चालून गेला. पण त्याचे मागें कोण आले? अवघा एक हिंदी सैनिक! इतक्यांत देवळांतील क्रांतिकारक तुकडीनें गोळीबार चालू केला. क्षणार्धांत तो हिंदी सैनिक नि स्वतः ड्यानिअेल ठार होऊन पडला. हें दृश्य पाहतांच मागें उभे असलेल्या मि. ह्यूमसाहेबांनीं त्या आज्ञाभंग करणाऱ्या हिंदी 'राजनिष्ठ' पथकास दटावण्याचा सुद्धां त्रास न घेतां मागचें मागें जो धूम पळ काढला तो थेट आपल्या छावणींतील तंबूंत सुखरूपपणें

पोंचेतों! अेकदोन दिवसांतच बाजारांत खळबळ अुडवून देणारी बातमी पसरली कीं जवळच्या मैनपूर नि अलिगढ नगरांतहि क्रांतिकारक अुठाव होअून नागरिकांनीं ब्रिटिशांची सत्ता झुगारून दिली आहे. ब्रिटिश लोकांची ससे-होलपट चालू झाली आहे. त्या सरशीं अिटावा नगरांतहि क्रांतीचा अुघड अुघड अुठाव झाला. दि. २२ मे ह्या दिवशीं ब्रिटिशांनीं तेथें ठेवलेलें सारें हिंदी सैन्य अेका हातांत कृपाण नि दुसऱ्या हातांत पेटलेले पलिते घेअून ब्रिटिशांच्या छावणीवर तुटून पडलें. त्यांनीं सरकारी कोषागार लुटलें, बंदिगृहें सताड अुघडून दिलीं आणि अिंग्रजी सैनिक अधिकारी, पाद्री, व्यापारी, बायकामुलें—झाडून साऱ्या गोऱ्यांना पाडाव करून चेतावणी दिली कीं जर ते अिटावा सोडून आपण होअून तत्काल निघून गेले नाहींत तर त्यांची सरसकट कापाकापी केली जाअील. ह्या भीषण अंतिमोत्तरास अैकतांच अिंग्रजांचा थरकांप अुडाला. जो तो बायका-मुलें घेअून किंवा सोडून वाट फुटेल तिकडे पळूं लागला. पण वाट तरी कशी नि कोणीकडून फुटणार! वाटेवाटेनें गांवांगांवांतून गोरा पाहिला कीं 'मारो फिरंगीको'चा आरोळा अुठे! कापाकापी चाले. पळ काढणाऱ्या गोऱ्यांतहि कठिणतम अवस्था म्हणजे तेथील म्याजिस्ट्रेट नि कलेक्टर ह्यूमची! त्यांना सगळे ओळखणार, अिंग्रजी राज्याचा तेथील मुख्य अधिकारी, पारतंत्र्याचें प्रमुख प्रतीक, म्हणून त्याच्यावर सगळ्यांचा दांत. त्यांतल्या त्यांत चारपांच हिंदी सैनिकांना दया आली. साहेबास दूर वाटेला लावून देतां म्हणाले. पण साहेब पडला गोरा. आणि गोऱ्या रंगाचे तर दिवस भरलेले. जिवंत रहायचें तर रंग हवा काळा. पण तेवढ्यानेंहि भागतें ना. किती तरी गोरे लोक काळा रंग फांसून त्या धुमाकुळींत रानोमाळ पळत असतां त्या रंगावर कुठें तरी अेखादा फरपाटा जाअून तें सारें काळेंबेरें अुघडें पडे आणि 'अरे हा तर गोरा, गोरा!' असें ओरडत लोक त्यास घेरून टाकीत, प्रसंगीं मारून टाकीत. त्यासाठीं दुहेरी सावधगिरी घ्यावयास पाहिजे होती. शेवटीं ह्यूमसाहेबांनीं तोंडाला काळा रंग तर फासलाच पण त्यावर हिंदी स्त्रीसारखा वेष केला नि त्यावर नखशिखांत झांकून टाकणारा बुरखा घातला. तेव्हां कुठें त्या हिंदी सैनिकांनीं तें धाडसी काम अंगावर घेतलें आणि

**त्या राजमान्य राजेश्री ह्यूम बाअीस**

अेटाव्यांतील आडवाटांनीं गुपचूप बाहेर काढून दूरवर नेअून सोडून दिलें.

पुढें जीव मुठींत घेअून कसेबसे लपत छपत ह्यूमसाहेब अिंग्रजी सैन्याच्या अेका तुकडीस जाअून मिळाले (Red Pamphlet, Part II, page 70).

ह्या स्वतःच्या जीवावर बेतलेल्या संकटाचा धसका ह्यूमसाहेबांच्या मनानें जो अेकदां घेतला तो त्यांना शेवटपर्यंत अस्वस्थ करीत राहिला. आणि त्यांच्या राजकारणावरहि त्याचा चिरंतन परिणाम घडला. सत्तावनसारखें सशस्त्र क्रांतीचें संकट ब्रिटिशांवर पुन्हां कोसळूं नये यास काय अुपाय करावा अशी चिंता त्यांना सारखी सतावीत असे. हिंदुस्थानच्या जनतेची शांतता दिखाअू असते. या अफाट देशांतील कोटी कोटी लोकांच्या खालच्या खोल थरांत केव्हां कोठें नि काय निमित्तानें अकस्मात् सशस्त्र क्रांतीची ठिणगी पडेल नि ती कशी नि किती भडकेल याचा कांहीं नेम नाहीं असें त्यांचें वर दिलेल्या स्वानुभवावरून ठाम मत झालें होतें आणि 'सब ठीक है' असें येतां जातां म्हणणाऱ्या ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांचा अशा ढसराअीसाठीं ते सारखा निषेध करीत असत.

अितक्यांत बोलाफुलाला गांठ पडावी तसें होअून ज्या प्रांतांतील अिंग्रजी राज्यकारभाराविषयीं 'सब ठीक है' अशी अिंग्रजांना सर्वसाधारण निश्चिति वाटूं लागली होती त्याच पंजाब प्रांतांत ह्यूमच्या मताच्या अिंग्रजांना जी भीति वाटे ती खरी ठरून अगदीं शांत दिसणाऱ्या सामान्य जनतेच्या अेका कोपऱ्यांत सन १८७२ मध्यें अकस्मात् अेक सशस्त्र क्रांतीची ठिणगी पडली.

प्रकरण सातवें

# पंजाबमधील कूकांची क्रांतिकारक अुठावणी

अिंग्रजी सत्तेविरुद्ध सत्तावननंतर पहिली महत्त्वाची सशस्त्र क्रांतिकारक अुठावणी अशी ही कूकापंथाचीच होय असें आजपर्यंतच्या अुपलब्ध अितिहासावरून दिसतें. तथापि तिची समग्र माहिती देण्याचें हें स्थल नव्हे. या ग्रंथांतील संदर्भापुरता तिचा पुढील सारांश तेवढा दिला कीं पुरे. पंडित रामसिंग कूका हे सन १८२४ मध्यें जन्मले. महाराज रणजितसिंहाच्या सैन्यांत एक सैनिक म्हणून त्यांनीं आपल्या तारुण्यांत चाकरी केली. त्या स्वधर्मीय साम्राज्यास अिंग्रजांनीं विध्वंसिल्यानें त्यांना अितकें दुःख झालें कीं अिंग्रजांच्या सैन्यांत अितरांप्रमाणें भरती न होतां ते आपल्या भैणी नांवाच्या गांवांत परतून धर्मोपदेश करूं लागले. लवकरच अेक साधु म्हणून त्यांची ख्याति वाढून त्यांना गुरु मानणाऱ्यांचा अेक संप्रदाय बनला. त्यांच्या अुपदेशामध्यें गोवधनिषेधाला अितकें प्राधान्य दिलें असे कीं प्रसंगीं स्वतःचा प्राण देअूनहि खाटिकांच्या हातून गायींचा प्राण वांचविणें हें तुमचें धर्मकर्तव्य होय असें ते शिष्यांना आग्रहानें अुपदेशीत. त्यांच्या पंथाला नामधारी पंथ असें नांव पडलें. असें म्हणतात कीं पुढें साधु रामदास नांवाचे कोणी महाराष्ट्रीय साधु त्यांना भेटले नि त्यांनीं गुरु रामसिंगांना असा समादेश (सल्ला) दिला कीं ते गोवधनिषेधादिक ज्या धर्ममतांना प्रतिपादीत असत तें स्वधर्मकार्य स्वराज्यस्थापनेवांचून शक्य होणारें नाहीं. § तो समादेश मनांत ठिबल्यामुळें गुरु रामसिंगांनीं आपल्या धार्मिक पंथाला मोठ्या सावधपणानें

§ सत्तावनच्या क्रांतियुद्धांत पराभव झाल्यानंतर त्यांत लढलेले जे शेकडो क्रांतिकारक पुढारी नि सैनिक भूमिगत झाले नि नाना मिषानें नि वेषानें हिंदुस्थानभर गुप्त संचार करीत राहिले, त्यांपैकीं तर हे 'साधु रामदास' कुणी महाराष्ट्रीय राजकारणी पुरुष नसतील ना ?

राजकीय स्वरूप देण्याचा अुपक्रम केला. प्रथम त्यांनीं अिंग्रजी राज्य-यंत्राशीं नुसता निःशस्त्र असहकार करण्याचा आदेश देअून अिंग्रजी न्यायालयें, आगगाड्या नि अिंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्था यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यांनीं त्यांच्या नामधारी अथवा कूका पंथीयांचा अेक स्वतंत्र टपाल विभागहि अुघडला ! या त्यांच्या चळवळीमुळें पंजाबच्या अिंग्रजी शासक वर्गानें त्यांच्यावर सन १८६४-६५ मध्यें कडक बंधनें घातलीं. अर्थात् अुघड चळवळीस पायबंद बसतांच यथानियम तिचें गुप्तचळवळींत रूपांतर झालें. गुरु रामसिंगांनीं पंजाब प्रांताचीं बारा मंडलें (जिल्हे) कल्पून त्या प्रत्येकावर आपला अेकेक गुप्त मंडलाधिप (कलेक्टर) नेमला. सैन्यांतूनहि धर्माचे आड त्यांनीं राजकीय प्रचार चालू केला. अितक्यांत सन १८६९ मध्यें त्यांचे कांहीं नामधारी कूके मार्गानें जात असतां त्यांची कापण्यासाठीं गायी घेअून जाणाऱ्या मुस्लीम खाटकांशीं गांठ पडली. तेव्हां बाचाबाची होअून त्या मुस्लीम खाटकांना ठार करून नामधारी कूक्यांनीं गायी सोडवून नेल्या. अिंग्रज अधिकाऱ्यांनीं आजूबाजूस धरपकड नि मारहाण चालविली आहे हें पाहून नि आपल्या संप्रदायांतील संकट टाळण्यासाठीं गुरु रामसिंगानें त्या गायी सोडविणाऱ्या शिष्यांना स्वतः होअून सरकारचे स्वाधीन होण्यास सांगितलें नि संप्रदायाचा या प्रकरणाशीं कांहीं संबंध नाहीं असें सरकारास कळविलें. सरकारनें त्या कूका शिष्यांना फांशीं दिलें. हें प्रकरण संपतें तोंच सन १८७२ च्या जानेवारींत अेका नामधारी कूक्यास कांहीं मुस्लीमांनीं घेरून, हाणमार करून, त्याच्या समक्ष अेक गाय ठार केली नि तिच्या रक्तानें त्या कूक्यास नखशिखान्त चोपडून काढलें. हें गाऱ्हाणें गुरु रामसिंगांच्या दरबारांत त्यानें जेव्हां सांगितलें तेव्हां शेकडों कूके संतापानें भडकून गेले. त्यांनीं धर्मशास्त्रांवर तत्काल सूड अुगविण्याची प्रतिज्ञा केली. गुरु रामसिंग थांबा थांबा म्हणत असतांहि शस्त्रास्त्रें मिळविण्यासाठीं मालेरकोटा या मुस्लीम संस्थानावर ते तुटून पडले. मलौधचा किल्ला घेअून शस्त्रास्त्रें लुटून मालेरकोटा नगरावर त्यांनीं चाल केली. अितक्यांत त्या मुस्लीम संस्थानावर संस्थानांस साहाय्य देण्यासाठीं अिंग्रज सरकारनें मेजर कावेन ह्याच्या तुकडीस धाडलें. तिच्याशीं नामधारी कूकांनीं अत्यंत शूरपणें लढा दिला. ते बहुतेक रणांगणांत पडले. जे जिवंत सांपडले त्या साठ-सत्तर नामधाऱ्यांना अत्यंत निर्दयपणें नगराच्या भर चौकांत तोफांच्या तोंडीं बांधलें.

तोफा डागतांच त्यांच्या देहाच्या चिंधड्या चिंधड्या होऊन तुटके हात, पाय, शिरें, मांसाचे गोळे, अुंच अुडून त्यांचा दूरवर सडा पडला. तरीहि ते हिंदु धर्मवीर तोफांनीं अुडवून देअी तों गुरु रामसिंगांचा अखंड जयजयकार करीत राहिले.

पण त्यांचे शिष्य असलेले हे नामधारी कूके वीर मालरकोट संस्थानावर तुटून पडतांच गुरु रामसिंगानें अिंग्रजी अधिकाऱ्यास लगोलग कळविलें होतें कीं 'माझी आज्ञा न पाळणाऱ्या नि बंड करून अुठलेल्या ह्या लोकांचा माझ्याशीं असलेला शिष्यत्वाचा संबंध मीं तोडून टाकलेला आहे. या कृत्याशीं माझा कोणताहि संबंध नाहीं.' परंतु असल्या नकारांनीं अिंग्रज थोडाच बधणार होता! त्यानें गुरु रामसिंगांना अचानक पकडलें नि खटला बिटला कांहीं अेक न भरतां सन १८१८ मधल्या रेग्युलेशनखालीं सीमापार करून ब्रह्मदेशांत धाडलें. निवासनांतील त्या स्थलबंदींतच स्वधर्म नि स्वराज्य यांच्या परित्राणार्थ नि प्राप्त्यर्थ आपले प्राण पणास लावणाऱ्या या थोर हिंदुधर्म गुरूचा सन १८८५ मध्यें अंत झाला. त्यांचा नामधारी पंथ अजून चालू आहे पण तो अेक निर्मेळ धर्मपंथ म्हणून.

गुरु रामसिंग कूकाच्या या सशस्त्र अुठावणीचा किंवा त्या नामधारी धर्म-वीरांच्या हौतात्म्याचा पंजाबमधल्या जनतेवर म्हणण्यासारखा कोणताच राजकीय परिणाम झाला नाहीं. अिंग्रजी सैन्यांतील शीख सैनिक किंवा बाहेरचा शीख समाज ह्यांची कूका पंथाशीं कांहींच सहानुभूति नव्हती. अुलट दहाव्या गुरु गोविंदसिंगानंतर गुरु असा कोणी मानावयाचा नाहीं या शीख संप्रदायाच्या धर्ममताविरुद्ध रामसिंग कूका यांना लोक गुरु मानीत नि ते तो मान मानून घेत ह्याविषयीं सांप्रदायिक शीख समाजाचा गुरु रामसिंगावर नि त्यांच्या नामधारीपंथावर रोषच असे. ह्या आकुंचित दृष्टीमुळें त्यांना नामधाऱ्यांच्या या हौतात्म्याचें कांहींच सोयरसुतक वाटलें नाहीं. मुसलमानांचा तर कूका पंथ हाडवैरी. त्यांची अिंग्रजांनीं अशी वाताहत केलेली पाहून अिंग्रजानें हा आपल्यावर मोठा अुपकार केला अशी कृतज्ञता मुस्लीमांना वाटू लागली. अिंग्रजीशिक्षित हिंदुवर्गाची प्रवृत्ति त्यावेळीं काय होती हें मागें वर्णिलेंच आहे. अेवंच या सशस्त्र क्रांतिकारक अुठावानें पंजाबांत नव्या चेतनेचा लवलेशहि संचरला नाहीं. खडकावर जिवंत ठिणगी पडावी तसें झालें. ठिणगी स्वतःच जळून विझून गेली. खडक दगडचा दगड राहिला.

पंजाबाबाहेर तर या क्रांतिकारक अुठावाचा त्या वेळींहि कांहीं सार्वजनिक गाजावाजा असा झालाच नाहीं. धर्मवीर गुरु रामसिंग हे विवासनांत तिकडे ब्रह्मदेशांत जेव्हां वारले तेव्हां त्या बातमीचा दोन ओळीचा अुल्लेखसुद्धां हिंदुजातीच्या दहापाच वृत्तपत्रांतून आला असेल नसेल. मग अग्रलेखाचें किंवा गौरवपत्र स्फुटाचें नांवच नको. ज्या स्वदेशाच्या नि स्वधर्माच्या अुद्धारास्तव त्या थोर पुरुषानें नि रणांगणांत लढत पडलेल्या वा तोफेच्या तोंडीं दिलेल्या त्याच्या शूर अनुयायांनीं आपल्या प्राणांचे बळी दिले त्यांच्यासाठीं त्या देशामध्यें त्यांच्या देशबांधवांनीं नि धर्मबांधवांनीं सार्वजनिक कृतज्ञतेचा अेक अश्रूहि गाळला नाहीं ! त्यांच्या नामधारी पंथांतील भाविक शिष्यांमध्यें मात्र अशी अेक मायाळू श्रद्धा आजहि प्रचलित आहे कीं गुरु रामसिंग हे वारले ही बातमीच खोटी असून ती अिंग्रजानें केवळ दुष्टबुद्धीनें पसरविली आहे. वस्तुतः आमचा गुरु अजून जिवंतच आहे !

## रामसिंग कूकांची वीर गाथा अुजेडांत आणण्याची पहिली संधि मला मिळाली

मी अिंग्लंडमध्यें गेल्यानंतर सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्धाचा अितिहास लिहिण्याचे अुद्देशानें जेव्हां त्या काळचीं अनेक अिंग्रजी पुस्तकें, पुस्तिका, पत्रकें वाचूं लागलों तेव्हां दोनतीन जुन्या लेखांतून नि पुस्तकांतून कूका, अर्थात् नामधारी, पंथाच्या या सशस्त्र अुठावणीविषयीं विखुरलेले अुल्लेख माझ्या आढळांत आले. ते अेकत्रून मी गुरु रामसिंगाच्या चळवळीची जंत्री केली. अिंडिया हाअुसमध्यें दर आठवड्यास 'फ्री अिंडिया सोसायटीचे' वतीनें माझीं जीं व्याख्यानें होत त्यांपैकीं अेका स्वतंत्र व्याख्यानांत त्या जंत्रीचे आधारें मी गुरु रामसिंगांचा नि त्यांनीं सत्तावननंतर अिंग्रजी राज्याविरुद्ध केलेल्या ह्या पहिल्या सशस्त्र अुठावणीचा अितिहास सांगितला.

आज अुपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणें पहातां गुरु रामसिंगाच्या चरित्रावर झालेलें पहिलें सार्वजनिक व्याख्यान म्हणजे मीं दिलेलें तें अिंग्लंडमधलें व्याख्यानच होय. आणि त्या नामधारी धर्मवीरांना वाहिलेली पहिली सार्वजनिक कृतज्ञ पुष्पांजलीहि आम्हीं त्या सभेत वाहिली तीच होय. तेव्हांपासून संभाषणांतून, व्याख्यानांतून, लेखांतून गुरु रामसिंगांच्या चरित्राची माहिती

सांगण्याची अेकहि संधि मीं आजपावेतों दवडली नाहीं. त्यामुळें आज हिंदुस्थानभर निदान क्रांतिकारकांच्या अभिमान्यांनीं लिहिलेल्या अैतिहासिक साहित्यातून तरी या धार्मिक नि देशवीर कूकांच्या आत्मयज्ञाचा कृतज्ञ अुल्लेख थोडाबहुत आलेला आहे. नि त्या साहित्याच्या वाचकांमध्यें तरी त्या वीरकथेचा परिचय नि प्रसिद्धि होत चालली आहे.

अिंग्रजांच्या सरकारी नि अंतःस्थ गोटांत मात्र त्या कूकांच्या बंडामुळें बरीच चुळबुळ चालू झाली. मागें सांगितलेल्या 'सब ठीक है'वाल्या सोटेशाही किंवा दंडनैतिक अिंग्रजी पक्षाची मि. ह्यूम यांच्या कारस्थानी किंवा कूटनैतिक पक्षानें पुन्हां कडक कानअुघाडणी केली कीं "बघा, हिंदुस्थानांतील सामान्य जनतेच्या दिखाअू शांततेस फसून जाअूं नका म्हणून आम्ही जें म्हणत होतों त्याचें हें घ्या प्रत्यंतर! सुदैवानें कूकांचा पहिला सशस्त्र खटका मुस्लिमांशींच धार्मिक कारणामुळें अुडाला म्हणून त्यांचें बिंग फुटलें आणि मुस्लिमांची सहानुभूतिहि आपणांस (अिंग्रजांना) मिळाली. नाहींतर सत्तावनच्या संकटाची लहानशी कां होअीना पण पुनरावृत्ति होती कीं नाहीं?" पण सामान्य अशिक्षित जनतेंतील कूकांच्या सापेक्षतः लहानशा सशस्त्र अुठावणीमुळें अिंग्रजांतील ह्या 'कारस्थानी' पक्षाचाहि, अिंग्रजी शिकलेला नि म्हणूनच ते ज्याला अिंग्रजाळलेला समजत त्या हिंदुस्थानभर विखुरलेल्या 'ब्रिटिशनिष्ठ' हिंदी वर्गावरील विश्वास मात्र अुडाला नव्हता. अुलट त्या अिंग्रजीशिक्षित पक्षालाच हाताशीं धरून नि संघटित करून त्यांच्या द्वारें सामान्य जनतेंत ब्रिटिश राजनिष्ठेचा प्रचार करावा असे त्याचे बेत चाललेले होते. परंतु अिंग्रजीशिक्षित हिंदी वर्गावरच्या ह्या त्यांच्या नितांत विश्वासालाहि दोनतीन वर्षांच्या आंतच हादरून टाकणारा अेक बलवत्तर फटकारा बसला.

मराठी ... ग्रंथालय ठाणे
९४८९

प्रकरण आठवें

# क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं महाराष्ट्रांत वरील कालावधींत अिंग्रजी शिक्षित वर्गामध्येंच अेक सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्ष अुत्पन्न होअून ब्रिटिश राज्याविरुद्‌ध गुप्त चळवळी करूं लागला होता. शेवटीं त्या पक्षाचे धुरीण असलेले क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनीं आपल्या देशाचें अिंग्लिशांनीं छिनावून घेतलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सन १८७८ मध्यें अुघड अुघड सशस्त्रक्रांतीचें रणशृंग फुंकलें.

ज्या वाचकांना वासुदेव बळवंतांच्या ह्या सशस्त्र अुठावणीचें रोमांचकारी वृत्त विस्तारशः अभ्यासावयाचें असेल त्यांनीं श्रीयुत वि. श्री. जोशी यांनीं अलिकडेच प्रसिद्‌धिलेलें 'वासुदेव बळवंत फडके यांचें चरित्र' हें पुस्तक वाचावें. त्यांत सारा अितिहास साधार, साद्‌यन्त नि सरसपणें वर्णिलेला आहे.

तथापि अिथें प्रस्तुत असलेल्या अशा वासुदेव बळवंतांच्या चरित्रांतील कांहीं घटनांना अुल्लेखिणें अवश्य आहे.

वासुदेव बळवंतांनीं सन १८७९ चे आगेमागें स्वतःच लिहिलेलें अेक आत्मचरित्र आणि त्यांनीं टिपलेली अेक दैनंदिनी ते धरले गेले तेव्हां त्यांच्या सामानांत सरकारचे हातीं सांपडली होती. त्यांच्या नि त्यांच्या साथीदारांवर भरलेल्या खटल्यांतूनहि त्या प्रकरणावर यथेच्छ प्रकाश पडतो. वरील आधारांवर लिहिलेली वासुदेव बळवंतांविषयींची 'सुशील यमुना' किंवा अशाच कांहींशा नांवाची अेक कादंबरी माझ्या लहानपणीं माझ्या वाचनांत आल्याचें आठवतें. ती कादंबरी रावबहादुर रानड्यांच्या प्रोत्साहनानें लिहिलेली होती. त्यावांचून क्रांतिवीर फडक्यांच्या सशस्त्र अुठावणीविषयींच्या अनेक दंतकथाहि आम्ही तरुण मंडळी त्यावेळच्या प्रौढांकडून मोठ्या अुत्सुकतेनें अैकत असूं. आमचीं क्रांतिप्रवण हृदयें त्या वीरकथा अैकतांना स्फुरण पावत. मी नाशिकला शिक्षणासाठीं जेव्हां

आलों आणि आमच्या गुप्तसंस्थेची अेक प्रचारकी प्रकट शाळा म्हणून 'मित्र-मेळ्या'ची जेव्हां स्थापना केली तेव्हां त्याच्या बैठकींत आमच्या क्रांतिकारक गुरुपरंपरेचीं जीं चित्रें लावलेलीं असत त्यांत, अेका शिंप्याच्या दुकानांत त्यानें मोठ्या भक्तीनें पण आड पडद्यानें ठेवलेलें फडक्यांचें अेक भव्य चित्र असे तें आणून तेंहि आम्हीं लावलेलें होतें.

वासुदेव बळवंतांचा जन्म सन १८४५ मध्यें झाला. ते बारातेरा वर्षांचे असतां अुत्तर हिंदुस्थानांत सत्तावनचें क्रांतियुद्ध भर रंगांत आलेलें होतें. तिकडील नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाअी प्रभृति क्रांति-युद्धांतील पुढाऱ्यांच्या नि रणसंग्रामांच्या वीरकथा महाराष्ट्रामध्यें हाटाहाटांतून नि गटागटांतून कांहीं प्रकटपणें तर कांहीं अंतःस्थपणें चर्चिल्या जात होत्या. वासुदेव बळवंतांच्या घरींहि त्यांच्या वडिलांची मित्रमंडळी त्या खळबळ अुडविणाऱ्या नवनव्या बातम्या अैकण्यास जमत असत. त्या बैठकांमध्यें त्यांचे वडील जेव्हां त्या रोमांचकारी कथा सांगूं लागत तेव्हां त्यांच्या तोंडाकडे टक लावून कुमार वासुदेवहि ब्रिटिशांच्या राज्याचा अुच्छेद करून स्वदेशाला स्वतंत्र करण्यासाठीं जुंपलेल्या त्या सन सत्तावनच्या धर्मयुद्धांतील तो अुत्क्षोभक वृत्तान्त अेकाग्रपणें अैकण्यांत अगदीं गुंगून जाअी. पुढें अेका प्रशालेंत (हायस्कूलमध्यें) कुमार वासुदेवनें अिंग्रजी शिक्षण घेतलें. ती प्रशाला सोडल्यानंतरहि अिंग्रजी ग्रंथ वाचून वासुदेव बळवंतांनीं थोड्याच वर्षांत त्या भाषेचें बरेंच ज्ञान मिळविलें. त्यांना अिंग्रजींत बोलण्याचीहि चांगली सवय होती. कांहीं वर्षें अिकडे तिकडे चाकरीचा अनुभव घेअून ते शेवटीं सन १८६५ मध्यें पुण्यास सरकारी 'सैनिक अर्थ विभागांत' (Military Finance Department मध्यें) लेखनिकाचें काम करूं लागले. पुण्यास आल्यावर त्यांच्या मनांतील खनिज स्थितींत असणाऱ्या स्वदेशभक्तीच्या पोलादास पुण्याच्या राजकीय वातावरणाची धार चढली.

इतक्यांत त्यांच्या मनाला क्षुब्ध करणारी अेक वैयक्तिक घटना घडली. जिच्यावर त्यांचें आत्यंतिक प्रेम असे ती आअी त्यांच्या शिरढोण नांवाच्या मूळ गांवीं अत्यवस्थ असल्याचें त्यांना कळलें. तिला तत्काळ भेटण्यास जाण्यासाठीं त्यांनीं त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अवसर (रजा) मागितला. परंतु ती अनुज्ञा त्यांना तत्काळ मिळेना. तेव्हां ते वरिष्ठांच्या अनुज्ञेवांचूनच पुणें सोडून थेट

आपल्या गांवीं चालते झाले. पण घराच्या दारांत पाऊल टाकतात तोंच त्यांना कळलें कीं त्यांची आई आधींच निवर्तली आहे ! हें ऐकतांच त्यांच्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. माझी आई आतां मला या जन्मांत पुन्हां केव्हाहि दिसणार नाहीं ना अशी त्यांनीं हाय घेतली. त्यांतहि आपल्या आईला आपली शेवटची भेटसुद्धां घेतां आली नाहीं या दुःखद बोचणीनें तर ते अगदीं वैतागून गेले. ते घरून पुण्यास परतल्यानंतर पूर्वीच्या सरकारी चाकरीवर जेव्हां पुन्हां गेले तेव्हां त्यांची आई अत्यवस्थ असल्याची बातमी येतांच ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांना लगोलग अवसर दिला नाहीं त्यांच्याशीं त्यांचें कडाक्याचें भांडण झालें. त्या अन्यायासाठीं त्यांनीं वर मुंबईसरकारापर्यंत प्रतिवाद केला. पण त्याच्यासारख्या एका खालच्या लेखनिकाचें (clerk चें) कोण ऐकणार ! पुढें त्यांच्या आईच्या वर्षश्राद्धासाठींसुद्धां त्यांना जेव्हां अवसर देण्यांत आला नाहीं तेव्हां तर त्यांना नुसतें दुःखच झालें नाहीं तर तो अवसर न देणाऱ्या इंग्रजी अधिकाऱ्यांचा नि अशा हृदयशून्य इंग्रजसत्तेच्या एकंदर राज्ययंत्राचाच तिटकारा येऊन आपल्यावर झालेल्या ह्या अन्यायाचा सूड कसा उगवावा ह्याचा विचार त्यांचें संतप्त मन करूं लागलें.

पण वासुदेव बळवंतांचें तें मन मुळांतच स्वराष्ट्रभक्तीचें नि स्वराज्यनिष्ठेचें बाळकडू प्यायलेलें होतें. त्या संतप्त नि संकुल विचारांच्या वादळांत सांपडलेल्या वासुदेव बळवंतांच्या त्या मनास शेवटीं अशी एक कलाटणी मिळाली कीं तीसरशीं त्यांचें व्यक्तिजीवन राष्ट्रीय जीवनाशीं तादात्म्य पावलें, त्यांच्या व्यक्तिगत क्रोधाचें उदात्तीकरण होऊन त्याला राष्ट्रीय क्रोधाचें सार्वजनिक स्वरूप आलें. त्यांनीं त्यापुढें स्वतःस सर्वतोपरी स्वदेशसेवेस वाहून घेतलें, देशस्वातंत्र्यसंपादनार्थ प्राण पणास लावले.

स्वदेशस्वातंत्र्यार्थ झुंजण्याचा निश्चय होतांच वासुदेव बळवंतांनीं रावबहादुर रानड्यांच्या व्याख्यानामुळें सन १८७२–७३ त पुण्यास उसळलेल्या पहिल्या स्वदेशी चळवळीस वाहून घेतलें. अनेकांप्रमाणें त्यांनींहि स्वदेशी वस्त्रें नि वस्तु वापरण्याचें व्रत घेतलें. ते सरकारी चाकरीवर जात तेहि स्वदेशी वेषांतच. पुढें लोकांना चेतविण्यासाठीं त्यांनीं स्वतः व्याख्यानें देण्यास आरंभिलें. त्यांचीं व्याख्यानें कडक होत. यासाठीं त्यांच्या व्याख्यानांची दौंडीहि ते स्वतःच पिटीत. पुण्याच्या चौकाचौकांत थाळी वाजवून ते ओरडत, "लोकहो,

अनुक्रम २९८५४ वि: ५/१२/७१

क्रमांक ८०८७ नों: दि: २९/५/८०

आज शनिवारवाड्यापुढें माझें व्याख्यान आहे. आपला देश स्वतंत्र झाला पाहिजे. अिंग्रजाला हाकलून दिलें पाहिजे. तें कसें तें मी व्याख्यानांत सांगणार आहें!!" अशा व्याख्यानांच्या जोडीस त्यांनीं तरुणांसाठीं अेक व्यायामशाळाहि काढली. ते स्वतः व्यायामांत कसलेले; घोडदौडींत अढळ मांडीचे; खड्ग खंजीर, पट्टा पिस्तुल, बंदूक बरची अित्यादि शस्त्रांच्या वापरांत पटाअीत. लोकांना तें शस्त्र शिक्षण देण्याचा नियमित अुपक्रम त्या व्यायामशाळेंत त्यांनीं चालू केला. ह्या व्यायाम शाळेंत ज्या तरुणांची त्यांच्याभोंवतीं दाटी जमे त्यांत अिंग्रजीशिक्षित विद्यार्थ्यांचा भरणाच विशेष होता. त्यांतील एका विद्यार्थ्याचें नांव होतें—बाळ गंगाधर टिळक!

## शस्त्र अुचलल्यावांचून स्वराज्य मिळणार नाहीं

हें त्यांच्या प्रचाराचें ब्रीदवाक्य असे. सन १८७६–७७ मधल्या दुष्काळांत चिडून गेलेल्या अनेक लोकांनीं चोऱ्यामाऱ्या, लुटी दरोडे, यांचा चोहोंकडे धुमाकूळ अुडवून दिला होता. त्यांच्यांतील भिल्ल रामोशी प्रभृति कांहीं कडव्या जातींना वासुदेव बळवंतांनीं हाताशीं धरलें; त्या जातींतील दोनशें तीनशें सशस्त्र लोकांचें मूठभर सैन्य अुभारलें; स्वतःच्या गुप्त संस्थेंतील गद्रे, साठे अित्यादि सुशिक्षित लोकहि सांगाती घेतले. अितर सुशिक्षित नि प्रतिष्ठित अनुयायांकडून वेळोवेळीं लागेल तें गुप्त साहाय्य देण्याचीं वचनें मिळविलीं. आणि शेवटीं सन १८७९ चे आरंभास सशस्त्र अुठावणी करण्याचें त्यांनीं निश्चित केलें. त्याप्रमाणें 'आम्हांस अिंग्रजाचें राज्य अुलथून पाडून हिंदुस्थानांत स्वतंत्र लोकसत्ताक स्वराज्य स्थापावयाचें आहे' अशी प्रकट घोषणा करीत वासुदेव बळवंतांनीं सशस्त्र क्रांतीचें रणशृंग फुंकलें.

हें क्रांतिकारक सैन्य अुभारण्यासाठीं धनवंत लोकांकडे पैसा मागितला तरी कोणीहि देत नाहीं असें अनुभवून त्यांनीं गांवोगांव छापे मारण्यास आरंभिलें. सरकारी कोषागारेंहि लुटण्याचा त्यांचा बेत होता. त्यांच्या टोळ्यांनीं घातलेल्या अशा दरोड्यांमुळें जिकडे तिकडे त्यांचा असा दरारा बसला कीं सरकारी आरक्षकांचें दल (Police Force) त्यांच्यापुढें हतबल झालें तेव्हां मुंबअी सरकारनें त्यांना मोडून काढण्यासाठीं मेजर ड्यानियल यांचे हाताखालीं अेक स्वतंत्र सैनिक तुकडी धाडली. वासुदेव बळवंत जिकडे जात तिकडे घोषित

करीत चालले कीं, " आम्ही कांहीं पोटभरू दरोडेखोर नाहीं. देशस्वातंत्र्यासाठीं अिंग्रजांशीं लढण्यास निघालेले आम्ही सशस्त्र क्रांतिकारक आहोंत ! " आंग्ल शिक्षित वर्गांतील अनेक सरकारी सेवक, शिक्षक, विद्यार्थी, कांहीं मोठे अधिकारी, कांहीं वृत्तपत्रसंपादक अशी मंडळी आंतून आंतून वासुदेव बळवंतांशीं संबद्ध असत. तेहि फडक्यांविषयीं लोकांत सहानुभूति वाढवीत होते. त्यामुळें मेजर ड्यानियलच्या हातावरहि तुरी देअून वासुदेव बळवंतांचा धुमाकूळ जेव्हां वाढतच चालला तेव्हां कौतुकानें लोक त्यांना अुघड अुघड दुसरा शिवाजी म्हणूं लागले. त्यांच्या टोळ्यांतील सैनिक त्यांना 'महाराज' म्हणत. त्या टोळ्यांतील अेका लढवय्याचा मात्र निराळा अुल्लेख करावयास हवा. त्याचें नांव दौलत रामोशी.

## सरदार दौलतराव

रामोशी जातींतील निधड्या छातीचे जवान त्या काळीं बहुधा या ना त्या अुपद्रवकारक चोरादरोडेखोरांच्या टोळींत शिरलेले असत. परंतु वासुदेव बळवंतांच्या स्फूर्तीनें त्यांतील कित्येक जण स्वधर्माभिमानानें देशस्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या स्वयंसैनिकांची पात्रता पावले होते. त्यांच्यापैकीं दौलत रामोशी हा तर वासुदेव बळवंतांचा अितका तत्वनिष्ठ नि अेकनिष्ठ अनुयायी बनला होता कीं त्यांनीं त्याला 'सरदार दौलतराव' ही पदवी देअून त्याच्या हातीं अेका स्वतंत्र सैनिक पथकाचें पुढारीपण सोंपविलें. मेजर ड्यानियल ह्यानेंहि त्याचाच पाठलाग नेटानें हातीं घेतला. मेजर ड्यानियलच्या सैन्याचे तुकडीला आगेमागें हुलकावण्या देत सरदार दौलतराव गांवागांवावर छापे घालीत चालला. अितक्यांत मावळ प्रांतांतील ठिसुराअीच्या टेकडीपाशीं त्याच्या तुकडीची नि मेजर ड्यानियलच्या तुकडीची सरळ गांठ पडली. वृकयुद्धाचे (गनीमी काव्याचे) डाव खेळून नेहमींप्रमाणें पळ काढणें अशक्य दिसतांच दौलतरावांनीं ठाण मांडून ड्यानियलच्या तुकडीवर गोळीबार चालू केला. ड्यानियलचें सैनिकपथक कसलेलें; दारूगोळाहि त्याचा भरपूर. त्यामुळें अुभयपक्षांच्या गोळीबारांचे चकमकींत दोहींकडील लोक हताहत होतां होतां दौलतरावांचें पथक अुधळण्याचे बेतांत आलें. ड्यानियल पुढें घुसला. दौलतरावास त्याचे कांहीं सहकारी म्हणाले, 'आतां आपण स्वतः ड्यानियलला शरण जावें हेंच

अुचित.' 'छट्. मी जिवंतपणीं अिंग्रजांच्या हातीं पडणार नाहीं.' ते अुत्तरले. तोंच लढतां लढतां ड्यानियल आणि ते अकस्मात् कांहीं हातांच्या अंतरावर अेकमेकांसमोर ठाकले. दौलतरावानें लगोलग बंदुक फेकून दिली नि पिस्तुल घेऊन मेजर ड्यानियलवर गोळी झाडली. ती थोडक्यांत हुकली. पण ड्यानियलनें त्याचवेळीं अुलट सोडलेली गोळी दौलतरावांच्या मर्मी लागून ते ठार झाले.

स्वदेशस्वातंत्र्यार्थ अिंग्रजांशीं लढतां लढतां ज्या हिंदुवीरांचें 'अभिमुख शस्त्राघातीं समरमखामाजि राहिलें काय', त्यांच्या नामावलींत सरदार दौलतराव रामोशी या क्रांतिवीराचें नांवहि गौरविलें गेलें पाहिजे !

मध्यंतरीं महाराष्ट्रभर पसरूं पहाणाऱ्या या क्रांतिकारक धामधुमीचा पाडाव करण्यासाठीं मुंबअी सरकारनें कर्नल क्रिस्पिन, मेजर फुल्टन, क्याप्टन ब्रेन प्रभृति निरनिराळ्या अधिकाऱ्यांचे हाताखालीं निरनिराळीं सैनिक पथकें देअून त्यांना अितस्ततः धाडून दिलें. वासुदेव बळवंतांना पकडून आणण्यासाठीं मुंबअी सरकारनें अेक पारितोषक लावल्याची घोषणा केली. तर वासुदेव बळवंतांच्या 'प्रतिसरकारनें' घोषणा केली कीं जो कोणी मुंबअीचा गव्हर्नर सर रिचर्ड टेम्पल, पुण्याचे कलेक्टर नि सेशनजज्ज यांचीं शिरें छाटून आणील त्यास पारितोषक देण्यांत येअील! ह्या घोषणापत्रावर वासुदेव बळवंतांच्या अैटदार मोडी अक्षरांत स्वाक्षरी केलेली असे "पेशव्यांचा नवा मुख्य प्रधान —वासुदेव बळवंत फडके."

फडक्यांनीं आणखी असेंहि प्रसिद्धलें होतें-कीं "आम्ही आतां युरोपियनांवर चाल करणार, देशभर देशशत्रूंना ठार करण्यांत येअील. युरोपियनांविरुद्ध अठरारों सत्तावनच्या बंडासारखें आणखी अेक बंड हिंदुस्थानभर अुभारलें गेल्यावांचून रहाणार नाहीं."

क्रांतिकारकांचीं हीं घोषणापत्रें मोठमोठ्या नगरांतून भिंतीभिंतीवर क्रांतिकारकांपैकीं कोण नि केव्हां चिकटवून जाअी तें बहुधा कळतहि नसे. वासुदेव बळवंतांच्या धमक्या सगळ्याच पोकळ नसतात अितका त्याचा दरारा त्यावेळीं अिकडील युरोपियन वस्तीलाहि वाटूं लागला होता. त्यांतच जेव्हां भर पुण्यांतील विश्रामबाग वाडा नि बुधवार वाडा ह्या मोठमोठ्या अैतिहासिक महत्वाच्या परंतु अिंग्रजांनीं सरकारी वाडे म्हणून हातीं घेतलेल्या वाड्यांना, केशव रानडे

प्रभृति क्रांतिकारकांकडून अेकाच रात्रींत आग लावण्यांत आली आणि ती भीषणपणें भडकत जाअून तींत त्या वाड्यांची सरकारी कागदपत्रांसुद्धां राख झाली तेव्हां तर वासुदेव बळवंत पुण्यावर चाल करून येणार अशी अेकच हूल अुठली. मुंबअीला तशीच हूल अुठली. तेव्हां सत्तावनच्या दिवसांची आठवण असलेल्या नगरग्रामनिवासी युरोपियन लोकांनीं खरोखरच धास्ती खाल्ली. तुटक राहणाऱ्या युरोपियनांनीं आपलीं बायकामुलें सुरक्षित स्थळीं धाडलीं. गट करून राहिले त्यांनीं दारूगोळ्याचा सांठा विकत घेअून सज्ज ठेवला. वासुदेव बळवंत फडक्यांच्या ह्या धामधुमीच्या बातम्या वृत्तपत्रांतून हिंदुस्थानभर पसरल्या. अितकेंच नव्हे तर डेली टेलीग्राफ, मार्निंग पोस्ट, Times अशा अशा

## अिंग्लंडच्या वृत्तपत्रांतूनहि फडके फडकूं लागले !

पार्लमेंटमध्येंहि ह्या महाराष्ट्रांतील सशस्त्र अुठावणीविषयीं प्रश्नोत्तरें झालीं. त्याकाळच्या वृत्तपत्रातील कांहीं अुतारे दिल्यानेंच त्यावेळच्या ह्या वातावरणाची कल्पना अधिक यथावत्पणें येअील. पुरावा म्हणूनहि ते अुतारे बानगीपुरते देणेंच अिष्ट.

अँग्लो-अिंडियन पक्षाच्या 'बॉम्बे ग्याझिट'नें लिहिलें :—

"The rumours that have been flying about Western India for the past few months have now received ample confirmation. The rumorus ascribe to certain members an ambition on their part to renew in Western India those tactics by which Shivaji in days gone by succeeded eventually in sapping the power of the then mighty Mounghal Empire. A little of martial law would do Poona a great deal of good. The Mutiny (of 1857) attained its dangerous proportion mainly because we ignored it at the beginning. There should be no mistake of that sort in Poona now." Bombay Gazette; 15 May, 1879.

"We are sorry that the Government should be away from the Presidency at a time of panic and Bombay was almost panic stricken when it heard on Tuesday last of the dacoity at Palaspe, which is only a few miles from this place." Native Opinion, 18-5-1879, Bombay.

"A feeling of extreme uneasiness at the exploits of the decoits is becoming very general. The people in the city and cantonment of Poona are greatly alarmed. Accounts of dacoities continue to be received in nearly all parts of the presidency. Even the Europeans residing in the Railway lines are frightened into sending their wives and children away for safety." Bombay Gazette, 19-5-1879.

'लंडन टाअिम्स 'नें ह्या धुमाकुळीच्या बातम्या छापून असें मत दिलें कीं, "These armed gangs seem to form a part of a regular organization under the command of one Vasudeo Balwant lately a clerk in the Finance Department." त्याच पत्रानें अेका अग्रलेखांत म्हटलें, "The manifesto sent to the Bombay Governor resembles the insolence of Irish Ribandism. It talks of organizing another Mutiny (of 1857) and invents as its patron a mysterious potentate on whom it bestows the name of Shivaji the Great, founder of the Maratha Empire." London Times 19-5-1879.

मद्रासचे 'अिंडियन डेलि न्यूज 'नें याच मे महिन्यांत लिहिलें, "The people of Poona and Satara have a history of dacoits ripening into successful rebellions, a living history repeated in their folk songs. Vasudeo Balwant's true character has not yet been comprehended. If he be capable of half burning the capital of Maharashtra and of filling all the country with terror at the expectation of his name, the reward (for his capture) appears to be too small." अित्यादि."

कलकत्त्याचें Statesman लिहितें, "It is not strange that the recent incendiarism at Poona should have excited the keenest interest and anxiety throughout the country.. where conflagrations have come to be recognized as serious rebellion...." Statesman 21-5-1879.

शेवटीं अिंग्रजी पथकांनीं चहूंकडून कोंडमारा केल्यानंतर मेजर ड्यानियल यांनीं वासुदेव बळवंतांना जुलैच्या २० व्या दिनांकाला पकडलें. त्यांच्यावर नि त्यांच्या निवडक साथीदारांच्यावर अिंग्रजांच्या राणीसरकाराविरुद्ध सशस्त्र युद्ध पुकारणें नि दरोडे घालणें प्रभृति आरोपांखालीं खटला भरण्यांत आला.

बंदिगृहांत वासुदेव बळवंतांचा छळ झाला. त्यांनीं आत्महत्येचाहि प्रयत्न केला. पण तो फसला. शेवटीं पुण्यास खटला चालला तेव्हां शतावधि लोकांचे थवेच्च थवे वासुदेव बळवंतांचें दर्शन घेण्यासाटीं न्यायालयांत नि भोंवतालीं दाटलेले असत. त्यांच्यांतून वासुदेव बळवंतांचे जयजयकार अुटत असत. तशा दिवसांत अशा 'बंडखोर' आरोपीला विधिज्ञ (वकील) मिळणेंहि दुर्घट. परंतु 'सार्व-जनिक काकां'नीं तें धाडस केलें.

अभियोग चालू झाल्यानंतर वासुदेव बळवंतांनीं विधिज्ञाचे निर्देशानुसार (सल्ल्यावरून) "मीं आत्मवृत्त लिहिलें तें तापानें फणफणलेला असतां लिहिलें. तें पुराव्यांत माझ्याविरुद्ध धरूं नये. रामोशी लोक दरोडे घालतात त्यांना पकडून सरकारचे हातीं द्यावें अशा अुद्देशानेंच काय तो मी त्यांच्यांत मिसळलें. माझा बंड करण्याचा अुद्देश नव्हता. अन्यथांत साक्षीदार पोलिसांच्या धाकानें खोटें बोलताहेत" अशीं नैर्बंधिक लटपटीचीं कांहीं अुत्तरें देअून खटल्यांतून सुटण्याचा डाव टाकला होता. पण तो मुळांतच लुळा पांगळा. म्हणून शेवटीं त्यांनींच तो अुधळून दिला.

खटल्यांत साक्षीदारांनीं सांगितलें कीं वासुदेव बळवंत आम्हांस सांगत असत कीं मला

## ब्रिटिशराज्य अुलथून पाडून हिंदुराज्य स्थापन करावयाचें आहे!

स्वतः वासुदेव बळवंतांनीं लिहिलेलें 'आत्मवृत्त' नि दैनिकी (डायरी) सरकारचे वतीनें पुरावा म्हणून दाखविण्यांत आली. वासुदेव बळवंतांनींहि आपल्या शेवटच्या वक्तव्यांत त्याचा निर्भयपणें अनुवाद केला. त्यांत ते म्हणतात:—"अहो माझ्या सर्व हिंदुस्थानवासी बांधवहो, तुमच्या कल्याणासाटीं मी माझे प्राण पणास लावीत आहें. त्यांत तरी मी कांहीं विशेष करतांसें नाहीं. दधीचि ॠषींनीं आपल्या अस्थिहि देवांच्या कल्याणाकरितां नाहीं का काढून दिल्या? तसेंच माझे प्राण घेअून तरी अीश्वरानें तुमचें कल्याण करावें अशीच माझी प्रार्थना आहे!......(माझ्या देशबांधवांवर अिंग्रजांनीं केलेल्या) ह्या नि अितर अन्यायांचा विचार करतां करतां माझें मन अिंग्रजांच्या नाशा-विषयीं अुद्युक्त होअून गेलें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आणि रात्रीं झोपेंतहि माझा सारला तोच विचार चालू असे. मध्यरात्रीच्या अंधारांत मी

अुठून बसें नि ब्रिटिशांचा अुच्छेद कसा करतां येअील याचा विचार किती तरी वेळ करत बसें......ज्या भूमीचे पोटीं आपण जन्मलों तिच्याच पोटीं हीं सारीं लेकरें झालीं. त्यांनीं अन्नान्न करीत अुपाशी मरावें नि आपण कुत्र्यासारखें पोट भरावें हें माझ्याच्यानें सहावलें नाहीं ! म्हणून ब्रिटिशांविरुद्ध मीं सशस्त्र बंड पुकारलें. नोकरीवर लाथ मारली. आणि स्वराज्यासाठीं लूट मारून पैसे मिळविण्याचें ठरविलें......(अशा क्रमानें) चांगल्या पायावर अुभारलेलें लहानसें बंड अुभारून शेवटीं आपलें राज्य परत कां मिळूं नये!...... (अशा सर्व बाजूंनीं सशस्त्र अुठावण्या होतांच) चमत्कार व्हावा तसें होअून

## माझें अुद्दिष्ट—
## प्रजासत्ताक राज्याची स्थापना

तें पूर्णपणें सिद्धीस गेलें असतें. मग आकाशांतील बापानेंच खालीं अुतरून अिंग्रजांस वांचविलें असतें तर कोणास माहीत !

"पण तें होअूं शकलें नाहीं. शेवटीं मला यश आलें नाहीं. पण अीश्वरालाच माहीत आहे कीं मीं हें सर्व देशासाठीं केलें. अहो हिंदुस्थानवासी लोक हो, माझ्यामुळें तुम्हांला कांहींसुद्धां लाभ झाला नाहीं ! मी माझें अुद्दिष्ट साध्य करूं शकलों नाहीं ! याविषयीं मला क्षमा करा !"

अभियोगांतील सगळी नैर्बंधिक लटपट संपल्यानंतर वासुदेव बळवंतांना जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली. त्यानंतर त्यांनीं पूर्वीं केलेल्या नैर्बंधिक लटपटीं-प्रमाणें अुच्च न्यायालयांत 'मीं बंड केलेंच नाहीं. ब्रिटिशांशीं मी राज्यनिष्ठच होतों' अित्यादि राजनीतीच्या सोंगाढोंगाचें अेक अभ्यर्थन (Appeal) हि केलें होतें. शिवाजीनेंहि मी मुस्लीम बादशाहचा अेकनिष्ठ सेवक आहें, अशीं ढोंगें कित्येकदा केलीं होतीं ! तें अभ्यर्थन फेटाळलें गेलें. शेवटीं जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठीं त्यांना सरकारनें 'अेडन' ला धाडलें.

तेथील कारागृहांत असतांना हा धाडसी पुरुष अेक्या रात्रीं गुप्तपणें हाता-पायांतील बेड्या तोडून, कोठडीचीं दारें अुखळून, कारागृहाचा तट चढून जाअून बाहेर निसटला. पण सकाळीं तें अद्भुत धाडस अुघडकीस आल्यानंतर जिकडे तिकडे सरकारी घोडेस्वारांनीं माग काढीत कित्येक कोस दूरवर दौडत गेलेल्या त्या क्रांतिकारक वीरास तीन प्रहरच्या वेळेस पुन्हां पकडलें ! वासुदेव बळवंत

पुन्हां कारागृहांत पडले. अेकदोन वर्षांतच त्यांचें तें बलाढ्य शरीरहि खंगून गेलें नि सन १८८३ त हा पराक्रमी देशभक्त झिजून झिजून त्या कारागृहांतच मरण पावला.

त्यांच्याविषयीं त्यांच्या देशबांधवांना मनांतून काय वाटत होतें तें त्यांतल्या त्यांत त्या परिस्थितींतील अिंग्रजी निर्बंधाच्या (कायद्याच्या) कक्षेंत जितकें स्पष्टपणें सांगतां येअील तितक्या सहृदयतेनें 'अमृत बझार पत्रिके'नें सांगून टाकलें. त्या वृत्तपत्राचे संपादक लिहितात :—

"Vasudeo Balwant Phadake possesses many of the traits of those high souled men who are now and then sent in this world for the accomplishment of great purposes..... The noble feelings of a Washington, a Tail (of Switzerland) and a Garibaldi animated his breast and if he is not appreciated in this country where patriotism is unknown he will be better appreciated in England and other Western countries....His heart overflowed with love for India....Whatever he had he was willing to offer for his country, even his life. The very idea of establishing a Republic shows the unselfish nature of his mind. He had no intention to establish a Raj of his own....Forget for a moment that Phadake led bands of dacoits and sought the subversion of British Government and then he stands before you as a being as superior to the common herd of humanity as the Himalayas to the Satpura Range." (A. B. Patrica, 15-11-1879).

या सशस्त्र अुठावांत साठ-सत्तर लोकांना 'काळेपाण्या'वर धाडण्यांत आलें. कांहीं प्राणास मुकले. अनेकांचे संसार अद्ध्वस्त झाले. पण आश्चर्य हें कीं हा सशस्त्र लढा अिंग्रजांविरुद्ध पुकारलेला असतांहि त्यांत अिंग्रजांचें रक्त असें सांडलेंच नाहीं, अिंग्रजांचें घरदार असें लुटलें गेलें नाहीं! याचें कारण मुख्यतः क्रांतिकारकांचे कार्यक्रमांतच झालेली दिशाभूल : अंशतः योगायोग.

## रामसिंग कूका नि वासुदेव बळवंत

सत्तावन नंतर १८८४ पर्यंत अिंग्रजी राज्याविरुद्ध झालेल्या उल्लेखनीय अशा ह्या दोन सशस्त्र क्रांतिकारक अुठावांत स्वरूपतः कांहीं विभेद होता.

चुकून ठोकर लागून अुडालेला बाँब नि नेम धरून मारलेल्या बाँबचा स्फोट ह्यांत जो विभेद असतो तोंच त्यांच्यांत होता. अिंग्रजांचा त्यांतल्या त्यांत ज्या वर्गावर विश्वास, त्या अिंग्रजीशिक्षित नि सरकारी सेवक वर्गांतूनच स्वतः वासुदेव बळवंत नि त्यांचे अनेक क्रांतिकारक अनुयायी पुढें आले. 'अिंग्रजांचें राज्य अुलथून पाडून मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठीं आणि त्या स्वतंत्र हिंदुस्थानांत प्रजासत्ताक राज्य स्थापण्यासाठीं आम्हीं शस्त्र अुपसीत आहोंत' अशा त्यावेळच्या राजकारणांतील हिंदी पुढाऱ्यांना असभ्य, अभद्र नि अवाच्य वाटणाऱ्या पण अिंग्रजांना मात्र सर्पदंशाप्रमाणें मर्मीं झोंबणाऱ्या विषारी भाषेंतच प्रकट घोषणा करून वासुदेव बळवंतांचा क्रांतिकारक अुठाव झालेला होता. त्यांतहि परिस्थितीचा विशेष असा कीं पंजाबांत कूका क्रांतिकारकांना तत्रस्थ जनतेचा पाठिंबा न मिळाल्यामुळें तेरी भी चूप मेरी भी चूप ह्या न्यायें अिंग्रज त्या अुठावणीला अनुल्लेखानें हेटाळूं शकला. तिची सशस्त्र क्रांतीची परंपरा पंजाबांत सुद्धां मूळ धरूं शकली नाहीं. पण महाराष्ट्रांत मात्र रामोशी, शेतकरी, धनगरांपासून तों स्वतःला ब्रिटिशनिष्ठ म्हणविणाऱ्यांमधील मोठमोठ्या नि धनाढ्य पुढाऱ्यांपर्यंत ज्यानें त्यानें वासुदेव बळवंतांना आप-आपल्यापरी अेखाद्या देशवीरासारखें अुचलून धरलें. अशा विविध निमित्तां-मुळें साऱ्या हिंदुस्थानभरच नव्हे तर अिंग्लंडमध्येंहि या सशस्त्र अुठावाचा अितका गाजावाजा झाला. सशस्त्र क्रांतीची परंपरा महाराष्ट्रांत मूळ धरून राहिली.

प्रकरण नववें

# वासुदेव बळवंतांच्या सशस्त्र अुठावाची अिंग्रजी सत्ताधिकाऱ्यांवर झालेली प्रतिक्रिया

हिंदुस्थानचा राज्यकारभार ज्या नागर नि सैनिक (Civil and Military) विभागांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे सोंपविलेला असे, त्यांच्यांतील सोटेशाही दंडनैतिक पक्षहि या क्रांतिकारी अुठावामुळें मनांत चांगलाच चरकल्यावांचून राहिला नाहीं. 'सब ठीक है' अशी त्यांची नेहमींची धटिंगण ललकारी देण्याची त्या पक्षाला आतां सोयच अुरली नव्हती. राज्ययंत्राला कांहीं तरी धोका अुत्पन्न झाला आहे हें त्याला मानावें लागलें. त्यामुळें अिंग्रजी कूटनैतिकांच जो दुसरा पक्ष पूर्वीपासून वरील सोटेशाही पक्षास 'संभाळून! संभाळून चला! नाहींतर सत्तावनसारखी दुसरी जीवावरची टोकर खाल!' असें बजावीत असे त्याला स्वतःच्या दूरदर्शित्वाची प्रौढी मिरवण्यास आणि यापुढें तरी हिंदुस्थानचा कारभार आमच्या कूटनीतीच्या आधारें चालला पाहिजे असा आग्रह धरण्यास वासुदेव बळवंतांच्या सशस्त्र अुठावणीमुळें नवी संधि मिळाली. महाराष्ट्रांत तरी ज्याला ते ब्रिटिशनिष्ठ वर्ग समजत त्या अिंग्रजीशिक्षितांतच 'ब्रिटिशद्रोह' रळावत चालला आहे हें ह्या सशस्त्र अुठावानें अुघडकीस आल्यामुळें हे अिंग्रजी कूटनीतिज्ञ अगदीं कावरेबावरे होअून गेले आणि ती ब्रिटिशद्रोहाची साथ अितर प्रांतांतील अजून सुखरूप असलेल्या ब्रिटिशनिष्ठ अिंग्रजीशिक्षित वर्गांत पसरूं नये यास्तव त्यांनीं तत्काल सामदामभेदांचें मायाजाळ पसरण्यास आरंभिलें. ह्या पक्षाच्या ॲंग्लोअिंडियन धुरीणांतले अेक धुरीण जे अे. ओ. ह्यूम त्यांच्या या वेळच्या मनोमन विचारांचें सार त्यांचें जें चरित्र मि. वेडरबर्न ह्या त्याच पक्षाच्या अेका पुढाऱ्यानें लिहिलें आहे, त्यांत असें दिलें आहे :—

"Looking over India during the period with the help of information at his (Hume's) disposal (he had served as Chief Secretary to the Viceroy) Hume became convinced that concerted action by responsible friends of India was necessary to counteract the dangerous currents of opinions and to turn the gathering political consciousness of educated Indians into pacific and fruitful channels. When Lyton left (1880 A.D.) the country after a term during which famine, frontier wars and administrative vagaries had combined to produce a mass of ugly feelings, the outlook was exceedingly disquieting..

"Hume realised that the existing Government administered by foreign officials on autocratic lines was dangerously out of tune with the people. There was a great gulf between the foreign beaurocracy self centered on the heights of Simla and the millions living on the plain below. And about the year 1878-79 economic combined with political troubles were actively at work throughout India....While in schools and colleges the leaven of Western education was working among the intellectuals teaching lessons of political History and how it was only through storm and stress that the British people had won for themselves the blessings of Freedom.

"Hume knew there was imminent risk of a popular out-break of which Indian leaders were blissfully ignorant. The new wine was fermenting in old bottles and that any time the bottles might burst.

"There existed no recognized channel of communication between the rulers and the ruled the absence of which found the Government unprepared to meet the emergency in 1857."

ह्या अुताऱ्याचें भाषांतर देण्याचें कारण नाहीं. ह्या अिंग्रजी कूटनीतिज्ञांच्या विचारांविषयीं मागें जें आम्हीं लिहिलें आहे तेंच यांत सांगितलें आहे. पण त्याला त्यांच्याच शब्दांचा आधार असावा अेवढ्यासाठीं काय ते वरील अुतारे घेतले. त्यामध्यें वासुदेव बळवंतांच्या १८७८-७९ सनांतील सशस्त्र अुठावाचा

नि सत्तांतराचा स्पष्ट अुल्लेख आहे. अिंग्रजी सत्तेला खरी भीति अशा सशस्त्र क्रांतिकारक अुठावांचीच आहे. यास्तव तशा साधनांकडे हिंदी लोकांचें लक्ष जाअू नये म्हणून त्यांची दिशाभूल करण्यासाटीं काय प्रलोभनें योजावीं याची अिंग्रजी सत्ताधिकाऱ्यांना नि कूटनीतिज्ञांना लागलेली चिंता ह्या अुताऱ्यांच्या आड कशी दडलेली आहे तें ओळींच्या मधून वाचतांच ध्यानीं येअील. ह्याविषयीं अिंग्रजी गोटांत भवति न भवति होअून शेवटीं तांतडीचें नि अंतःस्थ धोरण असें ठरलें कीं :—

अिंग्रजी शिक्षितांचा नि सरकारी सेवकांचा जो ब्रिटिशनिष्ठ असा अेक प्रभावी, संपन्न नि मुखर (Vocal) वर्ग हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत पसरलेला आहे त्याला संघटित करण्यासाटीं त्याची अेक अखिलभारतीय अशी संस्था काढावी.

ह्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी संस्थेचे हस्तेंच जनतेंतील क्रांतिनिष्ठ प्रवृत्तींचीं जुनीं पाळेंमुळें सहजपणें खणून काढतां येतील आणि नवीं रुजणें अशक्य करून टाकतां येअील अशी निश्चिति ह्या अिंग्रजी कूटनैतिकांना वाटत होती. त्याप्रमाणें ह्या पक्षाचे पुढारी जे ह्यूमसाहेब त्यांनीं सरकारी सेवेंतून सन १८८२ सनांत निवृत्त होतांच तें कार्य हातीं घेतलें.

प्रथमतः त्यांनीं प्रांतोप्रांतींच्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी पुढाऱ्यांशीं अंतरींचें अिंगित कळूं न देतां विचारविनिमय केला. त्यावेळीं स्थापन झालेल्या वा होत असलेल्या प्रांतोप्रांतींच्या हिंदी राजकीय संस्थांचा कानोसा घेतला.

अशा राजकीय संस्थांमध्यें काळानेंच नव्हे तर कर्तृत्वानेंहि अग्राधिकार पावलेली संस्था होती पुण्याची 'सार्वजनिक सभा'. रावसाहेब रानडे प्रभृति आंग्लशिक्षित थोर पुढाऱ्यांनीं सन १८७० मध्यें ती राजकीय संस्था स्थापिली. लोक ज्यांना प्रेमादरानें 'सार्वजनिक काका' असें म्हणत त्या गणेश वासुदेव जोशी ह्यांच्यासारख्या कष्टाळू देशभक्तानें तिच्या कार्यास वाहून घेतलें होतें. फार काय, वासुदेव बळवंत फडकेहि त्यांच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे 'नुसत्या भाषणबाजीचा वीट येअीतोंपर्यंत' कांहीं दिवस तिच्यांत काम करीत असत. ती संस्था बोलून चालून नैर्बंधिक (कायदेशीर) कक्षेंतच काम करणारी असतांहि त्या काळच्या कोणत्याहि प्रकट राजकीय संस्थेला सुचला नसला किंवा झेपला नसता असा अेक पुरोगामी ठराव सन १८७४ मध्येंच तिनें केला होता कीं हिंदुस्थानचे प्रतिनिधी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें घेण्यांत यावे आणि त्यांच्या

विचारानें हिंदी राज्यकारभार चालावा ! ह्या सार्वजनिक सभेच्या अनुकरणानें मुंबअीसहि फिरोजशहा मेथा, तेलंग, तय्यबजी प्रभृति तत्कालीन पुढाऱ्यांनीं 'बाम्बे प्रेसिडेन्सी असोशिएशन' ही संस्था स्थापून प्रगत राजकीय चळवळ चालू केली. तिलाहि रानडे यांचा हातभार लागलाच होता. मद्रासमध्यें त्याच प्रकारची 'महाजन सभा' सन १८८१ मध्यें नि बंगालमध्यें सुरेंद्रनाथ बानर्जींच्या नेतृत्वाखालीं 'बंगाल न्याशनल लीग' ह्या प्रगामी राजकीय संस्था निघाल्या होत्या. ह्या संस्था प्रथम प्रांतिक होत्या तरीहि आज ना अुद्यां त्यांच्या सहकार्यांतून अेक अखिलभारतीय राजकीय संस्था निघणार हें क्रमप्राप्तच होतें. पुण्यास नि मुंबअीस तशी भारतीय संस्था काढण्याचीं बोलणीं चालू होतीं. सुरेंद्रनाथांनीं तर सन १८८३ मध्यें 'Indian National Association' नांवाची भारतीय संस्था काढून तिच्या शाखा हिंदुस्थानभर काढण्यासाठीं पंजाबकडे अेक प्रचारकी दौराहि केला होता. पण पुढें कांग्रेस स्थापन झाल्यानंतर ही संस्था तींतच विलीन करण्यांत आली.

परंतु केवळ हिंदी पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं अशी संस्था निघावी हें अिंग्रजी कूटनीतिज्ञांना रुचणारें नव्हतें. तें श्रेय त्यांना स्वतःकडे घ्यावयाचें होतें. आणि दुसरें असें कीं कितीहि ब्रिटिशनिष्ठ असले तरी सुरेंद्रनाथादिक पुढारी हे हिंदी होते. सर्वस्वीं त्यांच्या हातीं असलेल्या संस्थेपेक्षां आपल्या गोऱ्या आंग्लो-अिंडियन अधिकाऱ्यांच्या हाताखालीं असलेल्या संस्थेवर ब्रिटिश राज्याचें स्थैर्य राखण्याची कामगिरी अधिक बिनधोकपणें सोंपविणें अिंग्रजांच्या दृष्टीनें अवश्य होतें. यासाठीं सन १८८४ ह्यूमध्येंच मसाहेबांनीं आपल्या भोंवतीं जे पटकन जमू शकले त्या सहकाऱ्यांसह वरील धोरणास धरून असलेली अशी एक अखिल-भारतीय राजकीय संस्था स्थापिल्याची द्वाही लगोलग चहूंकडे फिरवूनहि टाकली. तिचें नांव ठेविलें 'The Indian National Union'. तिची ठरली जाणारी मूल प्रतिज्ञा होती 'Unswerving Loyaly to the British Crown' ब्रिटिश राजमुकुटाशीं अव्यभिचारी निष्ठा !

ह्या संस्थेचें प्रभुत्व सरकारी ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं आपल्या हातीं ठेवावें ह्याविषयीं हिंदी पुढाऱ्यांचा विरोध झाला कीं काय? मुळींच नाहीं. तशा योजनेस जो कांहीं विरोध झाला तो ब्रिटिश व्हाअिसरायचा ! तें आश्चर्यकारक वृत्त पुढें येणारच आहे.

अिंग्रजी सरकारच्या मोठमोठ्या अधिकारपदांवरून हिंदुस्थानावर कालपर्यंत सत्ता गाजविणाऱ्या ह्या ह्यूमप्रभृति ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं निवृत्त होतांक्षणींच हिंदी प्रजेचा पक्ष घेऊन लोककल्याणार्थ आपल्यांत येअून मिसळावें आणि हिंदी लोकांचें पुढारीपण स्वीकारण्याची कृपा करावी याविषयीं आंग्लशिक्षित हिंदी लोकांतील ब्रिटिशनिष्ठ देशभक्तांनीं जिकडून तिकडून या आंग्लोअिंडियन मंडळीवर, ह्या नव्या 'हिंदी प्रजेच्या मित्रां'वर, अभिनंदनाचा पाऊस पाडला. त्या संस्थेच्या घटनेंत 'ब्रिटिश राजमुकुटाशीं अव्यभिचारी निष्ठे'ची अट घालण्याची जी ह्यूम साहेबांची योजना होती ती तर ह्या हिंदी पुढाऱ्यांच्या स्वतःच्या निष्ठेचाच अेक पुनरुच्चार होता. ह्यूमनें ती अट घातली नसती तर ह्या हिंदी देशभक्तांनीं आपण होअून ती घालून घेतली असती. ती अट नसून आवड होती.

मध्यंतरीं ह्यूमसाहेबांनीं आपली ही योजना नि आम्हीं मागें चिकित्सलेला तिच्यांतील अंतरगत हेतु ह्याविषयीं सरकारच्या मंत्रिमंडळांतील उच्चपदस्थ अिंग्रजी अधिकाऱ्यांशीं नि त्यावेळचे व्हाअिसराय लार्ड डफरिन ह्यांच्याशीं अंतःस्थपणें विचारविनिमय केला. प्रथमतः ही अखिलभारतीय संस्था जी काढावयाची ती सर्वस्वीं राजकीय स्वरूपाची न काढतां समाजीय स्वरूपाची काढावी कीं काय याचा खल ह्या अिंग्रजी कूटनीतिज्ञांत चालू होता. परंतु लार्ड डफरिन ह्यांनीं स्वतः आग्रह धरला कीं हीं संस्था राजकीय स्वरूपाचीच हवी. त्याचप्रमाणें हेंहि निश्चितपणें ठरलें कीं प्रयोगार्थ म्हणून ह्यूमसाहेबांनीं तांतडीनें काढलेली वरील 'अिंडियन न्याशनल युनियन' ही संस्था विसर्जून त्याच धोरणाचे पायावर पण शक्य तितक्या मोठ्या संख्येनें हिंदी पुढाऱ्यांना समावेशून, रीतसरपणें त्यांची संमति घेअून अखिलभारतीय स्वरूपाची अेक नवी संस्था काढावी आणि तिचें नांव ठेवावें 'अिंडियन न्याशनल कांग्रेस !'

तथापि व्हाअिसरायांच्या प्रेरणेनें ही जन्मू घातलेली 'कांग्रेस' संस्थाहि पुढें मागें ब्रिटिश नेतृत्वाच्या पंज्यांतून सुटण्याचा संभव शक्यतों असंभवनीय करावा ह्यासाठीं ह्यूमनें सुचविलें कीं ह्या नव्या संस्थेच्या अधिवेशनाचें अध्यक्षपद प्रतिवर्षीं त्या त्या प्रांतांच्या गव्हर्नरांकडेच देण्याचा नित्याचा प्रघात पाडावा. पण लार्ड डफरिननें त्या योजनेस संमतिण्याचें नाकारलें. कारण कीं लार्ड डफरिननें ज्या हेतूनें ह्या नव्या संस्थेच्या योजनेस प्रेरणा दिली होती तो हेतु

तिला अशी प्रत्यक्षतःच सरकारी संस्था करण्यानें साधणारा नव्हता. जर गव्हर्नर प्रभृति सरकारी अधिकारी तिचे अध्यक्ष होते तर सामान्य लोकांना ती संस्था अिंग्रजी सत्तेची हस्तक आहे असें अुघड अुघड दिसतें. आणि तिचा प्रभाव हिंदी लोकांवर अन्यथा पडता तसा कधींहि पडता ना. पण तिला लोकांच्या देशभक्त म्हणून गाजलेल्या पुढाऱ्यांचेंच नेतृत्व असलें आणि तरीहि तिनें ब्रिटिश राज्य हिंदुस्थानच्या कल्याणास्तवच चिरायु व्हावें अित्यादि प्रकारचीं ब्रिटिशांचीं स्तुतिस्तोत्रें गाअिलीं तर तीं हिंदी जनतेंतील अनेक लोकांना पटण्याचा अधिक संभव होता. दुसरा महत्त्वाचा लाभ होता तो हा कीं हिंदी लोकांनीं गायलेलीं हीं ब्रिटिश 'स्तोत्रें' युरोप-अमेरिकेंतील लोकांपुढें नि राष्ट्रांपुढें गावरून ब्रिटिशांना उजळ माथ्यानें आपल्या साम्राज्याचें समर्थन जगभर करतां येतें. कसें तें पुढें दाखवूं.

प्रांतोप्रांतींच्या झाडून साऱ्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी पुढाऱ्यांनीं, मोठमोठ्या सेवानिवृत्त हिंदी नि ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं, राजकीय संस्थांनीं, देशांतील प्रमुख प्रमुख विधिज्ञ, डॉक्टर, संपादक, वित्ताधीश, विद्याधीशांनीं या नव्या संस्थेस मिळण्याचीं वचनें दिलीं. तिचें पहिलें अधिवेशन रानडे, तेलंग, फिरोजशाह प्रभृति मुंबअीच्या मान्यवर पुढाऱ्यांनीं मुंबअीस भरविण्याचा भार शिरावर घेतला. त्याचें अध्यक्षपद कोणास द्यावें? कोणाहि शासकीय अधिकाऱ्यास तें देअूं नये म्हणून लार्ड डफरिननें ह्यूमसाहेबांना तर स्पष्टच सांगितलें होतें. म्हणून ह्यूमनें आपण मागें राहून हिंदी पुढाऱ्यांना पुढें घातलें आणि त्या हिंदी पुढाऱ्यांनीं लार्ड डफरिनला आग्रहपूर्वक विनविलें कीं ह्या नव्या भारतीय संस्थेच्या पहिल्या अधिवेशनास तरी अध्यक्ष म्हणून आम्ही लार्ड रे (मुंबअीचे भूतपूर्व गव्हर्नर) ह्यांनाच निवडणार आहों. तरी आपली अनुज्ञा असावी. पण लार्ड डफरिननें पुन्हां स्पष्टपणें नकार देऊन कळविलें कीं, "आपल्या सदिच्छेचें गमक म्हणून या विनंतीस सरकार जरी स्वागतीत असलें तरीहि जन्मूं घातलेल्या ह्या कांग्रेसचें अध्यक्षपद कोणा हिंदी गृहस्थानेंच स्वीकारणें अुचित होअील असें सरकारास वाटतें!!" तें तसें त्या सरकारला कां वाटतें त्या गुपिताविषयीं मात्र डफरिननें चकार शब्द अुच्चारला नाहीं हें सांगणें नकोच. पण त्या हिंदी भाबड्या प्रजेला मात्र त्यांच्यावर त्यांच्या ब्रिटिश राजकर्त्यांनीं टाकलेला हा विश्वास म्हणजे 'ब्रिटिशांच्या अंगीं मुरलेल्या

लोकसत्ताक परंपरेचें '—Democratic tradition चेंच—प्रत्यंतर होय असें वाटून मोठा संतोष झाला. हिंदी पुढारी म्हणत होते आमच्या हिंदी कांग्रेसला परकें ब्रिटिश नेतृत्वच हवें. ब्रिटिश व्हाअिसराय अुत्तरत होते, 'कशाला–कशाला! हिंदी नेतृत्वच हिंदी कांग्रेसला शोभतें!' असा ह्यूम-प्रभृतींच्या कूट नीतीचा खेळ रंगत चालला!

येथपर्यंत आम्हीं सन १८६० ते सन १८८४ पर्यंतच्या कालखंडांत भिन्न-भिन्न प्रांतांमध्यें मुख्यतः राजकीय स्थित्यंतर कसें होत गेलें त्याचें ह्या ग्रंथाची पृष्ठभूमि म्हणून जितकें अवश्य तितकें समालोचन केलें.

आतां वर प्रस्ताविलेल्या 'अिंडियन न्याशनल कांग्रेसच्या' प्रतिष्ठापने-पासून तों सन १८९५ च्या अंतापर्यंतच्या कालखंडांतील राजकीय परिस्थितीचें समालोचन करूं.

## प्रकरण दहावें

# अखिलभारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना

(सन १८८५)

वर दिल्याप्रमाणें अिंग्रजी कूटनीतिज्ञांच्या योजनेनुरूप रंगभूमीची सारी सजावट पूर्ण होतांच सन १८८५ मध्यें 'अिंडियन न्याशनल कांग्रेस'चें पहिलें अधिवेशन मुंबअी येथें भरलें. अध्यक्षस्थानीं बंगालचे व्योमेशचंद्र बानर्जी यांची योजना झाली होती. प्रारंभींच भारताची सम्राज्ञी राणी व्हिक्टोरिया यांच्याविषयींची असीम नि अव्यभिचारी राजनिष्ठा प्रतिज्ञापूर्वक प्रदर्शविण्यांत आली. 'We pledge our unstinted and unswerving Loyalty to Her Majesty the Queen Victoria, The Empress of India!' ह्या पहिल्या अधिवेशनापासून तों पुढें अनेक वर्षेपर्यंत हा राजनिष्ठेचा श्रीगणेशायनमः म्हटल्यावांचून कांग्रेसची पोथी पुढें वाचतांच येत नसे. जसा आरंभ तसाच ह्या पहिल्या अधिवेशनाचा अंतहि राजनिष्ठेच्याच नव्हे तर ह्यूमसाहेबांच्याहि जयजयकारांत झाला. "अशा अखिलभारतीय महासभेला जन्म देण्यांत नि त्यांतहि पूर्वी सरकारचा अेक अुच्चपदस्थ अधिकारी असतांहि तिचें पुढारीपण स्वतः स्वीकारण्यांत ह्यूमसाहेबांनीं जें धाडस नि न्यायप्रियता दाखविली आणि हिंदी लोकांवर जे अुपकार केले त्या विषयींची कृतज्ञता व्यक्तविण्यासाटीं" त्या मंडपांत जमलेल्या हिंदी प्रतिनिधींनीं नि प्रेक्षकांनीं ह्यूमच्या जयजयकारांनीं (Three cheers for Hume नीं) तेथील टीचभर आकाश दुमदुमवून सोडलें. पण ह्यूमसाहेब लगोलग अुभे राहून आज्ञापिते झाले, 'हं, आतां शेवटीं तीनदांच नव्हे तर तीनदांच्या तिप्पटदां नि शक्य तर त्याच्याहि तिप्पटदां (Three times three and if possible three times that) होअूं द्यात हिंदसम्राज्ञी व्हिक्टोरियांचे जयजयकार!!' तसे ते झालेहि. पुढें कित्येक वर्षेपर्यंत प्रत्येक कांग्रेस अधिवेशनाच्या शेवटीं

हा हिंदसम्राज्ञीचा वा सम्राटाचा जयजयकार प्रतिनिधि प्रेक्षकांचा कंठ कोरडा पडेतों तसाच दुमदुमत राही !

केव्हां केव्हां अशा जयजयकारांनीं कांग्रेसमधील ह्या राजनिष्ठ देशभक्तांना होणाऱ्या कंठशोषाचें अुपशमार्थ कोणी कनवाळू व्हाअिसराय वा गव्हर्नर त्यांना थंडगार पेयेंहि पाजी. कांग्रेसचें दुसरें अधिवेशन कलकत्त्यास भरलें असतां स्वतः व्हाअिसरायनें, लार्ड डफरिननें, कांग्रेसच्या सर्व प्रतिनिधींना सन्मान्य पाहुणे म्हणून आमंत्रून अेक थाटाचा अुद्यानोपहार दिला होता. त्यानंतर भरलेल्या मद्रास येथील अधिवेशनाचे प्रसंगीं मद्रासच्या अिंग्रजी गव्हर्नरनेंहि कॉंग्रेस प्रतिनिधींना असाच अेक अुद्यानोपहार देअून स्वागतिलें होतें.

ह्यूमसाहेब कांग्रेसचे अधिकार्यवाह (जनरल सेक्रेटरी) नेमले गेले. हिंदुस्थानावर मोठमोठ्या अधिकारपदांवरून ज्यांनीं ब्रिटिशसत्ता गाजविली होती नि नंतर जे सेवानिवृत्त झाले होते त्या ह्यूम, वेडरबर्न साहेबांसारख्या आंग्लोअिंडियनांना शक्य तेव्हां तेव्हां कांग्रेसचें अध्यक्षपदहि देण्यांत येअी. हिंदुस्थानच्या तिजोरींतून नुसते लक्षावधि रुपये नुसत्या भृतिवारी (पेन्शनवारी) गिळंकृत करणाऱ्या ह्या आंग्लो-अिंडियन वर्गांतील हे वरील अध्यक्ष कांग्रेसच्या वाक्पीठावरून भाषणें देतां देतां जेव्हां हिंदुस्थानांतील दीन, दरिद्री नि दुष्काळग्रस्त जनतेच्या करुणेनें कासावीस होत तेव्हां अभिनय करावा तर असा असें म्हणत कसलेल्या नटांनीं सुद्धां तोंडांत बोटें घातलीं असतीं.

हळूहळू कांग्रेसहि कांहीं मागण्या करूं लागली. हिंदी लोकांना सरकारी सेवा-विभागांतील अुच्च अधिकारीपदांवर अधिक प्रमाणांत नेमलें जावें, कांहीं कर उणे करावे, सरकारी समादेशक मंडळांत (सल्लागार कमिट्यांत) थोड्या प्रमाणांत कां होअीना पण हिंदी गृहस्थ नेमले जावे, हळूहळू विधिमंडळाचा अगदीं मर्यादित प्रमाणांत कां होअीना पण अुपक्रम व्हावा, त्यामध्यें दोनचार प्रतिनिधि कां होअीनात पण निवडून धाडण्याचा अधिकार जनतेंतील उच्च थरांना तरी मिळावा अशा अगदीं सेवाभावाच्या त्या मागण्या असत. अशा मागण्या कांग्रेसनें मागाव्या नि त्यांतीलहि अगदीं निरुपद्रवी त्या मोठ्या गाजावाजानें ब्रिटिश शासनानें पुरवाव्या हेंच ब्रिटिश कूटनीतिज्ञांचें धोरण होतें हें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें ह्या मागण्यांस पाठिंबा देतांना हिंदी पुढारी सरकारवर जी थोडीफार टीका करीत तिच्यापेक्षांहि कडक भाषेंत ह्या

ह्यूम, वेडर्बर्न प्रभृति 'हिंदुस्थानच्या हितचिंतकांनीं' हिंदुस्थानसरकारवर टीका करावी. ती अैकून त्या आमच्या भोळ्याभाबड्या ब्रिटिशनिष्ठ पिढीला वाटावें कीं ह्या आमच्या अुदारधी आंग्लो-अिंडियन पुढाऱ्यांनीं केवळ हिंदुस्थानचे हितार्थच ही कांग्रेस काढली ह्यांत कांहींच शंका नाही. बिचारे आमच्यासाठीं त्यांच्या स्वतःच्या अिंग्रजी देशबांधवांशीं नि त्यांच्याच अिंग्रजी शासनाशींहि किती कडकपणें भांडताहेत!

पण कांग्रेस कां काढली त्याचें गुपितहि सांगण्याचे अनिवार्य प्रसंग ह्या अिंग्रज कूटनीतिज्ञ पक्षीयांवर केव्हां केव्हां येतच होते. अेकदोन अुदाहरणेंच देअूं. कांग्रेसमधून भीत भीत होणारी सरकारवरची हिंदी पुढाऱ्यांची टीका नि त्यांच्या अगदीं क्षुल्लक मागण्याहि ज्यांना अिंग्रजी सत्तेची अप्रतिष्ठा करणाऱ्या वाटत असाहि अेक अिंग्रजी तिस्मारखांचा सोटेशाही पक्ष असे. त्याचे अेक पुढारी सर आक्लंड ह्यांनीं, कांग्रेससारखी खोडसाळ संस्था काढून ब्रिटिश सरकारचा हिंदी लोकांवरील दबदबा नाहींसा करण्याचें नि हिंदी लोकांत असंतोषाचें बीं रुजविण्याचें ब्रिटिशहितघातक कृत्य केल्याविषयीं ह्यूमप्रभृतींवर सडकून टीका केली. तेव्हां ह्यूमसाहेबांनीं खालील अुत्तर दिलें असें वेडर्बर्न ह्यूमच्या चरित्रांत लिहितात :

"There was no cause for fearing political danger from the Congress....It is the British Government which has let loose forces which unless wisely guided and controlled must sooner or later involve consequences which are too dangerous to contemplate. And it is to limit and control them and direct them when there is yet time to do so....that this Congress movement was designed."

या छद्मी वाक्यांचा सरळ अर्थ अेवढाच कीं हिंदुस्थानांत जी सशस्त्र क्रांतीची प्रवृत्ति वाढूं लागली होती तिला जर हा कांग्रेसचा, ब्रिटिशनिष्ठेचा, पायबंद वेळींच घातला नसता तर सत्तावनच्या सशस्त्र युद्धासारखें अेखादें भयंकर संकट अिंग्रजी राज्यावर पुन्हां कोसळतें. तशा सशस्त्र क्रांतिवादापासून हिंदी लोकांना परावृत्त करावें म्हणून तर हें कांग्रेसचें मायाजाल पसरावें लागलें. त्या कांग्रेसपासून ब्रिटिश साम्राज्याला कसली भीति असणार! अुलट ह्यूम म्हणतात कीं 'It is necessary for the safety of the state.' ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत सुरक्षित राखण्यासाठींच तिची आवश्यकता आहे!

## अिंग्लिशांना खरी भीति सशस्त्र क्रांतिकारकांची वाटे! कांग्रेसची नव्हे !

हेंच विधेय ब्रिटिश लोकांच्या मनावर ठसविण्यासाठीं ह्या 'हिंदुस्थानच्या हितचिंतकांच्या' कोटिक्रमांत त्या काळीं अेक अर्थपूर्ण अुपमाहि रुळलेली असे. सारा आडपडदा दूर करून जेव्हां त्यांच्या हेतूचें खरें स्वरूप त्यांना अुघडें करून सांगावेंच लागे तेव्हां ते चक्क म्हणत, 'अहो बाष्पयंत्रांत वाफ जर सारखी कोंडीतच राहिलांत तर केव्हां ना केव्हां तरी तिचा स्फोट होअून त्या यंत्राचे तुकडे अुडाल्यावांचून रहातील का? तसें होअूं नये म्हणून आपण अतिरेकी वाफेला बेतारातानें बाहेर सोडण्यासाठीं बाष्पयंत्राला अेक सुरक्षाछिद्र, अेक safety valve ठेवीत असतों नाहीं का? ब्रिटिश राज्ययंत्राची गोष्ट तशीच आहे. परकीय राज्यकर्त्याविरुद्ध वाढणाऱ्या असंतोषाचा जर दडपशाहीनें सारखा कोंडमारा करीत राहिलांत तर त्याच्या क्रांतिकारक स्फोटासरशीं त्या राज्ययंत्राचे तुकडे केव्हां अुडतील याचा नेम नसतो. तसें न व्हावें म्हणून त्या असंतोषाला वाचा फोडली पाहिजे. बेतावेतानें, बोलून बोलून, त्या असंतोषाला ओसरून जाण्यासाठीं अेक सांडवाट, अेक बाष्पछिद्र ठेवलें पाहिजे. तें सुरक्षा-छिद्र, तें safety valve म्हणजेच आम्हीं काढलेली ही 'अिंडियन न्याशनल कांग्रेस' होय!'

अेकीकडे हिंदी लोकांना सांगायचें कीं हिंदी लोकांच्या हितास्तवच काय तीं आम्हीं कांग्रेस काढली आहे. आणि दुसरीकडे ब्रिटिश लोकांना सांगायचें कीं हिंदुस्थानविषयीं ब्रिटिशांची राजसत्ता अबाधितपणें चिरकाल टिकावी याच मुख्य हेतूनें आम्हीं कांग्रेस काढली आहे. असा हा ह्यूमप्रभृति लोकांचा दुतोंडीपणा पहातांच कांग्रेसमधील हिंदी देशभक्त चिडून गेले कीं काय? छे छे! त्या विसंगतींत त्यांना झोंबण्यासारखें नव्हतेंच मुळीं कांहीं. ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानावर अकुंठपणें चिरकाल नांदावें कारण त्यांतच हिंदुस्थानचें कोटकल्याण झालें आहे, होत आहे, होणार आहे ही त्या कांग्रेसी हिंदी देशभक्तांची स्वतःचीच निष्ठा होती. अर्थात् ब्रिटिशसत्ता बळकट करणें नि हिंदुस्थानचें कल्याण करणें ह्या अेकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या, अेकाच अर्थाचीं दोन वाक्यें होतीं. तेव्हां ह्यूमनें ब्रिटिश सत्तेच्या बळकटी-साठीं कांग्रेस काढली असें म्हटलें तरी ती हिंदी लोकांच्या हितार्थ काढली

असेंच म्हटल्यासारखें होतें. आणि हिंदी लोकांच्या हितार्थ काढली असें म्हटलें तरी ब्रिटिशसत्तेच्या बळकटीसाठीं काढली असेंच म्हणण्यासारखें होतें. अशा भोंगळसुती वृत्तीच्या त्या कांग्रेसमधील ब्रिटिशनिष्ट हिंदी देशभक्तांना ह्यूम-प्रभृति ब्रिटिश पुढाऱ्यांच्या दुतोंडी वक्तव्यांतील हा परस्पर विरोध झोंबत तर नसेच पण अुलट तो विरोध हा विरोधाभास अलंकाराचें अेक अुत्कृष्ट अुदाहरणच आहेसें वाटे.

पण ह्यूम मात्र आपल्या ह्या अंध भक्तांच्या सुद्धां कधीं आहारीं जात नसे. कांग्रेसमधल्या ठरावांतून ब्रिटिश हिताविरुद्ध चुकून सुद्धां त्यांच्यापैकीं कोणी ब्र जरी काढला तरी ह्यूमप्रभृतींनीं त्याला पायबंद घातलाच म्हणून समजावें. कांग्रेसच्या तिसऱ्या-चवथ्या अधिवेशनांतच—बहुधा मद्रासच्या हिंदी प्रतिनिधींनीं आग्रह धरला कीं हिंदुस्थानला ज्या निर्बंधान्वयें निःशस्त्र करण्यांत आलें होतें तो शस्त्रनिर्बंध (Arms Act) रहित करावा आणि आंग्लो-अिंडियनांप्रमाणेंच हिंदी लोकांनाहि शस्त्रें बाळगण्याची अनुज्ञा असावी. पण हा बेत पहातांच ह्यूमसाहेबांचें पित्त खवळून गेलें. त्या भरांत आपली नेहमींची "हिंदुस्थानच्या हितचिंतकाची" नाटकी भूमिका विसरून त्यांनीं कांग्रेसला खडखडीतपणें बजावलें कीं, "सत्तावनच्या काळ्याकुट्ट संकटाचा अनुभव ज्यांनीं घेतलेला आहे असा कोणताहि ब्रिटिश मनुष्य हिंदी लोकांच्या हातीं पुन्हां शस्त्रें देण्यास धजणार नाहीं, मान्य होणार नाहीं! कांग्रेसनें आपली मऱ्यादा संभाळून बोलावें. असले दायित्वशून्य ठराव आणण्याचा धोका पत्करूं नये!" ह्यूमनें मनांतून सत्तावनचा केवढा धसका खाल्ला होता तें तो रागाच्या भरांत असें चारजणांत बोलून गेला! त्याचे अितर सागेलागे आंग्लो-अिंडियन फणकारून म्हणाले, "ब्रिटनसारख्या परमशक्तिशाली राष्ट्रानें तुमच्या हिंदुस्थानचें सर्व शत्रूंपासून संरक्षण करण्याचें कंकण बांधलें असतां आणि अंतर्गत शांतता नि सुव्यवस्था राखण्याचें अभिवचन प्रत्यक्ष महाराणीच्या घोषणेंत, त्या हिंदी 'मार्ग्नाचार्टांत' दिलें असतां तुम्हांला शस्त्रें मुळीं हवींतच कशाला?" त्यांच्या या रागीट प्रश्नास समुचित अुत्तर देणारा अेखादा वासुदेव बळवंत हवा होता. पण ह्यूमच्या कांग्रेसमध्यें तसला असभ्य मनुष्य कुठला असणार. जो सभ्य तोच काय तो तिचा सभासद होणार. त्या सभ्य सभासदांतील बहुतेकांनीं 'हिंदुस्थानची हितचिंतक' अशी ही आंग्लोअिंडियन मंडळी रागावलेली पहातांच

त्यांच्या त्या 'तुम्हांला शस्त्रें मुळांत हवींतच कशाला?' या आरोपगर्भ प्रश्नामरशीं जीं गांगरलेलीं उत्तरें दिलीं त्यांचा सारांश एवढाच: 'शस्त्रें कशाला हवींत? अहो नुसतीं आपलीं वाघरांपासून गुरेंढोरें, रानडुकरांपासून शेतीभाती, चोरदरोडेखोरांपासून घरदार रक्षण्यासाठींच काय तीं! नाहींतर आम्हांला हीं काय करायचीं तीं शस्त्रें न् बिस्त्रें!' दोघातिघांनीं जीं टणक म्हणून अुत्तरें दिलीं तीं तरी किती लिबलिबीत! म्हणे 'महाराणीच्या घोषणेप्रमाणें ब्रिटिश-साम्राज्याचे आम्हीहि निष्ठावंत नागरिक आहोंत आणि शस्त्र बाळगणें हा निष्ठावंत नागरिकांचा अेक प्राथमिक अधिकार आहे!'

## हिंदी मार्गाचारटावरील भरमसाट भाष्यें

सत्तावनच्या क्रांतियुद्धानंतर काढलेल्या राणीच्या घोषणापत्रकांत अशीं कांहीं दोनचार आश्वासक वाक्यें होतीं कीं व्हिक्टोरिया महाराणीनें आतां हिंदुस्थानचा सारा राज्यकारभार अीस्ट अिंडिया कंपनीचें विसर्जन करून ज्या अर्थीं आपल्या हातीं घेतला आहे त्या अर्थीं ह्यापुढें तिच्या सर्व प्रजेला समसमानतेनें वागविलें जाअील, संरक्षिलें जाअील.

या वाक्यावर कांग्रेसमधील अिंग्रजी कूटनीतिज्ञांनीं आणि आमच्या ब्रिटिश-निष्ठ हिंदी देशभक्तांनीं केलेल्या अेकाहून अेक बरचढ भाष्यांनीं त्या काळचीं वृत्तपत्रें नि लिखाणें भरलेलीं आहेत. त्यांची तर्कप्रणाली संक्षेपतः अशी असे: ज्या अर्थीं ब्रिटन आणि हिंदुस्थान यांची महाराणी अेकच आहे त्याअर्थीं तिचें साम्राज्य हें आम्हां दोघांचें समायीक साम्राज्य आहे. तें समायीक साम्राज्य असल्यामुळें हिंदुस्थानवर परराज्य आहे असें मानणें वा समजणें हा मुळांतच अपसमज आहे. त्यांतहि महाराणीनें सत्तावननंतर काढलेल्या घोषणा-पत्रकांत हिंदुस्थानला दिलेल्या त्या ताम्रपटांत, तिच्या सर्व प्रजाजनांना समानतेनें वागविलें जाअील असें स्पष्ट अभिवचन दिलेलें आहे. अर्थात् नैर्बंधिक दृष्टीनें हिंदी प्रजाजनाला ब्रिटनचा मुख्य प्रधानसुद्धां होतां येअील—जसा ब्रिटिश प्रजाजन आमचा गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल होअूं शकतो. अतअेव आमचा प्रश्न हिंदुस्थानचें स्वराज्य किंवा स्वातंत्र्य मिळविण्याचा नाहीं—तें नैर्बंधिक दृष्ट्या आम्हांस मिळालेलेंच आहे!—तर सोडवावयाचा प्रश्न आहे तो अेवढाच कीं त्या निर्बंधाअन्वयें प्रत्यक्ष कार्यवाही व्हावी. महाराणीचे

...ालय, ठा...
अनुक्रम २९८४८ वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

हिंदुस्थानांत येणारे कांहीं अधिकारी खाष्ट असतात. जो अुपद्रव होतो तो त्यांच्यामुळें. त्यांचें कपटी वर्तन महाराणीच्या आणि तिच्या मंत्रिमंडळाच्या कानावर घालण्यासाठीं विलायतेंत शिष्टमंडळें धाडणें, हिंदी लोक स्वतःचें राज्य चालविण्यास अजून योग्य नसल्यामुळें त्यांची योग्यता वाढविणें, आपली राजनिष्टा अुत्कट नि अढळ ठेवणें आणि तिला कलंक लागेल असा सशस्त्र बंडाळीसारखा जघन्य राजद्रोही नि देशद्रोही अपराध देशांत कोणाकडूनहि घडल्यास त्याचें अधिकाऱ्यांकडून तत्काळ पारिपत्य करविणें हा नि अेवढाच आमचा मुख्य कार्यक्रम आहे. अेका वाक्यांत सांगायचें तर आमचा वाद हिंदुस्थानच्या आजच्या सेवकशाहीशीं—ब्युराक्रसीशीं—आहे; ब्रिटिश राजमुकुटाशीं नव्हे. सम्राज्ञीचे वा सम्राटाचे आम्ही हिंदुस्थानवासी लोक अत्यंत राजनिष्ठ प्रजाजन आहों!

कांग्रेसच्या त्या काळच्या अधिवेशनांतून अेकाहून अेक वक्ता त्या राणीच्या घोषणापत्रकाचें तें चिटोरें घेअून, हात अुंच अुभारून गर्जू लागे: हा पहा आमचा माग्नाचार्टा! तो देणारा कोणी अलबत्या गलबत्या नव्हे तर 'देवी स्त्री व्हिक्टोरिया सार्वभौमिनी'!!

पण तें 'माग्नाचार्टाचें' चिठोरें तरी लिहून देण्यास त्या ब्रिटिशांच्या महाराणीस कोणीं भाग पाडलें! कांग्रेसच्या या लाळघोटू लोचटपणानें? का त्या सत्तावनच्या सशस्त्रक्रांतियुद्धाच्या विकट रणानें? पण ह्या कार्यकारणाचा अुच्चारसुद्धां कोणी वक्ता करीना. बहुतेक हिंदी पुढाऱ्यांना त्यांतलें मर्मच कळत नसे, क्वचित् ती माहितीहि नसे. ज्यांना तें मर्म माहीत होतें ते कांग्रेसमधील ह्यूमप्रभृति आंग्लो-अिंडियन पुढारी त्या प्रकरणीं मेणधुणेपणानें मूग गिळून बसत.

## देशभक्त दादाभाअी नवरोजी यांची साक्ष

काग्रेसमधल्या त्यावेळच्या प्रामाणिक देशभक्तांचे दादाभाअी नवरोजी हे मुकुटमणि होते. आपल्या पारशी देशबंधूंना ही गोष्ट निःसंशयपणें भूषणावह आहे कीं त्यांच्या समाजांत त्या दोन पिढ्यांत हिंदुस्थानच्या हितासाठीं जन्मभर झटत राहणारे दादाभाअी नवरोजी, फेरोजशहा मेथा, वाच्छा यांच्या सारखे प्रामाणिक, कर्तृत्वशाली नि थोर थोर देशभक्त होअून गेले. आम्ही

वर जो हिंदुस्थानांतील त्यावेळच्या वातावरणाची नि विशेषतः कांग्रेसच्या ब्रिटिशनिष्ठ मनोवृत्तीची रूपरेखा अंकिली आहे तिची वास्तवता पटविण्यासाठीं ह्या दादाभाअी नवरोजींसारख्या थोर देशभक्ताचीच साक्ष काढली कीं पुरे. दादाभाअी त्यावेळीं 'राष्ट्रपितामह' ही त्यांना पुढें मिळणारी यथोचित पदवी पावलेले नव्हते. त्यांना ब्रिटिशनिष्ठेचीं कटुफळें चाखण्याअितकें वयोवृद्ध नि ज्ञानवृद्धहि अजून व्हावयाचें होतें; तथापि कांग्रेस निघाली तेव्हांपासूनच अेक लोकप्रिय पुढारी म्हणून ते हिंदुस्थानभर मान्यता पावले होते. पुढें सन १८९३ मध्यें लाहोर येथील कांग्रेसच्या अध्यक्षत्वाचा मानहि त्यांना मिळाला. त्या अध्यक्षपदावरून दिलेल्या वक्तृत्वपूर्ण भाषणांत देशभक्त दादाभाअी नवरोजी म्हणाले :—

"Our faith in the instinctive love of justice and fair play of the people of the United Kingdom is not misplaced. ...I for one have not the shadow of doubt in dealing with such justice-loving and fair-minded people as the British. We may rest fully assured that we shall not work in vain. It is this conviction which has supported me against the difficulties. I have never faltered in my faith in the British character and have always believed that the time will come when the sentiments of the British nation our Glorious Sovereign proclaimed to us in our Great Charter of the Proclamation of 1858 will be realized."

याचा भावार्थ असा कीं "ब्रिटिश लोकांच्या अुपजत न्यायबुद्धीवर नि सद्वर्तनावर आम्ही जी निष्ठा ठेवीत आहों ती अस्थानीं नाहीं. माझ्या पुरतें तरी मी सांगू शकतों कीं ब्रिटिशांसारख्या न्यायप्रिय नि सच्छील लोकांशीं वागण्यांत मला कसलीहि शंका वाटत नाहीं. अशा निष्ठेनें आपण जें कार्य करीत आहोंत तें कार्य विफल होणार नाहीं अशी निश्चिति बाळगा. ह्या निश्चितीनेंच सर्व अडचणींमध्यें मला आधार दिलेला आहे. ब्रिटिशांच्या शीलावरील माझा विश्वास कधींहि ढळला नाहीं. मला असा विश्वास सदोदित वाटत आला आहे कीं असा अेक दिवस अुजाडेल कीं ज्या दिवशीं १८५८ च्या घोषणापत्रांत, त्या आम्हांस दिल्या गेलेल्या महान् ताम्रपटांत, त्या आमच्या माग्नाचार्टांत, ब्रिटिश राष्ट्रानें आणि आमच्या कृपावंत सार्वभौमिनीनें अुद्घोषिलेल्या सद्भावना नि शुभेच्छा सफल झालेल्या आढळतील!" दादाभाअींसारख्या प्रौढप्रज्ञ नि

प्रमुख पुढाऱ्याच्या ह्या ब्रिटिशनिष्ठेची छाप त्याकाळीं हिंदुस्थानांतील विशी-तिशी अुलटत असलेल्या सहस्रावधि होतकरू देशसेवकांच्या मनावर अितकी बळकटपणें पडली कीं पुढें कांहीं वर्षांनीं स्वतः दादाभाअी त्या आशावादाला विटले पण त्या त्यांच्या शिष्यांच्या मनावरील ब्रिटिशनिष्ठेचें तें भ्रांतिपटल कांहीं केल्या नष्ट होअूं शकलें नाहीं. रानडे नि दादाभाअी यांचे पट्टशिष्य देशभक्त गोपाळराव गोखले यांचेंच अुदाहरण पहा. वरील काळानंतर दहाबारा वर्षे अुलटल्यावर गोखले जेव्हां त्यांच्या प्रौढ वयांत कांग्रेसचें नेतृपद पावले तेव्हां त्यांनीं काढलेल्या Servants of India Societyची, भारत सेवक समाजाची, जी घटनात्मक मूळ प्रतिज्ञा त्यांनीं प्रसिद्धिपत्रकांत ग्रथिली ती होती अशी :

"The members of this new society frankly accept the British connection as ordained in the inscrutable dispensation of Providence for India's Good."

भावार्थ हाच कीं, "ह्या संस्थेचे सभासद, अीश्वरकृपेनें हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या ब्रिटिश प्रभुत्वास निष्कपटपणें स्वीकारीत आहेत. कारण त्यांतच हिंदुस्थानचें कल्याण आहे."

अशा ब्रिटिशनिष्ट देशभक्तांच्या नेतृत्वाखालीं नि ब्रिटिश सरकारच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष अुत्तेजनानें कांग्रेसच्या शाखाप्रशाखांचा विस्तार पहिल्या दहा वर्षांतच साऱ्या हिंदुस्थानभर वाढत गेला. 'ब्रिटिशांचे अुपकार', 'आमचा मायबाप सरकार', 'आमची सम्राज्ञी व्हिक्टोरिया', 'मायबाप सरकार', 'ब्रिटिश राज्य म्हणजे देवाचें वरदान', 'आम्ही त्यांचे केवळ राजनिष्ठ प्रजाजन', 'ब्रिटिश साम्राज्य चिरायु होवो' अित्यादि प्रकारची त्या आंग्लो-अिंडियन पुढाऱ्यांनीं पढविलेली आणि त्यावेळच्या कांग्रेसच्या हिंदी पुढाऱ्यांना नि अनुयायांना मनःपूर्वक पटलेली ती कांग्रेसी परिभाषा नि त्या कांग्रेसी घोषणा हिंदुस्थानांतील दैनिकादैनिकांतून दुमदुमत राहिल्या. देशांतील सारें मुद्रणपीठ नि वाक्पीठ कांग्रेसनें हस्तगत केलें. ब्रिटिशनिष्ठेचा महापूर देशभर घोंघावत वाहूं लागला. हिंदुस्थान देशाची प्रातिनिधिक आणि मुख्य अशी संस्था कांग्रेस हीच काय ती होय असें ह्यूमप्रभृति आंग्लो-अिंडियन कूटनीतिज्ञांना गर्जून गर्जून जगास यथार्थपणें सांगतां यावें अशी परिस्थिति वस्तुतःच अुत्पन्न झाली. कांग्रेस स्वतःला नुसती मी लोकमान्य आहें अितकेंच सांगून

संतुष्ट होत नव्हती. पण लोकमान्य म्हणवून घेण्यांत तिला जें भूषण वाटे त्याहून दसपट भूषण 'मी राजमान्यहि आहें' हें सिद्ध करण्यांत तिला वाटत असे. कांग्रेसमध्यें जो कोणी हिंदी देशभक्त आज पुढारी होअी तो बहुधा परवा वा तरवा कोणत्या तरी ब्रिटिशशासनीय सेनाविभागांतील अुच्च अधिकारपदीं अिंग्रजाकडून नेमला जाअी. सर, सी. आय. अी., रावबहादुर अशी कोणती ना कोणती तरी मानाची पदवी सरकारकडून त्याला दिली जाअी. कोणत्या तरी शासनीय समितींत वा सभादेशक मंडळांत (सल्लागार मंडळांत) कांग्रेसमधल्या ह्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी पुढाऱ्याना घेण्यांत येअी. आणि आपणांस ब्रिटिशां-कडून मिळणाऱ्या या 'राजमान्यते'च्या प्रसादचिन्हाविषयीं कांग्रेसला अितका आत्मगौरव वाटे कीं कांहीं विचारूं नये.

अशा ह्या हुरळून गेलेल्या कांग्रेसच्या त्यावेळच्या प्रमुखतम पुढाऱ्यांच्या भाषणांची नि प्रतिज्ञांची वानगी म्हणून आम्हीं वर जे कांहीं मूळ अुतारे दिले आहेत तशा अनेक भारुड्या भाषणांचा आणि राजनिष्ठेच्या कांग्रेसी ठरावांचा युरोप-अमेरिकेशीं संबद्ध असलेल्या ब्रिटिशांच्या पर‌राष्ट्रीय राजकारणांत-सुद्धां ह्यूमप्रभृति आंग्लो-अिंडियन कूटनीतिज्ञ कसा कपटी अुपयोग करून घेत हेंहि पहाण्यासारखें आहे.

अितरांचे देश जिंकून अिंग्रजांनीं आपलें साम्राज्य जसें वाढविलें तसेंच युरोपमधील फ्रान्स, आस्ट्रिआ, रशिया प्रभृति देशांनींहि आपआपलीं साम्राज्यें वाढविलीं होतीं. पण त्यांचा नायनाट करून आपलें साम्राज्य तेवढें अकुतोभय करावें ही अिंग्रजांची महत्त्वाकांक्षा असल्यानें अितर साम्राज्यांतल्या पददलित लोकांनीं किंवा राष्ट्रांनीं स्वातंत्र्यास्तव कुठेंहि अुठावणी केली कीं त्या क्रांतिकारक पक्षाला अिंग्लंड हटकून पाठिंबा देअी. आस्ट्रियनांचें प्रभुत्व झुगारून देअून स्वदेश स्वतंत्र करण्यासाठीं अिटालियन क्रांतिकारक अुठले तेव्हां अिंग्लंडनें त्यांचा स्वातंत्र्यप्रेमी म्हणून गौरव केला. परपीडक नि छलक म्हणून आस्ट्रियन साम्राज्य नाहीसें झालेंच पाहिजे अशी हांकाटी केली. फ्रेंच साम्राज्याविरुद्धहि त्याच्या अंकित देशांनीं सशस्त्र अुठावण्या कराव्या म्हणून चिथविलें. माझिनी, कोसूथ, रशियन क्रांतिकारक यांना अिंग्लंडमध्यें आश्रय देअून सर्व परतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा कैवारी म्हणून आपली आपणच दवंडी पिटविली. पण अिकडे हिंदुस्थानच्या पायांतील

अिंग्लंडच्या दास्याची बेडी मात्र अिंग्लंड लवलेशहि ढिली करूं अिच्छीत नसे. अिंग्लंडच्या या कपटपटुत्वाविषयीं युरोप नि अमेरिकेंतील लोक टीकेची झोड अुठवीत. 'जर अिंग्लंडला जगांतील सर्व साम्राज्यांतील सर्व परतंत्र नि पीडित राष्ट्रांविषयीं अितकी मनस्वी तळमळ खरोखरीच लागली असेल तर ते स्वतः त्यांच्या ब्रिटिश साम्राज्याच्या निर्घृण दास्यांतून प्रथमतः हिंदुस्थान देशाला कां मुक्त करीत नाहींत?' असा मर्मभेदक टोमणा अिंग्रजांचे प्रतिस्पर्धी अिंग्लंडला मारीत. परंतु 'न्याशनल अिंडियन कांग्रेस' स्थापन झाल्यापासून त्या प्रतिस्पर्ध्यांचीं तोंडें बंद करण्याचें फक्कड साधन अिंग्लंडला मिळालें. किंबहुना कांग्रेस काढण्यांतला आंग्लोअिंडियनांचा हाहि अेक हेतु होता. आणि लार्ड डफरिननें कांग्रेसचें अध्यक्षत्व अित्यादि पदें कोणाहि गव्हर्नरादिक सरकारी अधिकाऱ्याला न देतां दिखाअूपणापुरती तरी कांग्रेस ही केवळ हिंदी लोकांची बिनसरकारी स्वतंत्र संस्था आहे असें भासवावें हें जें धोरण आंखलें तें कांग्रेसचा परराष्ट्रीय राजकारणांतहि पुढें असा अुपयोग करून घेतां यावा म्हणूनच होय, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ब्रिटिश वृत्तपत्रें, वक्ते, परदेशीय प्रतिनिधि, पार्लमेंटचे सभासद नि ब्रिटिश मंत्रीहि त्यांच्या यूरोप-अमेरिकादिक प्रतिस्पर्ध्यांच्या वरील टोमण्यांना आतां सरळ तोंड देअून अुत्तरूं लागले, "हे पहा कांग्रेसचे ठराव. हिंदुस्थान आमच्या साम्राज्यांतून फुटूं अिच्छीत नाहीं. म्हणून आम्हीं तिथें राज्य करतों. आणि हिंदुस्थानच्या संमतीनें हिंदुस्थानच्या हितार्थ तसें राज्य करणें आम्हां ब्रिटिशांचें नैतिक कर्तव्यच आहे."

ब्रिटिशांच्या अशा अुत्तरांची अेक वानगी म्हणून वेडर्बर्न ह्यांच्या भाषणांतील अेक अुतारा अिथें देअूं. कालानुक्रमें तें भाषण थोडें पुढचें असलें तरी विषयानुरोधें अिथेंच अुल्लेखिणें अिष्ट. सन १९०५ मध्यें 'ग्रीनिच अेथिकल सोसायटी' मध्यें दिलेल्या ह्या भाषणांत हिंदुस्थानच्या तिजोरींतून लठ्ठ भृति (Pension) खाणारे हे साहेब म्हणाले,

"While the Italians had always refused to accept the Austrian rule (during the period of their forced subjection) as the national rule and had boycotted the Austrians so as to make the administration impossible, the Indians on the other hand so far from boycotting the British had offered them their co-operation and accepted

British Rule as their national rule, while the resolutions of the Indian National Congress showed how grievances might be redressed and the people made prosperous and contended, thus making British Rule popular, stable and strong."

भावार्थ असा कीं "आस्ट्रियनांच्या आपल्यावरील राज्यास अिटालियनांनीं स्वराज्य म्हणून केव्हांच संमति दिलेली नव्हती. त्याला अिटली नेहमींच परराज्य, परदास्य, असेंच लेखीत आली. तिनें त्या आस्ट्रियाच्या परराज्यावर बहिष्कार टाकलेला होता. परंतु हिंदी लोकांनीं आमच्या ब्रिटिश सत्तेवर बहिष्कार टाकलेला नाहीं. अितकेंच नव्हे तर ब्रिटिशांच्या राजसत्तेलाच त्यांनीं स्वराज्य म्हणून स्वतः अंगिकारलें आहे, आमच्या ब्रिटिशसरकारशीं ते आपण होअून सहकार्य करीत आहेत. हिंदी लोकांची अेकमेव प्रातिनिधिक असलेली जी अिंडियन न्याशनल कांग्रेस तिचे ठराव पहा! तेच तुम्हा (युरोपियनादिक लोकांना) हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यनिष्ठेची साक्ष परस्पर देअूं शकतील. प्रजेचीं दुःखें नाहींशी करण्याचें आणि लोकांना संपन्न नि संतोषी ठेवण्याचें कार्यीं ती कांग्रेस अशा प्रकारचें सहकार्य करीत आहे कीं ज्यायोगें हिंदुस्थानांत ब्रिटिशसत्ता लोकप्रिय, प्रबळ नि अढळ बनूं शकेल!"

म्हणजे मुख्य साध्य ब्रिटिशसत्ता हिंदुस्थानांत अढळ नि प्रबळ राखणें हें! त्यासाठीं अपरिहार्य तेवढीच काय ती लोकांच्या सुखाची नि संतोषाची अुठाठेव. अितकें निगरगट्ट स्पष्टपणें आपलें मनोगत ब्रिटिश साम्राज्यवादी वारंवार सांगत आले असतांहि कांग्रेसचे भाबडे हिंदी पुढारी त्यांना 'हिंदुस्थानचे हित-चिंतक' म्हणून गौरवीतच होते. अशा स्थितींत मेकालेपासून ह्यूमपर्यंत 'परा-जित हिंदुस्थानचें मनसुद्धां जिंकून टाकण्यासाठीं, मनसुद्धां मारून टाकण्यासाठीं' आपण ज्या ज्या युक्त्याप्रयुक्त्या योजल्या त्या बहुतांशीं सफल होत चालल्या आहेत असें समाधान ब्रिटिश कूटनीतीला वाटूं लागलें ह्यांत कांहींच आश्चर्य नव्हतें. जी स्वतःला हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा, अिंडियन न्याशनल कांग्रेस, म्हणविते तिनें स्वसंतोषानें, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नि राज्यपद हिरावून घेणाऱ्या ब्रिटिश सत्तेच्या मस्तकावर 'आमची सम्राज्ञी' म्हणून चवऱ्या मोर्चलें ढाळीत बसण्यांत बहुमान मानावा याची युरोपअमेरिकेंतील स्वतंत्र जगताला लाज वाटे —पण त्या हिंदुस्थानी राष्ट्राच्या प्रातिनिधिकपणाचा टेंभा मिरवणाऱ्या

कांग्रेसला त्या दास्याची कांहीं खंत वाटत नसे. अुलट तें दास्य देवाचें वरदान वाटे.

## तथापि 'विषमप्यमृतम् क्वचिद् भवेत्'

यद्यपि आमच्या लोकांतील राजकीय स्वातंत्र्याची महत्वाकांक्षा आणि तिच्या सफलतेसाठीं आवश्यक असलेली सशस्त्र क्रांतीची प्रवृत्ति मारून टाकण्यासाठींच अिंग्रजांनीं ही ब्रिटिशनिष्ठ कांग्रेस काढविली नि वाढविली होती तथापि 'विषमप्यमृतम् क्वचिद् भवेत्' या न्यायानें तिचा आमच्या देशाला अुपकारक असा अेक अवांतर परिणाम मात्र अपरिहार्यपणें होत चालला.

कांग्रेसचें नांवच मुळीं 'अिंडियन न्याशनल कांग्रेस', भारतीय राष्ट्रसभा, असें ठेवण्यांत आलें होतें. म्हणजे अिंडिया, भारत, हिंदुस्थान हें आसेतुहिमाचल अेक, अेकजीव, अखंड राष्ट्र आहे ही भावना त्या लोकांतच अनुस्यूत होती. निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या भाषांचे नि वेषांचे सहस्रावधि देशभक्त नि विचारवंत लोक कांग्रेसच्या वार्षिक आणि प्रांतिक अधिवेशनांतून जसजसे वारंवार अेकाच राष्ट्रभावनेनें अेकत्र येअूं लागले तसतशी सामान्य जनतेंतहि देशभक्तीची भावना खोलवर रुजत चालली. आपण कोटीकोटी लोक त्या अेकाच भारतमातेचें संतान आहोंत; आपले भिन्न भिन्न प्रांत हे त्या भारतभूमीची, आपल्या ह्या अखंड हिंदुस्थान देशाचीं, केवळ अंगोपांगें आहेत; आपलीं राष्ट्रीय नि राजकीय सुखदुःखें अेकच आहेत आणि आपणा सर्वांनीं ह्या जगांतील अितर राष्ट्रांप्रमाणें अेक बलाढ्य नि मानाढ्य राष्ट्र म्हणून नांदावयाचें असेल तर आपण सर्वांनीं अेककेंद्र, अेकात्म, अखिलभारतीय नि अखंडभारतीय असें राजैक्यहि संपादिलें पाहिजे अशा, हिंदुजगतात आधींच अंतर्हित असलेल्या भावनांची अेक नवी लाट देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत प्रकटपणें हेलावत चालली.

परंतु कांग्रेसमधील अिंग्रजीशिक्षित पुढाऱ्यांना वाटूं लागलें कीं ही जी अखंड हिंदुस्थानच्या अेकात्मत्वाची प्रबुद्ध जाणीव आणि राष्ट्रैक्याची भावना देशभर अकस्मात् संचरत चालली आहे ती अिंग्रजी शिक्षणाचें फळ आहे. अर्थात् ब्रिटिशांचें अेकछत्री राज्य ह्या देशावर नांदत आहे म्हणूनच काय ती पंजाब, बंगाल, मद्रास प्रभृति भिन्नप्रांतीय लोकांमध्यें आपण अेका

राष्ट्राचे लोक आहोंत अशी पूर्वीं कधींहि नसलेली आत्मीयता आज प्रथमच अुत्पन्न झालेली आहे. निःसंशय भारतीय राष्ट्रैक्याची नि राज्यैकाची कल्पना-सुद्धां ब्रिटिश अिकडे येण्यापूर्वीं आम्हांस नव्हती, ती ब्रिटिशांच्या अेकछत्री राज्यसत्तेचीच देणगी आहे. कांग्रेसमधील हिंदु पुढाऱ्यांच्या या स्वदर्थेला अिंग्रजी पुढारी अन्यथात्च अुचलून धरीत होते हें सांगणें नकोच. अिंग्रजी पुढारी अुघड अुघड धमकावून सांगत, हिंदी लोकांमध्यें ही राष्ट्रैक्याची भावना जर तुम्हांला बळकट करावयाची असेल तर तुम्ही प्रथमतः ब्रिटिशांच्या अेकछत्राशीं सदोदित राजनिष्ठ राहिलें पाहिजे. जर ब्रिटिश छत्र भंगलें तर तुमच्या अेक-संध होत चाललेल्या या अखंड हिंदुस्थानच्या राष्ट्रैक्याचेहि तुकडे तुकडे अुडून जातील. तुम्हां कोटीकोटी हिंदी लोकांना देशभक्तीच्या सूत्रानें अेकत्र बांधूं शकेल असें अेकच अुपकारक बंधन आहे—ब्रिटिशांचें अेकछत्र!

तथापि वतुस्थिति काय होती ?—

प्रकरण अकरावें

# हिंदी राष्ट्रसभेच्या पायाभरणींतच मुस्लिम पायधरणीचा कालध्वम् (Time-Bomb)

ह्या कांग्रेसी पुढाऱ्यांनीं आणि त्यांच्या प्रचारकांनीं स्वतःलाच जर असा आत्मनिरीक्षक प्रश्न केला असता कीं आपण ह्या आपल्या कांग्रेसला 'अिंडियन न्याशनल कांग्रेस' म्हणजेच 'भारतीय राष्ट्रसभा' म्हणून जें म्हणवून घेत आहों तें कोणाच्या जिवावर ? राष्ट्राच्या, 'नेशन'च्या, नांवें कांग्रेसनें आव्हान देतांच अवघ्या दोन तीन वर्षांत आसाम ते सिंध नि काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंतचे हे जे सहस्रावधि देशभक्त लोक तिला साद देते झाले आहेत नि तिच्या राष्ट्रीय पीठाभोंवतीं अेकवटले आहेत ते कोण आहेत ? फार काय, हे कांग्रेसचे सभासमारंभांतून स्वत ला 'हिंदी' म्हणवून घेत असणारे पुढारीहि मुळांत घरचे कोण आहेत ? माननीय पण तुरळक अपवाद सोडतां ते कांग्रेसचे स्वदेशभक्त पुढारी नि ते स्वदेशभक्त सहस्रावधि अनुयायी होते सारे हिंदु. त्यांच्याच जिवावर कांग्रेस आपल्याला 'भारतीय राष्ट्र सभा', अिंडियन न्याशनल कांग्रेस, म्हणवूं शकत होती. केवळ अिंग्रजी शिक्षणानें जर ही राष्ट्रैक्य भावना येअूं शकती तर त्या काळींहि हिंदुस्थानांत जे सहस्रावधि अिंग्रजीशिक्षित मुसल्मान आणि सरकारांत अुच्च अधिकारपदांवर असलेले मुसलमान विद्यमान होते त्यांच्यांतहि तिच्या भारतीय राष्ट्रैक्याची भावना अुसळावयास पाहिजे होती ! मग ते सहस्रावधि मुसल्मान त्या 'अिंडियन न्याशनल कांग्रेस'मध्यें आले का ? सर बद्रूद्दीन तय्यबजीसारखीं दोनतीन नांवें सोडलीं असतां अिंग्रजीशिक्षित वा अशिक्षित मुसलमान समाज असा कांग्रेसला कां मिळाला नाहीं ? मिळाला नाहीं अितकेंच नव्हे तर मुसलमानी अिंग्रजीशिक्षित वर्गानेंच, त्यांच्यांतील जे अग्रणी पुढें सर सय्यद अहंमद या

नांवें प्रख्यातीस पावले त्यांच्या नेतृत्वाखालीं, कांग्रेस स्थापन झाली न झाली तोंच तिला विरोधिण्यासाटीं दुसरी मुस्लीम पक्षीय संस्था 'The Patriotic Association' ह्या नांवाची काढली नाहीं का? आणि या अिंग्रजीशिक्षित मुस्लीमांनींच साऱ्या मुसलमान समाजाला अुद्देशून घोषणांचा डांगोरा पिटविला नाहीं का कीं "कांग्रेस? ही हिंदु कांग्रेस आहे! मुस्लीमांनो, बहिष्कार घाला! कांग्रेसवर बहिष्कार!!

## भारतीय राष्ट्रैक्याची भावना शतकोशतकें हिंदूंच्या रक्तांत मुरलेली होती.

अिंग्रजीमध्यें Nation and State हे दोन शब्द आहेत. ते दोन शब्द राजकारणांतील दोन भिन्न भावांचे वाचक आहेत. आपल्या राष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति गौण ठरून त्याला आतां जो रूढार्थ प्राप्त झाला आहे त्या अर्थीं तो शब्द अिंग्रजी Nation शब्दाचा अर्थ व्यक्तवूं शकतो. तसेंच State म्हणजे राज्य. या संकेतान्वयें पहातां राष्ट्रसंस्था नि राज्यसंस्था ह्या दोन अंशतः भिन्नार्थक संस्था आहेत. युगोयुगांच्या भौगोलिक, अैतिहासिक, धार्मिक नि सांस्कृतिक अशा प्रिय नि पूज्य बंधनांनीं निगडित झालेल्या आणि भारतांत निवसत असलेल्या ह्या आमच्या कोटीकोटी देशबांधवांच्या हिंदु जगतांत राष्ट्रैक्याची नि देशैक्याची भावना सहस्रावधि वर्षांपासून रक्तांत मुरत आलेली आहे. हें हिंदुजगत् ह्या आसेतु हिमाचल भारतभूमीला आपली पितृभू नि आपली पुण्यभू म्हणून पूजित आलें आहे. 'अुत्तरस्याम् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम्। तद्वर्षं भारतम् नाम भारती यत्र संततिः॥' ही आमच्या राष्ट्रैक्याची व्याख्या आरब आहे: अिंग्रजी नव्हे. आपल्या ह्या राष्ट्रैक्याची परिणति राज्यैक्यांतहि व्हावी, हें आपलें भारतीय राष्ट्र अेकछत्री व्हावें, अशी महत्त्वाकांक्षाहि प्राचीन काळापासून आमच्या राष्ट्रीय हृदयांत सळसळत आली आहे. तिच्या प्रेरणेनें अखिल भरतखंडावर अेकछत्री राज्यसत्ता प्रस्थापून त्याचें राज्यैकहि साधण्याचे भगीरथ यत्न प्राचीन काळापासून आमचीं दिग्विजयी सैन्यें नि राजमंडलें करीत आलीं. साम्राज्यसंस्था, चक्रवर्तित्व संस्था, राजसूयाश्व-मेधादिक यज्ञप्रथा, ह्या त्या प्रयत्नांच्याच द्योतक होत. आमच्या अितिहासाचीं अगदीं अलिकडचीं पानें चाळलीं तरी सुद्धां हेंच आढळेल कीं मुसलमानी

पादशाहीस अुलथून पाडून आसिंधुसिंधु हिंदुस्थानांत हिंदुपदपादशाही स्थापण्याची प्रबुद्ध महत्त्वाकांक्षा धरून महाराष्ट्रीय पराक्रमानें तें ध्येय गांठीतहि आणलें होतें. ह्या विषयाचा सविस्तर प्रपंच आम्हीं आमच्या Hindutwa (हिंदुत्व) या पुस्तकांत केलेला आहे. जिज्ञासा असेल त्यांनीं तो पहावा.

महाराष्ट्र साम्राज्याच्या त्या काळीं विजयोत्फुल्ल हिंदु हृदयांत अुसळणाऱ्या राष्ट्रैक्याच्या प्रबळ भावनांचा प्रतिध्वनि त्या काळच्या भाषेत जर अैकावयाचा असला तर गोविंदराव काळे यांनीं नाना फडणविसांना सन १७९२ चे जवळपास, म्हणजे महाराष्ट्र राज्यांत अिंग्रजांचें बोटहि शिरकलें नव्हतें त्या वेळीं, लिहिलेल्या सुप्रसिद्ध पत्रांतील खालील वाक्यें वाचावीं :

"......अटक नदीचे अलीकडे (सिंधु नदीचे अलीकडे) दक्षिण समुद्र पावेतों हिंदूंचें स्थान : तुरुकस्थान नव्हे ! ही आपली सीमा पांडवांपासून विक्रमाजितापावेतों त्यांनीं राखून अुपभोग घेतला. पुढें राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचें प्राबल्य झालें......पुढें शिवाजी महाराज शककर्ते व धर्मरक्षिते निघाले. त्यांनीं किंचित् कोन्यांत धर्मरक्षण केलें. पुढें नानासाहेब व भाअूसाहेब प्रचंड प्रतापसूर्य असे झाले कीं असें कधीं झालें नाहीं. हल्लीं श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें करून व राजेश्री पाटीलबावांच्या (महादजी शिंदे यांच्या) बुद्धि व तरवारीच्या पराक्रमें करून सर्व (पुनरपि) घरास आले......ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें अुचललीं त्यांचीं पाटीलबावांनीं फोडलीं. न लाभाव्या त्या गोष्टी लाभल्या. त्यांचा बंदोबस्त शककर्त्यांप्रमाणें होअून अुपभोग घ्यावा हें पुढेंच आहे. कोठें पुण्याअींत अुणें पडेल आणि काय दृष्ट लागेल न कळे. झाल्या गोष्टी यांत केवळ मुलुख, राज्य प्राप्त अितकेंच नाहीं तरी वेदशास्त्रारक्षण, गोब्राह्मण प्रतिपालन, सार्वभौमत्व हातीं लागणें, कीर्ति यश यांचे नगारे वाजणें अितक्या गोष्टी आहेत. हे किमया संभाळणें! ..."

हिंदु जगताच्या पिंडांत अखिल भारतीय राष्ट्रैक्याची भावना अशी अंतर्हित होती यास्तवच 'अिंडियन न्याशनल कांग्रेसचें', 'अखिल भारतीय राष्ट्र सभेचें', नांव अैकतांच तिचें हिंदूंना ममत्व वाटूं लागलें. ती आपल्याच राष्ट्राची संघटना आहे अशी आपुलकी त्यांच्या हृदयांत आपोआप स्फुरली. आपल्या मातृभूमीची सेवा करणें हें आपलें कर्तव्यच आहे अशा निष्ठेनें, भाडोत्री प्रतिमूल्याचा कोणताहि सौदा न करतां ते सहस्रावधि हिंदु देशभक्त

नि देशसेवक त्या राष्ट्रसंस्थेच्या पीठाभोंवतीं अेकवटून अुभे ठाकले.

## पण मुसलमान ?

अुलटपक्षीं 'या, या' म्हणून कांग्रेसीय हिंदु पुढारी विनवणी करीत असतांहि त्या अखिल भारतीय राष्ट्रसभेमध्यें मुसलमान कां आले नाहींत? अितकेंच नव्हे तर अगदीं तिच्या जन्मापासूनच मुसलमानांनीं जातिधर्मनिरपेक्षपणें अेका राष्ट्रांत विलीन होणाऱ्या कांग्रेसच्या मूळ सिद्धांताचाच मुसलमान अितका तिटकारा कां करीत गेले आणि तत्काळ कांग्रेसविरुद्ध आपली स्वतंत्र मुस्लीम संघटना कां अुभारते झाले? भाबडे विचारे कांग्रेसीय हिंदु देशभक्त! मुसलमानांची मूळची धर्मप्रवृत्ति नि तदधिष्ठित अैतिहासिक परंपरा कोणती यांचा त्या अिंग्रजीशिक्षित कांग्रेसीय हिंदु पुढाऱ्यांपैकीं बहुतेकांना ओनामा सुद्धां माहीत नव्हता. हिंदुमुसलमानादिकांचें समाअिक 'हिंदी' 'अिंडियन' राष्ट्र असें त्यांचें जें कांग्रेसीय ध्येय त्यांना प्रामाणिकपणें अगदीं निर्भेळ देशभक्तीचें प्रतीक वाटे—तेंच मुळीं मुस्लीमांच्या धर्मनिष्ठेचा नि अैतिहासिक परंपरेचा अुपमर्द करणारें होतें. मुसलमानांच्या धर्मशासनाप्रमाणें हिंदुमुसलमानांचें 'समाअिक' राज्य हें वाक्यच मुळांत होतें अधर्म्य, पापी. जें निर्भेळ मुस्लीम राज्य तेंच काय तें धर्म्य, त्यांच्या 'शरियत'ला (शास्त्राला) धरून. कांग्रेस मुसलमानांना जों जों आंजारून गोंजारून भावपूर्ण भाषेंत सांगत सुटली कीं "आपण हिंदु मुसलमान अेकाच देशमातेचीं लेकरें म्हणून आपण देशबंधु आणि म्हणून अेका हिंदी राष्ट्राचे नागरिक आहों!" तों तों मुसलमान मनांतल्या मनांत अधिकच चिडूं लागत. कारण मुसलमानांच्या धर्मशास्त्राप्रमाणें जींत निर्भेळ मुस्लीम राज्य नाहीं ती भूमि त्यांचा देशच होअूं शकत नव्हती. तिला म्हणे 'देशमाता' म्हणा! तोबा, तोबा!! त्यांतहि ज्या देशांत मुस्लीम राज्य तर नाहींच पण मुस्लीम बहुसंख्याहि नाहीं, अुलट केवळ मुस्लीमेतरांचीच नव्हे तर त्यांतहि हिंदूसारख्या मूर्तिपूजकांची प्रचंड बहुसंख्या आहे तो देश तर प्रत्यक्ष काफरस्थान, नापाक. अशा देशांत बलवत्तराशीं गांठ पडली तर मुसलमान गोगलगाअीसारखे नरम येअून रहात खरे—पण ते भीतीनें, निष्ठेनें नव्हे. फार काय, अशा 'नापाक' देशांत ते तसे जोंपर्यंत रहातील तोंपर्यंत त्यांना अेक धार्मिक प्रायश्चित्तहि घ्यावें लागतें. अक्षरशः 'तोबा' करावा

लागतो. मुसलमानांच्या या मनःप्रवृत्तीची निंदा करण्यासाठीं वा स्तुति करण्यासाठीं आम्ही हीं विधानें करीत नसून वस्तुस्थिति जशी आहे तशी सांगत आहों. स्वतः कोणताहि मुस्लीम शास्त्रज्ञ मुसलमान हें नाकारणार नाहीं आणि तसें त्यांच्यातील कोणीं नाकारलें तरी मुस्लीमांचें धर्मशास्त्र नि अितिहास तर कुठें गेला नाहीं ना? हवें त्यानें त्याच्याशीं हीं विधानें पडताळून पहावीं.

## कांग्रेसच्या विरुद्ध मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांचा आरंभ

वर दिलेल्या मुस्लीम धर्मनीतीच्या नि राजनीतीच्या प्रचारार्थ सर सय्यद अहमद यांच्या प्रयत्नामुळें मुसलमानांसाठींच स्वतंत्र अशी अेक शिक्षणसंस्था अलिगड येथें काढण्यांत आली. अिंग्रजी शिक्षणामुळें होणारे लाभ पदरीं पाडून घेअूनहि, तें शिक्षण घेतलेल्या हिंदूमध्यें हिंदुत्वाच्या जातिवन्त स्वाभिमानाला मारक होणाऱ्या ज्या ब्रिटिशछाप 'हिंदीत्वा' ची रोगट सांथ बळावतच चालली होती, तशी मुस्लीम तरुणांचीहि स्थिति होअूं नये आणि अिंग्रजीशिक्षित मुस्लीम हा अशिक्षित मुस्लीमांहूनहि कट्टर मुस्लीम बनलेला असावा अशा अीर्षेनें अलिगडची शिक्षणसंस्था भारावलेली होती. हीच संस्था पुढें कांहीं कालानें हिंदुद्वेष्ट्या मुस्लीम राजनीतीचें केंद्र म्हणून गाजलेल्या अलिगड विद्यापीठांत परिणत झाली.

नवीन काळास अवश्य अशा मुस्लीम संस्था, वृत्तपत्रें, अधिवेशनें प्रभृति साधनांनीं युक्त अशी मुस्लीम संघटना अुभारून मुस्लीम पुढाऱ्यांनीं सामुदायिकरीत्या कांग्रेसविरुद्ध अिंग्रजसरकारकडे तीव्र प्रतिवाद करण्यासहि आरंभिलें. त्यांच्या त्यावेळच्या लिखाणांचा नि बकाणांचा अढळ बिंदु म्हटला म्हणजे हा : कांग्रेस ही हिंदुसंस्था आहे. ब्रिटिश सरकार जर तिचें सामर्थ्य वाढूं देअील आणि हिंदूंना मोठमोठे अधिकार देअील तर वस्तुतः अिथें हिंदुराज्य होअील. पण मुसल्मान अशा हिंदूंच्या राज्यांत राहण्यास कधींहि मान्य होणार नाहींत. ब्रिटिशांच्या राज्यांत आम्हांला धोका वाटत नाहीं. ह्यासाठीं कांग्रेसच्या कोणत्याहि मागण्या, तिच्यांतील हिंदु पुढाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या अुच्चपदस्थ चाकऱ्या, सरकारी समित्यांवरील नेमणुका, कोणतेहि राजकीय वा नागरिक अधिकार अित्यादि प्रकरणीं प्रथमतः आम्हा मुस्लीमांच्या प्रतिनिधींची स्वतंत्रपणें संमति घेअूनच सरकारनें काय तें केलें पाहिजे. अितकेंच नव्हे तर आम्हां मुसल्मानांचें

ह्या देशाचे भूतपूर्व राज्यकर्ते म्हणून जें विशेष महत्त्व आहे तें लक्षांत ठेवून आणि त्यांतहि आम्ही अल्पसंख्य असल्यामुळें आमच्या संरक्षणाचें जें विशेष दायित्व सरकारवर आहे तेंहि ध्यानीं घेऊन राजसेवा विभागांतील अुच्चपदें, चाकऱ्या, प्रतिनिधित्व अित्यादी अधिकार वा सुविधा देण्याच्या प्रत्येक प्रश्नीं सरकारशीं भांडणाऱ्या ह्या हिंदूहून आम्हां राजनिष्ठ मुसलमानांना अधिक प्रमाणानें नि जातवार वांटा मिळाला पाहिजे!

हें सांगावयास नकोच कीं ह्यूमप्रभृति कांही ब्रिटिश कूटनैतिकांनीं जसें कांग्रेसला तिच्या ब्रिटिशनिष्ठ स्वरूपेमुळें अेकीकडे अुचलून धरलें होतें तसेंच दुसरीकडे दुसऱ्या कांहीं ब्रिटिश राजकारण्यांनीं मुस्लीम संघटनेच्या कांग्रेस-विरोधालाहि अुचलून धरलें होतें. ब्रिटिश राजनीतिज्ञांचे हे दोन पक्ष दिसाअू होते. आंतून त्यांचा अुद्देश होता अेकच. ब्रिटिश राज्याच्या स्थैर्यासाठीं ब्रिटिशांना ह्या दोन्ही परस्परविरोधी हिंदी संस्थांची आवश्यकता होती. त्यांच्या फुटींतच होती ब्रिटिश साम्राज्याची वळकटी.

## ह्या वेळीं कांग्रेसचें कर्तव्य काय होतें?

हेंहि अगदीं स्पष्टच आहे कीं हिंदुमुसलमानांत ही फूट पाडण्याचा दोष कांग्रेसच्या माथीं केव्हांहि मारतां येणार नव्हता. भारतीय राष्ट्रसभेनें आपल्या पुढें जें ध्येय ठेवलें होतें तें भौगोलिक राष्ट्रवादाचें, Geographical Nationality चें, होतें. अेका देशांत जे रहातात ते लोक धर्मजातिनिरपेक्ष अेकराष्ट्र असतात किंवा असले पाहिजेत. युरोपांतील फ्रान्सप्रभृति कांहीं देशांच्या आणि विशेषतः ब्रिटनच्या त्या वेळच्या अेकराष्ट्रीय स्वरूपावरून देखोदेखीं त्यांनीं राष्ट्राची ही भौगोलिक व्याख्या अुचलली होती. वास्तविक पहातां स्वतः त्या टीचभर ब्रिटनमध्यें तशी देशीय राष्ट्रैक्याची भावना अंगीं मुरण्या-पूर्वीं स्काटलंड, अिंग्लंड, वेल्स प्रभृति घटकांतील आणि रोमनक्याथोलिक, प्राटेस्टंट प्रभृति धर्मपंथांतील कितीतरी यादवी युद्धांच्या स्थित्यंतरांतून त्यांना शतकोंशतकें रखडत यावें लागलें होतें. परंतु अितका कोणताहि खोल विचार न करतां अेक देश अेवढाच काय तो राष्ट्रैक्याचा घटक असतो अशा अेकांगी स्वरूपेनें तीच व्याख्या कांग्रेसनें हिंदुस्थानास लावली होती. तीहि अेका अर्थी अयोग्य नव्हती. तोहि प्रयोग करून पहाण्यासारखा होता.

येथपर्यंत या दिशेनें अेका अर्थी कांग्रेसची वाट चुकली नव्हती. यासाठीं मुसलमानांनीं "कांग्रेस हिंदूंची आहे. आम्ही तींत येत नाहीं. आम्हांला मुसलमान म्हणून विशेष अधिकार मिळतील तरच आम्हीं तिच्यांत येअूं" असा अधिक्षेप करतांच कांग्रेसच्या 'भारतीय राष्ट्रवादा'ची प्रतिज्ञा पाळण्यासाठींच कांग्रेसनें ठांशीव अुत्तर द्यावयास हवें होतें कीं :

"अखंड भारत हा आमचा देश. तेंच आमचें राष्ट्र. त्यांतील सर्व नागरिकांना जाति-धर्म-प्रांत-निर्विशेषपणें ह्या भारतीय राष्ट्रसभेंत, ह्या 'अिंडियन न्याशनल कांग्रेस'मध्यें येण्याचा अधिकार आहे. मग तो धर्मानें हिंदु आहे कीं मुसलमान कीं पारशी कीं ख्रिश्चन अशी विचारणा करणेंसुद्धां ह्या आमच्या कांग्रेसच्या मूलभूत प्रतिज्ञेच्याच विरुद्ध आहे. कांग्रेसमध्यें हिंदूच हिंदु आहेत हें जें तुम्ही म्हणतां तें सुद्धां आमच्या दृष्टीनें 'वदतो व्याघात' आहे. कारण कांहीं ब्रिटिश नागरिक सोडतां कांग्रेसमध्यें जे जे हिंदी लोक आहेत ते ते हिंदी आहेत, अिंडियन आहेत,—इतकेंच आम्ही जाणतों. आणि जे तुम्ही स्वतःला मुसलमान म्हणवून घेत आहां, ते तुम्ही जरी अुद्या कांग्रेसमध्यें आलांत तरी आम्ही तुम्हांला केवळ हिंदी, केवळ अिंडियन, म्हणूनच ओळखूं—मुसलमान म्हणून नाहीं! यच्चयावत् हिंदी देशबांधवांच्या हितासाठीं ही हिंदी राष्ट्रसभा जे जे अधिकार मागते ते ते सारख्याच प्रमाणांत सारख्याच नियमनाखालीं सर्व नागरिकांना अुपभोगितां येतील. ज्याला त्याला न्याय्य धर्मस्वातंत्र्य देण्यापलीकडे ह्या भारतीय राष्ट्रसभेचा धर्माशीं कांहींहि संबंध नाहीं. या प्रतिज्ञेवर ज्या हिंदी नागरिकाला कांग्रेसमध्यें यायचें असेल त्यानें यावें. अन्यथा येअूं नये."

परंतु असें रोखठोकपणें अुत्तर न देतां कांग्रेसमधील हिंदी पुढाऱ्यांनीं मुसलमानांना मुसलमान म्हणून ओळखण्यास आणि त्यांना आंजारण्यागोंजारण्यास आरंभिलें. कांग्रेसमध्यें आपण बहुतेक हिंदूच आहोंत याविषयीं त्यांचेंच मन त्यांना खाअूं लागलें. कांग्रेसचे अनेक प्रमुख हिंदु पुढारी ओशाळल्यासारखे होअून म्हणूं लागले, लिहूं लागले, "आम्ही प्रथम हिंदी आहोंत मग हिंदु आहोंत!" आणि रावबहादुर रानडे यांच्यासारखे ज्येष्ठ नि श्रेष्ठ देशभक्त तर त्याच्याहि पुढें जाअून प्रकट घोषणा करूं लागले. 'मी हिंदु नाहीं नि मुसलमानहि नाहीं. मी केवळ हिंदी आहें!" परंतु जों जों ते स्वतःला हिंदु म्हणून

व्यावयास लाजूं लागले तों तों मुसलमान पुढारी आपल्या संस्थांतून प्रकटपण गर्जूं लागले, "पण आम्ही प्रथम मुसलमान आहोंत नि मग हिंदी!" तें मुस्लीम संघटना वेगानें करीत चालले आणि त्याला जें तोंड देअूं शकतें तें हिंदुसंघटन करण्याचें मनांत आणणेंहि हे कांग्रेसी हिंदु अराष्ट्रीय पाप समजूं लागले. ज्या संस्थेचें वा सभेचें अुद्दिष्ट हिंदी राष्ट्राच्या पायावर आधारलेलें आहे ती संस्था वा सभा हिंदी राष्ट्रवादी आहे, मग त्यांत कोणी मुसलमान असो वा नसो, अशी कणखर वा तर्कशुद्ध व्याख्या करण्याचें सोडून हे कांग्रेसचे प्रामाणिक पण राजकीय प्रज्ञाशून्य देशभक्त ज्या संस्थेंत वा सभेंत कोणीतरी मुसलमान आलेला नाहीं ती 'हिंदी' म्हणावी तरी कोणत्या तोंडानें असें आपणच म्हणूं लागले. परिणामतः त्यांचा निश्चय झाला कीं कसेंहि करून कांहीं मुसलमान तरी कांग्रेसमध्यें आणलेच पाहिजेत. आपला कांग्रेसमध्यें येण्याचा भाव वाढता आहे ही गुरुकिल्ली मुसलमानांच्या हातीं लागतांच त्यांनीं अमुक विशेष अधिकार द्याल तर येतों—आणखी द्याल तर येतों—अशा लुटालुटीस प्रारंभिलें यांत आश्चर्य तें काय! मुस्लिम दृष्टीनें पाहिलें तर त्यांचें आत्मनिष्ठ राजकारणच खरें राजकारण होतें. आणि कांग्रेसी हिंदूंचें? छट्! तें राजकारणच नव्हतें! त्यापायीं हिंदुत्वहि बुडालें आणि हिंदीत्वहि बुडालें!

सर्वसामान्यतः आपल्या जनतेची अशी समजूत आहे कीं लखनो-करारानंतर किंवा खिलाफति चळवळीनंतरच कांग्रेस मुसलमानांच्या आहारीं गेली, आणि तिच्या हिंदी राष्ट्रवादाच्या ध्येयापासून ढळत चालली. पण मुसल-मानांशीं मुसलमान म्हणून करार करण्याअितका तरी तिला मुसलमानांचा जातीय वचक कांहीं अेका दिवसांत किंवा अेका वर्षांत वाटणें संभवनीय नव्हतें. त्याचीं पाळेंमुळें त्या पूर्वींच्या काळांतहि घुसलेलीं असलीं पाहिजेत. अशा अटकळीनें त्यांचा सुगावा काढण्यासाठीं मी कांग्रेसच्या आरंभापर्यंत तिच्या पुढाऱ्यांचीं भाषणें, लेख, तिचे ठराव प्रभृति तद्विषयक लिखाण वाचीत जों मागें मागें जात चाललों तों मला आढळून आलें कीं अखंड हिंदुस्थानच्या दैशिक पायावर धर्म-जाति-प्रांत-निर्विशेष असें हिंदी राष्ट्र अुभारण्यासाठीं 'अिंडियन न्याशनल कांग्रेसचा' जिथें प्रारंभ झाला तिथें त्या कांग्रेसच्या प्रारंभांतच कांग्रेसकडून होणाऱ्या मुसलमानांच्या धर्मीय नि जातीय मन-धरणीच्या आरंभाचीं पाळेंमुळें घुसलेलीं आहेत. त्यांतहि सुरेंद्रनाथ बानर्जी

महाशयांसारख्या त्या काळच्या धुरंधर कांग्रेसनेत्याचें आत्मवृत्त ह्या दृष्टीनें मी लक्षपूर्वक वाचीत असतां अेका च्छेदकाच्या (पारिग्राफच्या) कोपऱ्यांत चार-पांच ओळी आढळल्या. त्यांच्यावर न टीप न टाप न टीका. त्यांत काय आहे लक्ष देण्यासारखें अशा वृत्तींत लेखकानें त्या अगदीं सहजासहजीं लिहिलेल्या दिसल्या. पण मला त्या लाखमोलाच्या वाटल्या. राजकीय साहित्याच्या सांदीकोंपऱ्यांतून त्या ओळी वेंचून काढून त्यांतील अैतिहासिक मर्मावर शोधज्योत (searchlight) पाडण्याचा अग्राधिकार मला वाटतें माझ्याकडे आहे. त्या ओळी अशा :

मद्रासला सन १८८७ मध्यें कांग्रेसचें तिसरें अधिवेशन झालें. त्यासंबंधीं लिहितांना देशभक्त सुरेंद्रनाथ बानर्जी आपल्या आत्मचरित्राच्या १०८'व्या पृष्ठावर लिहितात :

"....The Mahomedan community under the leadership of Sir Sayyad Ahmed had held aloof from the Congress. They were working under the auspices of the 'Patriotic Association' in direct opposition to the national movement. Our critics regarded the National Congress as a Hindu Congress and the opposition papers described it as such.

"We were straining every nerve to secure the co-operation of our Mohamedan fellow countrymen in this great national work. We sometimes paid the fares of Mahomedan delegates and offered them other facilities."

"भावार्थ कीं सर सय्यद अहमद यांच्या पुढारीपणाखालीं मुसल्मान समाज हा कांग्रेसपासून फटकून राहिला होता. कांग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीचा अुघड अुघड विरोध करण्यासाठीं (सर सय्यद अहमद यांनीं काढलेल्या) 'पेट्रीआटिक असोशियेशन' या संस्थेच्या नेतृत्वाखालीं मुस्लीम समाज काम करीत होता. आमचे टीकाकार न्याशनल कांग्रेसला हिंदु कांग्रेस म्हणत आणि विरोधी वृत्तपत्रेंहि कांग्रेसला हिंदु कांग्रेस असेंच संबोधीत. (न्याशनल कांग्रेसच्या) महान् राष्ट्रकार्यांत आमच्या मुस्लीम बांधवांचें सहकार्य मिळविण्यासाठीं आम्ही आमच्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होतों. केव्हां केव्हां मुसलमान प्रतिनिधींनीं कांग्रेस अधिवेशनांत यावें म्हणून आम्ही त्यांचें भाडेंसुद्धां भरीत होतों, आणि त्यांना अितर सुखसोयीहि पुरवीत होतों."

या अुताऱ्यावरून हें स्पष्ट होत आहे कीं असल्या भाडोत्री मुस्लीमांना केवळ ते मुसलमान म्हणून, डोक्यावर नाचवीत आपल्या हिंदुमुसलमानी अेकीचा नि हिंदी राष्ट्रैक्याचा तमाशा साज्रा करण्याच्या वेडानें कांग्रेसला सन १८८७ च्या आधींपासून, म्हणजे पहिल्या दोन वर्षांचे आंतच झपाटलें होतें. कांग्रेसी हिंदु पुढाऱ्यांच्या या मनोवृत्तीमुळें मुसलमानांना भाड्याचे नि सुखसोयींचे लहान चेक देतां देतांच पुढें 'कोरे चेक'—गांधीजींचे 'ब्ल्यांक चेक्स'—देण्याचा प्रसंग येणार होता! या बुद्धिभ्रंशापायींच अगदीं आरंभापासून कांग्रेसी हिंदु पुढाऱ्यांनीं त्या 'अिंडियन न्याशनल कांग्रेस'च्या

## हिंदी राष्ट्रैक्याच्या पायाभरणींतच मुस्लीम पायधरणीचा कालध्वम् (Time Bomb)

अजाणपणें ठेवून दिला! त्याच कालध्वम्चा यथाकालीं स्फोट होअून त्या सर्वांच्या अखंड हिंदुस्थानच्या, त्या त्यांच्या हिंदी राष्ट्रैक्याच्या, 'अिंडियन नेशन'च्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून जाणाऱ्या होत्या हें त्यांच्या ध्यानींमनींहि आलें नाहीं!

कालानुक्रमें पुढचा असतांहि आमच्या वरील विधानांना प्रांजलपणें समर्थीणारा देशभक्त सुरेंद्रबाबूंच्या आत्मवृत्तांतील हा आणखी अेक अुतारा पहा. कांग्रेसविरोधी अशी स्वतंत्र मुस्लीम संघटना अुभारणारे नि हिंदुद्वेषी अलिगड विद्यापीठाचे सूत्रधार सर सय्यद अहमद जेव्हां कांहीं वर्षांनीं वारले तेव्हां त्यांच्या मृत्यूविषयीं लिहितांना सुरेंद्रनाथ महाशय आपल्या आत्मचरित्राच्या ४९ व्या पृष्ठांत म्हणतात :

"... Sir Sayyad's Patriotic Association was started in opposition to the Congress....But let bygones be bygones Let us not forget the debt of gratitude that Hindus and Mohamedans alike owe to the honoured memory of Sir Sayyad Ahmed. For, the seeds that he sowed are bearing fruit; and today the Aligarh College, now raised to the status of a University, is the centre of that culture and enlightenment which had made Islam in India instinct with the modern spirit and along with that patriotic enthusiasm which argues well for the future solidarity of Hindus and Mohamedans!"

"भावार्थ कीं, सर सय्यदांनीं कांग्रेसला विरोधण्यासाठीं 'पेट्रिअॅटिक असोशिअेशन' काढली खरी...पण जाअू द्या, झालें तें झालें. आम्ही हें विसरतां कामा नये कीं हिंदु नि मुसलमान हे अुभयतांहि सय्यद अहमदांचे अृणी आहेत. आणि त्यासाठीं आम्हीं सर्वांनीं त्यांच्या स्मृतीला कृतज्ञपणें गौरविलें पाहिजे. कारण त्यांनीं पेरलेलीं बीजें सफल होत आहेत. ती अलिगडची महाशाळा (College) आतां अेका स्वतंत्र विद्यापीठाचें अुच्चपद पावली आहे. आज अलिगड हें त्या संस्कृततेचें नि ज्ञानप्रकाशाचें केंद्र झालेलें आहे : कीं ज्याच्यायोगें हिंदुस्थानांतील मुसलमान समाजांत आज आधुनिक चैतन्य संचरत आहे आणि हिंदुमुस्लीमांच्या भावी राष्ट्रैक्याची शुभ सूचनाच देणाऱ्या अशा अुत्कट देशाभिमानाची ज्योति पेटत आहे."

सर सय्यद वारले तेव्हां त्यांच्या या अलिगड संस्थेंतून तेथील शिक्षणामुळें कांग्रेसी राष्ट्रैक्यास नाकारणारी नि हिंदुद्वेषानें तडफडणारी मुस्लीम तरुणांची अेक पिढीची पिढी 'पटायित' होअून बाहेर पडलेली होती! पण तरीहि त्या संस्थेच्या अंतरंगाविषयीं मोठेमोठे हिंदु पुढारी किती अज्ञ, अंध नि असावध होते पहा! सुरेंद्रबाबू वरील अुताऱ्यांत मुस्लीमांतल्या ज्या 'आधुनिक चैतन्या'ला आणि देशाभिमानाला भोळेपणानें हिंदुमुस्लीम राष्ट्रैक्याची 'शुभ सूचना' म्हणून समजले ती वस्तुतः होती मुस्लीम-राज्याकांक्षेनें हिंदुस्थानला दिलेली अेक राष्ट्रभंगाची धर्मांध धमकी!

या ग्रंथाच्या दृष्टिकोनांतून सांगण्यासारखा कांग्रेसच्या अुत्पत्तीचा आणि तिच्या ब्रिटिशनिष्ठ कालखंडाचा म्हणजे, साधारणतः सन १८८५ ते १८९५ पर्यंतचा त्रोटक पण साधार अितिहास हा असा आहे.

या अितिहासावरून हें दिसून येअील कीं सन १८९५ च्या आधीं पांच अेक वर्षांपासून हिंदुस्थानांत जी कांहीं राजकीय चळवळ प्रकटपणें चालली होती तिचीं मुख्य सूत्रें कांग्रेसच्या हातीं आलेलीं होतीं. आणि त्या कांग्रेसला ब्रिटिशनिष्ठतेच्या नि मुस्लीम प्रस्थीच्या भूतबाधांनीं अगदीं आरंभापासूनच पछाडलेलें होतें.

पैकीं तिच्या मुस्लीम प्रस्थीला अुघड अुघड विरोध करून तिला पायबंद घालूं शकेल असा त्याकाळीं कोणताहि हिंदुसंघटक पक्ष अस्तित्वांत नसल्यामुळें कांग्रेसच्या अंगांत त्या रोगाचें विष अधिकाधिक भिनतच गेलें.

परंतु ब्रिटिशनिष्ठेच्या भूतबाधेंतून तरी त्या राष्ट्रीय संस्थेला सोडविण्याचा चंग बांधलेला अेक बलवत्तर मांत्रिक मात्र याच संधीस भारतीय राजकारणाचे रंगणांत अुतरला होता. त्याचें नांव होतें महाराष्ट्रकेसरी, 'केसरी'कार, बाळ गंगाधर टिळक!

प्रकरण बारावें

# टिळकपर्व

महाराष्ट्राची सन १८८५ पर्यंतची राजकीय पहाणी करतांना मागें पांचव्या प्रकरणांत 'स्वदेशनिष्ठ" पक्षाच्या ध्येयधोरणाचें वैशिष्ट्य विशदिलेंच आहे. तो पक्ष ब्रिटिशनिष्ठ पक्षाचा कट्टर विरोधक होता. महाराष्ट्रांतच तो जन्मलेला होता. त्यावेळीं त्याचा प्रसारहि महाराष्ट्राबाहेर फारसा झालेला नव्हता. त्या काळीं हा पक्ष म्हणजे कोणती अेखादी संघटित संस्था होती, असें नाहीं. ब्रिटिश सत्तेची चीड असणाऱ्या आणि त्या परसत्तेला नैर्बंधिक कक्षेंतला शक्य तो तो विरोध करीत राहणाऱ्या मनोवृत्तीच्या अेकमेव सूत्रानें बांधलेला तो अेक स्वदेशनिष्ठांचा समूह होता. या अर्थींच त्याला पक्ष म्हणायचें. ह्या स्वदेशनिष्ठ पक्षाचें वैचारिक नि कार्यिक शिबिर सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाच्या शिबिराशीं अगदीं भिंतीस भिंत लागून वसलेलें असे. ते दोन पक्ष अगदीं अेक नसतांहि अितके निकट असत कीं त्यांच्यांतील अनेक कार्यकर्त्यांची परस्परांच्या शिबिरांत सारखी येजा चालू असे. त्यामुळें कोणाचा गट कोणता हें ब्रिटिश शासनाच्या गुप्तचर विभागालाहि नक्की सांगतां येत नसल्यामुळें त्यानें 'ब्रिटिशविरोधी' या अेकाच नांवाच्या दावणींत दोघांनाहि नोदून टाकलेलें असे

सन १८७४ मध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं जेव्हां त्यांची ती सुप्रसिद्ध 'निबंधमाला' काढली तेव्हां या स्वदेशनिष्ठ मनोवृत्तीचें रणशृंगच फुंकलें जावें तसें झालें. त्याच्या निनादानें महाराष्ट्रांतील रानडे, लोकहितवादी प्रभृति मोठमोठ्या ब्रिटिशनिष्ठ पुढाऱ्यांचीं नि प्रार्थनासमाजादिक संस्थांचीं वैचारिक पीठें गदगदां हलवून सोडलीं. बांबे-गाझिट पत्रांत अिंग्रज सरकारचें लक्ष वेधून घेण्यासाटीं अुघड टीका येअूं लागली कीं निबंधमालेंत राजद्रोही, म्हणजे ब्रिटिशद्रोही, लिखाण येतें. विष्णुशास्त्र्यांच्या अशा आत्म प्रत्ययी

चेतनेनें नि चालनेनें अेकाहून अेक तरुण, अिंग्रजीशिक्षित, स्वार्थत्यागी नि स्वदेशनिष्ठ मंडळी कर्मक्षेत्रांत अुतरून शास्त्रीबुवांनींच काढलेल्या नवीन स्वावलंबी शिक्षणसंस्था, वृत्तपत्रसंस्था नि अितर संस्था यांतून केवळ जीवन-वेतनावर कामें करूं लागली. ब्रिटिशांची सेवाचाकरी धरावयाची नाहीं आणि राजकोपाला न भितां लोकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून ब्रिटिशांच्या परकीय सत्तेविषयीं पसरवितां येथील तितका असंतोष पसरविणारी राजकीय चळवळ नैर्बंधिक कक्षेंत कां होअीना पण करावयास सोडावयाची नाहीं असें त्यांचें ब्रीद असे. या आखाड्यांतूनच तरुण टिळक पुढें आले. विद्यापीठाची पदवी घेतांच ते विष्णुशास्त्री यांस मिळाले. त्यांच्या नि आगरकरांदिक तशाच तरुण सहकाऱ्यांसहित विष्णुशास्त्र्यांनीं 'केसरी' सन १८८१ त काढलें. यद्यपि विष्णुशास्त्री सन १८८२ मध्येंच अकालीं वारले तरी टिळकआगरकरांदिकांनीं 'केसरी' पत्र बंद पडूं दिलें नाहीं. कोल्हापूरच्या महाराजांच्या छळा संबंधीं केसरीनें अिंग्रजी सत्तेवर केलेल्या टीकेविषयीं खटला होअून झालेली बंदिवासाची शिक्षाहि टिळक-आगरकरांनीं भोगली. पुढें तर 'केसरी'चें संपादकत्व नि संचालकत्व सर्वतोपरी टिळकांचेच हातीं आलें. तेव्हांपासून महाराष्ट्रांत बळावत चाललेल्या 'स्वदेशनिष्ठ' पक्षाचें अनौपचारिक नेतृपद जें टिळकांकडे आलें तें शेवटपर्यंत अढळ राहिलें.

मध्यंतरीं मागें सांगितल्याप्रमाणें सन १८८५ मध्यें 'अिंडियन न्याशनल कांग्रेस'ची स्थापना झाली. तिच्या स्थापनेंत रावबहाद्दुर रानडे, तेलंग प्रभृति महाराष्ट्रीय ब्रिटिशनिष्ठ पक्षाचे पुढारी अग्रगण्य होते. त्या वेळीं तरुण टिळकांचें आणि त्यांच्या पक्षाचें राजकीय जीवन महाराष्ट्राच्या सीमेंतच मर्यादिलेलें असल्यामुळें त्या कांग्रेसच्या स्थापनेशीं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. परंतु कांग्रेसचें तें 'अखिलभारतीय राष्ट्रसभा' हें स्वदेशभक्तीनें रसरसलेलें नांव आणि तिनें प्रकटपणें अंगिकारलेलें राष्ट्रैक्याचें नि राज्यैक्याचें अुच्च, अुदात्त नि अभिलषणीय ध्येय पहातांच महाराष्ट्रांतील हा स्वदेशनिष्ठ पक्षहि अितर दुय्यम मतभेदांविषयींची अढी मनांत न ठेवतां, महाराष्ट्रांतील ब्रिटिशनिष्ठ पक्षाअितक्याच अुत्सुकतेनें कांग्रेसला मिळाला. स्वतः टिळक कांग्रेसच्या अधिवेशनांत प्रथमतःच जे अुपस्थित राहिले ते सन १८८९ मध्यें हें अधिवेशन जेव्हां मुंबअीला भरलें तेव्हां होय. त्यानंतरहि कांहीं वर्षें

...लय, ठा...
अनुक्रम २९८५८
क्रमांक ... नों: दि: ...

कांग्रेसमध्यें टिळकांना कोणतेंहि टळकपण असें मिळालेलें नव्हतें. त्यांचें कार्य कांग्रेसबाहेरच्या महाराष्ट्रीय जनतेंतच चालू होतें. त्यांचें धोरणहि कांग्रेसच्या त्या काळच्या चौकटींत बसणारें नव्हतें. अुदाहरणार्थ, सन १८९३ मध्यें नि पुढें जुनागड, मुंबअी, पुणें, येवलें अित्यादि ठिकाणीं मुसलमानांनीं जे दंगे केले त्या काळीं मुसलमानांची नांगी ठेचण्यासाठीं हिंदूंनीं केलेल्या अुलट प्रतिकाराचें अुघड अुघड समर्थन करण्यांत; हिंदूंवर झालेल्या खटल्यांतून त्यांना सोडविण्याची खटपट करण्यांत आणि हिंदूंचा पक्ष निर्भयपणें लढविण्यांत टिळकांनीं नि त्यांच्या स्वदेशनिष्ठ पक्षानेंच पुढाकार घेतला होता. महाराष्ट्रांतील ब्रिटिशनिष्ठ पक्षानें आणि स्वतः कांग्रेसनें मुसलमान रागावतील म्हणून हिंदूंचा सत्पक्षहि घेण्यांत जसा भेकड अंगचुकारपणा केला तसा टिळकांनीं केला नाहीं. अुलट सार्वजनिक शिवाजी अुत्सव आणि सार्वजनिक गणेशोत्सव ह्यांसारख्या हिंदु राष्ट्रीय महोत्सवांची परंपरा निर्मून टिळकांनीं नि टिळक पक्षानें महाराष्ट्रांत हिंदुसंघटनेचा पायाच घातला. टिळकांच्या अशा अनेकांगी जनसेवेमुळें रानडे, फिरोजशहा, वाच्छा, गोखले प्रभृति ब्रिटिशनिष्ठ पुढाऱ्यांचें हातून महाराष्ट्राचें नेतृत्व झपाट्यानें निसटत चाललें आणि टिळकांचे हातीं येत चाललें. ह्याच लोकप्रियतेच्या बळावर सन १८९५ ला टिळक मुंबअीच्या विधिमंडळांतहि लोकप्रतिनिधि म्हणून निवडून आले.

परंतु कांग्रेसच्या अिंग्रजी वा भारतीय नेतृत्वाला टिळकांच्या या कर्तृत्वाची वा महत्वाची कल्पना तोंवर आलेली नव्हती. हिंदुस्थानांतहि त्यांच्या नांवाची प्रसिद्धि यथातथाच होती. त्यामुळें कांग्रेसमध्यें महाराष्ट्राचें प्रतिनिधित्व ज्येष्ठ पिढीची रानडे प्रभृति मंडळीच त्या काळीं करीत असत. त्यांच्या विचारेंच सन १८९५ मध्यें कांग्रेस अधिवेशन पुण्यास भरवावें असें ठरलें. अध्यक्षपदीं सुरेंद्रनाथ बानर्जी यांची निवड झाली. अितक्यांत सामाजिक परिषदेचें अधिवेशन कांग्रेसच्या मंडपांतच भरवावें कीं तें तसें भरूं देऊं नये हा वाद पुण्यांत चांगलाच रंगूं लागला. सामाजिक सुधारणा करावी कीं नाहीं हा मुख्य प्रश्न नव्हता. कांग्रेससाठीं जे सहस्रावधि लोक वर्गणी देतात त्यांच्यांत विशिष्ट धार्मिक वा सामाजिक सुधारणांना अनुकूल लोक जसे असत तसेच प्रतिकूल लोकहि असत. या दुसऱ्या प्रतिकूल पक्षाचीच जनतेंत बहुसंख्या. तेव्हां त्यांच्या पैशांतून बांधल्या जाणाऱ्या या कांग्रेसच्या

मंडपांत त्यांना संमत नसलेल्या नि त्यांच्या धर्मभावना दुखविणाऱ्या अशा या सामाजिक परिषदेला स्थान दिलें जाऊं नये : त्या सामाजिक परिषदेच्या अभिमानी असलेल्या सुधारक मंडळींनें आपल्या पैशांतून हवा तर स्वतंत्र मंडप बांधावा नि ती आपली सामाजिक परिषद तिथें सुखेनैव भरवावी : हा होता मुख्य प्रश्न. परंतु आजवर प्रांतोप्रांतीं झालेल्या कांग्रेसच्या सर्व अधिवेशनांत कांग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद भरविण्यास कोण्याहि प्रांतानें आडकाठी केली नव्हती. यामुळें रानडे, गोखले, मुंबईचे फेरोजशहा प्रभृति मोठमोठ्या ब्रिटिशनिष्ठ नि सुधारक पुढाऱ्यांनीं हट्ट धरला कीं कांग्रेसच्या मंडपांतच आम्ही सामाजिक परिषद भरविणार. परंतु ही त्यांची धडधडीत दंडेली आम्ही पुण्यास तरी चालूं देणार नाहीं! अशा रितीरीनें स्वदेशनिष्ठ नि सनातनी पक्षांनीं अेकजूट केली नि ठासून आव्हान दिलें. त्यांची जी भूमिका वर दिली आहे ती तेवढ्या प्रश्नापुरती तरी न्यायाची होती. हें पाहून टिळकांनींहि त्यांचाच पक्ष घेतला. तेव्हां पुण्याचा हा वाद बोलतां बोलतां महाराष्ट्रभर पसरला आणि त्या झटपटींत कांग्रेसच दुभंग होते कीं काय अशी भीति पडून साऱ्या हिंदुस्थानच्या राजकीय वर्तुळांतून रानडे कीं टिळक? कोणाचा पक्ष खरा? ही चर्चा दुमदुमूं लागली. शेवटीं स्वतः सुरेंद्रनाथ बानर्जींनीं दडपण आणल्यामुळें दुःखानें कां होईना पण न्यायमूर्ति रानडे यांनीं मन मोठें करून आपला हट्ट सोडला आणि सामाजिक परिषद कांग्रेसच्या मंडपांत आम्ही भरविणार नाहीं असें प्रसिद्धिलें. वस्तुतः परिषदेचा प्रश्न हें अेक दिखाअू निमित्त होतें. त्याच्या आड महाराष्ट्रांतील ब्रिटिशनिष्ठ नि स्वदेशनिष्ठ किंवा रानडे पक्ष नि टिळक पक्ष यांची होती ती लढत. त्यांत टिळक पक्षाची सरशी झाल्यामुळें महाराष्ट्राबाहेर प्रांतोप्रांतीं टिळकांच्या नांवाचा अेक नवा झुंजार नेता म्हणून पहिला परिचय झाला.

त्यांतहि त्या वेळच्या कांग्रेसच्या जुन्या नि नांवाजलेल्या धुरीणांमध्येंहि हा नवागत देशभक्त येतांच अुठून दिसावा असे कांहीं गुणविशेष टिळकांच्या अंगीं आधींच बाणलेले होते. कांहीं ठळक अुदाहरणें घेअू. देशभक्त सुरेंद्रनाथ बानर्जी वयाची तिशी उलटे तों ब्रिटिश शासनाच्या सेवा-विभागांतच चाकरी करीत होते. तोंवर त्यांनीं देशसेवेचें नांवहि काढलेलें नव्हतें आणि राज्यशासनानें त्यांना वैयक्तिक आरोप ठेवून चाकरीवरून काढून टाकीतों त्यांनीं ती होअून

सोडलेली नव्हती. स्वतः दादाभाअी नौरोजी वयाच्या तिशीचाळिशीपर्यंत राजकारणापेक्षां स्वतःच्या व्यापारांतच गढलेले होते. न्यायमूर्ति रानडे प्रभृति देशभक्त तर आजन्म ब्रिटिश शासनाची चाकरी करीत राहिले. त्या ब्रिटिश शासनीय सेवेंतून 'अुरलेल्या' वेळांत ते शक्य तों स्वदेशसेवा करीत. फेरोज-शहासारखे अितर धुरीण आपआपल्या विधिज्ञकी (वकिली) प्रभृति व्यवसायांत लाखों रुपये अुपार्जिण्यांत चूर झालेले असत. त्यांत व्यत्यय न येतां नि न आणतां जें राजकारण साधेल तितकेंच ते साधीत होते. पण पदवी घेतांच तरुण टिळक जे विद्यापीठांतून बाहेर पडले तेच मुळीं ब्रिटिशशासनाची सेवा-चाकरी जन्मांत करावयाची नाहीं आणि चरितार्थास न्यूनतः आवश्यक तेवढ्या प्राप्तीवर संतुष्ट राहून सारें जीवन देशसेवेला वाहून टाकावयाचें असें व्रत घेअूनच होय. दुसरा गुणविशेष हा कीं सुरेंद्रनाथादिक त्या काळच्या कांग्रेस-मधील ज्येष्ठ नि श्रेष्ठ मंडळीचें राजकारण मूलतः च 'ब्रिटिशनिष्ठ' होतें. म्हणजे ते अद्याप राजकारणाच्या प्राथमिक पायरीवर रेंगाळत होते. पण टिळकांच्या राजकारणाचा प्रारंभच मुळीं त्या प्राथमिक पायरीहून किती तरी अुंचावलेल्या 'स्वदेशनिष्ठ' वाक्पीठावरून झाला होता. विषयानुरोधें हेंहि अितेंच सांगणें अिष्ट आहे कीं ह्या सन १८९५ च्या काळानंतर नअूदहा वर्षें अुलटून गेल्यावर टिळकांनींच पुरस्कारिलेल्या 'राष्ट्रीय' किंवा 'जहाल' पक्षांत जे पुढारी होते त्यांच्यांत नि टिळकांतहि हा विभेद होताच. अुदाहरणार्थ पंडित शामजी वयाच्या चाळिशीपर्यंत संस्थानांतील अुच्चपदीं चाकरी करीत होते नि वैयक्तिक महत्वाकांक्षेपलिकडे दुसरें कोणतेंहि स्वार्थत्यागी जनसेवेचें क्रियात्मक ध्येय त्यांचेपुढें नव्हतें. ब्रिटिशनिष्ठेवांचून अितर कोणतीहि राजकीय निष्टा त्यांनीं व्यक्तविली नव्हती. यद्यपि जहाल पक्षाच्या पुढाऱ्यांना अनुप्रासाच्या आवडीमुळें 'लाल पाल बाल' ह्या अेकाच सूत्रांत लोकप्रियतेनें गोविलें होतें तथापि त्यांतील लाला लजपतरायजी किंवा पालबाबू हे दोघेहि पुढारी त्यांच्या वयाच्या तिशीचाळिशीपर्यंत राजकारणांत धडाडीनें पडलेले नव्हते आणि ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत झालें नि आहे हेंच अुपकारक होय अशी त्यांची प्राथमिक निष्ठा होती. ह्या सर्व अुल्लेखांची मागच्या प्रकरणांतून आधारांसह चर्चा केलेली आहेच.

अर्थात् ह्या सर्व प्रमुख पुढाऱ्यांपेक्षां टिळकांत हे अुठावदार विशेष होते

९४८९

आणि तत्कालीन बहुतेक अितर पुढाऱ्यांत ते नव्हते हें जें अिथें सांगितलें आहे तें अितरांनीं केलेल्या देशसेवेची किंवा त्यांच्या अेकंदर योग्यतेची न्यूनता दाखविण्याकरितां नव्हे. त्या पुढाऱ्यांतहि प्रत्येकीं अुल्लेखनीय विशेष होतेच. त्यांची देशसेवा आपआपल्या परी अुत्कटच होती. अुदाहरणार्थ न्यायमूर्ति रानड्यांसंबंधीं वर म्हटलें आहे कीं ते ब्रिटिशांच्या शासनीय सेवेंतून 'अुरलेला' वेळ स्वदेशसेवेंत घालवीत. तें खरेंच. पण हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं त्या 'अुरलेल्या' वेळांत त्यांनीं जी असामान्य देशसेवा केली तितकी करावयास सामान्य माणसाला सात जन्म पुरले नसते.

पुण्यांत सन १८९५ त कांग्रेसचें अधिवेशन भरण्याचें ठरतांच वर दिलेलें जें मंडपाविषयींच्या वादाचें वादळ अुठलें आणि त्यामुळें टिळकांचें नांव महाराष्ट्राबाहेरील प्रांतांतून प्रथमच गाजूं लागलें तें तितकें गाजण्यास नि विशेषतः कांग्रेसच्या जुन्या, सुप्रतिष्ठित नि ब्रिटिशनिष्ठ नेतृमंडळासहि ह्या नवागत 'चळवळ्या'ला झिडकारून टाकण्याची जी सोय अुरली नाहीं त्यास टिळकांच्या ह्या सापेक्षतः मनस्वी स्वार्थत्यागाचें नि तेजस्वी राजकारणाचें गुणवैशिष्ट्यहि कारणीभूत झालें होतें हें स्पष्टविण्यापुरतेंच काय तें त्यास असें अुल्लेखावें लागलें.

वर सांगितल्याप्रमाणें टिळकपक्षाच्या मागणीमुळें कांग्रेसच्या मंडपांतून सामाजिक परिषदेचें चंबूगवाळें बाहेर फेंकलें जातांच तो वाद मिटला. लगेच सर्व पक्षांच्या अेकजुटीनें कांग्रेसचें अधिवेशन पुण्यास रीतसर भरलें आणि पुण्याच्या लौकिकास साजेल अशा थाटानें पारहि पडलें. त्या निमित्तें आलेल्या प्रांतोप्रांतींच्या कांग्रेस प्रतिनिधींना, महाराष्ट्रांत लोकांचें नेतृत्वपद कोणाकडे असेल तर तें टिळकांकडे आहे हें प्रत्यक्षच बघावयास मिळालें. कांग्रेसच्या अधिवेशनांतहि टिळकांच्या स्वतंत्र कर्तृत्वाची छाप अशी तेव्हांच प्रथमतः पडली—आणि ब्रिटिशनिष्ठतेच्या पकडींतून कांग्रेसला सोडविण्यास्तव स्वदेश-निष्ठ पक्षाला पुढें कित्येक वर्षेपर्यंत जी वैचारिक लढत अव्याहतपणें द्यावी लागणार होती तिलाहि अिथेंच तोंड लागलें. याच वेळेपासून महाराष्ट्राच्या संसर्गानें प्रथमतः बंगालमध्यें ही स्वदेशनिष्ठ मनोवृत्ति अुफाळली आणि मग अितर प्रांतांतूनहि तिचा प्रसार होत चालला.

... संग्रहालय, ठाणे ...
अनुक्रम [illegible] वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

प्रकरण तेरावें

# पण वासुदेव बळवंतांनंतर सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाचें काय झालें?

ज्या सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाचा अिंग्लंडला अितर सर्व हिंदी पक्षांपेक्षां अधिक वचक असे, ज्या सशस्त्र क्रांतिनिष्ठ मनोवृत्तीचा नायनाट करण्याच्या मुख्य हेतूनें ब्रिटिश कूट नीतिज्ञांनीं 'कॉंग्रेस'ला मूलतः स्थापिली,—त्या मनोवृत्तीच्या क्रांतिनिष्ठ पक्षाचें ह्या १८८५ ते १८९५ च्या मध्यंतरीच्या काळांत काय झालें? कॉंग्रेसनें देशभर ब्रिटिशनिष्ठेची जी लाट अुसळवून दिली तिच्या प्रबळ प्रवाहासरशीं खालची माती झिरपून गेलेल्या वटवृक्षासारखा तो पक्ष अुन्मळून वाहून गेला? का कॉंग्रेसमागें धांवत सुटलेल्या लक्षावधि भाबड्या जनतेच्या पायाखालीं चक्काचुरून गतप्राण झाला? किंवा वासुदेव बळवंतांच्या क्रांतिकारक अुठावणींत अनेकांना झालेल्या फांशीच्या नि जन्मठेपीच्या भयंकर शिक्षांमुळें नि त्यांत आलेल्या अपयशामुळें त्या पक्षाची सशस्त्र क्रांतिवादावरील स्वतःचीच श्रद्धा अुडाली आणि तो अंगीभूत रक्तक्षयानेंच झुरत गतप्राण झाला? किंवा त्या काळीं स्वदेशभक्ति करूनहि धन मान, सुख सुरक्षितता, पद पदव्या, अुपभोगितां येण्याचा जो सोपा मार्ग कॉंग्रेस मंडपाकडे जात होता तो मार्ग त्या मोहाला बळी पडून त्यांनीं चोखाळला?

तसें कांहींही झालें नाहीं! सन १८८३ त, मागें सांगितल्याप्रमाणें तिकडे अेडनमध्यें पेटलेल्या चितेवर वीर वासुदेव बळवंतांचें कलेवर जळून राख झालें. ती चिता विझली. परंतु अिकडे त्यांच्या मागें अुरलेल्या महाराष्ट्रीय क्रांतिकारकांचीं देशस्वातंत्र्याच्या महत्वाकांक्षेनें आणि तत्प्रीत्यर्थ अपरिहार्यपणें करावी लागणाऱ्या सशस्त्र क्रांतीच्या वीरश्रीनें पेटलेलीं हृदयें कांहीं विझलीं नाहींत. तीं तशीच धगधगत राहिलीं. त्यांचा संघटित पक्ष असा कांहीं काळ

राहिला नव्हता. परंतु व्यक्तिशः आणि गटागटानें ते भारतीय स्वातंत्र्याच्या ध्येयाचा आणि सशस्त्र क्रांतिवादाचा प्रचार गुप्तपणें निरंतर करीतच राहिले होते. तेंहि नानावेषानें नि नानामिषानें; अप्रकटपणें नि प्रकटपणें.

प्रकट चळवळींपैकीं त्या काळांतील भारतव्यापी चळवळ कांग्रेसची. तिनें हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यापर्यंत केलेल्या राष्ट्रैक्याच्या जागृतीविषयीं जरी क्रांतिकारकांना समाधान वाटे तरी तिच्या ब्रिटिशनिष्ठ मनोवृत्तीची त्यांना अितकी चीड येअी कीं कांग्रेसशीं त्यांचें सूत कधींच जमलें नाहीं. दुसरी प्रकट चळवळ म्हणजे स्वदेशनिष्ठ अथवा टिळकपक्षाची. ह्या पक्षाच्या अुघड आंदोलनांशीं मात्र त्या क्रांतिकारकांचे जिव्हाळ्याचे संबंध असत. टिळक पक्षाच्या प्रकट चळवळीचा व्याप नैर्बंधिक कक्षेंतच होता. त्याची रूपरेखा स्वदेशनिष्ठ पक्षाची मनोवृत्ति नि कार्यक्षेत्र ह्यांचें जें रेखण मागें केलें आहे त्यांतच सामावलेली होती. प्रकटपणें चालविलेल्या पण अंततः आपल्या अप्रकट नि गुप्त अशा क्रांतिकारक क्षेत्राचे दिशेनेंच जाणाऱ्या ह्या टिळकपक्षीय सर्व चळवळींमध्यें सहस्त्रावधि क्रांतिप्रवण मंडळी भाग घेत असत. किंबहुना टिळकांच्या सन १८९५ पर्यंतच्या दुष्काळीय चळवळींत, हिंदुमुस्लीम दंग्यांचे प्रकरणीं, शिवोत्सव गणेशोत्सवादिक सामुदायिक आंदोलनांत—आणि पुढच्याहि सर्व चळवळींत — अनुयायांचा जो भर, स्फूर्ति, कडवेपणा नि स्वार्थत्यागी तळमळ दिसून येअी त्याचें मुख्य श्रेय त्यांत शिरलेल्या ह्या क्रांतिनिष्ठांचेंच असे. टिळकांनाहि ह्याची पूर्ण जाणीव होती.

परंतु ह्या प्रकट आणि निर्बंधशील (कायदेशीर) म्हणविणाऱ्या चळवळींत हे क्रांतिवादी जो भाग घेत त्याचा मुख्य हेतु त्या निर्बंधशील चळवळी स्वातंत्र्य संपादनाच्या कामीं किति अपुऱ्या आहेत हेंच सिद्ध करण्याचा असे. त्या चळवळींत तावून सुलाखून निघालेल्या आणि क्रांति संस्थेंत गेल्यास अवश्य अितकी देशभक्तीची नि स्वार्थत्यागाची अुत्कटता अंगी मुरलेल्या स्वदेशनिष्ठ पक्षाच्या मंडळींना हे क्रांतिकारक अंतस्थपणें विचारीत काय अनुभव आला शेवटीं? निर्बंधाच्या कक्षेंत ज्या ज्या चळवळी केल्या त्याला अिंग्रजांनीं कवडीची तरी भीक घातली का? अुलट! त्या काल निर्बंधशील वाटणाऱ्या कृत्यांनाच आज निर्बंधबाह्य ठरवून शिक्षा ठोठावताहेत हे ब्रिटिश! 'आम्ही ब्रिटिश बादशहाशीं राजनिष्ठ आहोंत' असें वारंवार लिहून नि बोलून दाखविणाऱ्या

आमच्या टिळकासारख्या लोकप्रिय पुढाऱ्यालाहि ब्रिटिश शासन राजद्रोहीच लेखीत आहे ना? आपण स्वदेशी वापरतों तें ठीकच. आज तें कृत्य निर्बंधशील आहे. पण अुद्यां स्वदेशी कापडावर कर बसविण्याचा ते नवा निर्बंध करतील! कसा धरणार त्यांचा हात नैर्बंधिक कक्षेंत राहून? आज शिवोत्सव, गणेशोत्सव आपण जनताजागृतिसाठी करतों. तें ठीकच. आज तें निर्बंधशीलहि आहे. पण हे अुत्सव राजद्रोह फैलावणारे आहेत म्हणून अिंग्रजी पत्रें आतांच हाकाटी करूं लागलीं आहेत. अुद्यां त्या अुत्सवांनाच राजद्रोही ठरवून अिंग्रजांनीं प्रतिबंध केला कीं संपलें सारें! कांग्रेसच्या ब्रिटिशनिष्ठ चळवळी तर सोडाच. त्या तर अधोगामीच होत; पण स्वदेशनिष्ठांच्या ह्या निर्बंधशील चळवळीहि—अुपयुक्त आहेत, कराव्या; पण त्या अधुऱ्या नि अपुऱ्या आहेत. आणि ब्रिटिश राज्य अुखडून देण्याच्या कामीं तर त्या आहेत केवळ कुचकामाच्या! मूळ निर्बंध करण्याची सत्ता ब्रिटिशांचे हातून हिसकावून घेतली पाहिजे. ती सत्ता ब्रिटिश जे गाजवतात ते त्यांच्या हातीं शस्त्रशक्ति आहे म्हणून. यास्तव त्यांच्या त्या शस्त्रशक्तीला हाणून पाडणाऱ्या प्रतिशस्त्रशक्तिची —म्हणजेच सशस्त्र क्रांतीची अुठावणी केल्यावांचून ब्रिटिशांच्या दास्यांतून ही आपली मातृभूमि स्वतंत्र करतां येणें नाहीं! शक्य म्हणा अशक्य म्हणा पण मार्ग तो!—गुप्त संस्थांच्या भुयारांतून सशस्त्र क्रांतीच्या रणांगणाकडे!

प्रकट चळवळींत रुमूनहि ब्रिटिशांचें कांहींच वाकडें होत नाहीं हें पाहून वैतागलेल्या 'स्वदेशनिष्ठ' पक्षांतील मंडळींना क्रांतिकारकांचा हा कोटिक्रम पटे. त्यांमध्यें ज्यांचीं ज्यांचीं अंतःकरणें त्या सरशी चेतून अुठत ते ते सशस्त्र क्रांतिवादाचे नवे अनुयायी होत. अेकंदरींत, स्वदेशनिष्ठ पक्षाच्या प्रकट चळवळी म्हणजे अप्रकट नि गुप्त अशा क्रांति संस्थांना नवीन अनुयायी पुरविणारें अेक भरतीक्षेत्र Recruiting Ground झालेलें होतें. ह्या दृष्टीनेंच त्यांचा अुपयोग क्रांतिनिष्ठ पक्ष करून घेअी.

असें होतां होतां सन १८९५ चे आगेमागें महाराष्ट्रांत गुप्तपणें गटागटानें विखुरलेल्या या सशस्त्र क्रांतिकारकांची अेक नवी आघाडी पुन्हां कार्य-क्षेत्रांत अुतरली. तीच, पुढें साऱ्या हिंदुस्थानांत क्षणभर वीजेसारखी चमकून गेलेली चाफेकर बंधूंची गुप्त संस्था होय.

अुपलब्ध अितिहासावरून असें दिसतें कीं ह्या सन १८९५ च्या कालखंडा-

पर्यंतहि हिंदुस्थानच्या सार्वभौम स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांचा सशस्त्र प्रतिकार करण्यास अुद्युक्त झालेली अशी अेखादी क्रियात्मक क्रांतिकारक संस्था वा सक्रिय गट महाराष्ट्रावांचून अितर कोणत्याहि प्रांतांत अस्तित्वांत आलेला नव्हता. केवळ महाराष्ट्रांत मात्र ती क्रांतिकारक परंपरा अखंडपणें चालू राहिली. सन सत्तावनच्या स्वातंत्र्य युद्धापासून स्फूर्ति घेअून वासुदेव बळवंतांची सशस्त्र अुठावणी झाली. वासुदेव बळवंतांच्या परंपरेनें चाफेकर बंधूंची क्रांतिसंस्था चेतविली. चाफेकर रानडे फांशी गेल्याची स्फोटक वार्ता येतांच माझें बालहृदय पेटलें आणि मी माझ्या कुलदैवतेसमक्ष त्यांचें क्रांतिकार्य पुढें चालू ठेवण्याची शपथ घेतली. त्या वर्षाच्या आंतबाहेरच मी रचलेल्या चाफेकरांवरील फटक्यांत या हुतात्म्यांना संबोधून मी जें आश्वासन दिलें होतें कीं,

*कार्य सोडुनी अपुरें पडतां झुंजत ? खंति नको ! पुढें ॥*

*कार्य चालवूं गिरवित तुमच्या पराक्रमाचे अम्ही धडे ॥*

—त्या आश्वासनांतूनच किंचित् पुढें 'अभिनव भारताचा' प्रादुर्भाव झाला !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम २९८५८ वि: ५[illegible]
क्रमांक ८०८० नों: दि: ३।१।५५५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८०८०
[illegible] शाखा ([illegible])

सावरकर आत्मवृत्ताचा महत्त्वाचा
नि चित्तथरारक कालखंड

# इंग्लंड

लवकरच प्रसिद्ध होईल !

REFBK-0009489